॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥

५०

ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

# छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९३४ । वर्ष १२ अंक ११

मूल्य रुपये पंचवीस


## सुवर्ण महोत्सवी
## प्रबोधिनी विशेषांक





ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !... विद्यार्थ्यांच्या विकसनाची चळवळ !!





ग्रामीण किशोरी



युवक



नागरी वस्ती - युवती

# सर्वांची प्रबोधिनी



प्रशासकीय अधिकारी



अध्यापक



महिला



पुरोहित गट

**छात्र प्रबोधन**
सौर श्रावण, शके १९३४।
वर्ष १२ अंक ११

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**कार्यकारी संपादक**
जयश्री काटीकर

**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

**संपादन साहाय्य -** मीरा शेटे
**मुखपृष्ठ -** संदेश जोशी
**मलपृष्ठ -** ऋजुता घाटे
**मांडणी सजावट -** अनुपमा देशपांडे

**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/**
**द्वैवार्षिक : ₹ ३४०/**
**त्रैवार्षिक : ₹ ५००/**
**दशवार्षिक : ₹ १,५००/**

**या अंकाची किंमत :** ₹ २५/-
पुण्याबाहेरील धनादेशासाठी -
₹ २०/- जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी-
प्रतिवर्षी ₹ ४०/- जादा

**संपर्क पत्ता**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org
**ई-मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

# संवाद

***प्रिय, प्रबोधिनीच्या समर्थ प्रबोधकांनो***

*'छात्र प्रबोधन'च्या एकविसाव्या वर्षातला पहिला अंक 'प्रबोधिनी विशेषांक' म्हणून प्रकाशित होतोय याचा विशेष आनंद वाटतोय.*

*पन्नास वर्षांपूर्वी एका छोट्या खोलीत अगदी तुटपुंज्या साधन सामुग्रीसह काही ध्येयवेड्या माणसांनी काळापुढच्या काही कल्पनांचा ध्यास घेतला आणि प्रबोधिनीच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. 'रूप पालटू देशाचे' असे ध्येय डोळ्यासमोर ठेवून शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, उद्योग, आरोग्य, नेतृत्वसंवर्धन, स्त्री - शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता अशा विविध अंगांनी प्रबोधिनीचं काम गेल्या पन्नास वर्षांत विस्तारत गेलं. या सगळ्याचा इतिवृत्तांत तुमच्यापर्यंत अहवालाच्या स्वरूपात पोहोचवणं हा या विशेषांकाचा हेतूही नाही आणि ते ८० पानांच्या अंकात मावणंही शक्य नाही. पण या कार्याची झलक ज्यातून तुम्हाला कळेल, त्या त्या काळातल्या धुंदीची, भारावलेपणाची प्रचीती ज्यातून तुम्हाला येईल; अशा काही गोष्टी, काही अनुभव, काही विचार, काही माहिती या अंकातून तुमच्यापर्यंत पोहोचवायचा प्रयत्न करत आहोत. तुमच्या वयाचे असताना ज्यांनी प्रबोधिनीत प्रवेश केला अशांनी त्यांना कळलेली, भावलेली प्रबोधिनी आणि प्रबोधिनीचे त्यांच्या जडणघडणीतले योगदान यांबाबत विशेष अनुभव तुमच्यापर्यंत पोहोचवले आहेत. त्यातून प्रबोधिनी तुम्हाला अधिक समजेल, आपली वाटेल असा विश्वास वाटतो. या अंकाच्या वाचनातून प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेत सहभागी होण्याची आणि प्रबोधिनीच्या व्यापक कार्यात स्वत:ला झोकून देण्याची तुमची ऊर्मी वाढावी हीच अपेक्षा.*

*१९७४-७५ मध्ये इयत्ता पाचवीमध्ये एक किडकिडीत, मुळूमुळू रडणारा मी प्रबोधिनीच्या शाळेत दाखल झालो आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेमुळे माझ्यात आमूलाग्र बदल घडत गेले. प्रबोधिनीच्या जादुई वातावरणाने, येथल्या अचाट आव्हाने पेलण्याची ताकद असलेल्या माणसांमुळे, येथल्या अफाट बीजशक्ती असलेल्या उपक्रमांमुळे मी प्रबोधिनीत खेचला गेलो आणि प्रबोधिनीचाच झालो... कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना प्रबोधिनीच्या शैक्षणिक, सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून देता आलं, याचा मला आज मनापासून आनंद होतोय. असाच आनंद महाराष्ट्रातल्या हजारो मुलामुलींना अनुभवता यावा, यासाठी तर 'छात्र प्रबोधन'ची सुरुवात आपण केली. या 'प्रबोधिनी विशेषांका'तून तुम्हालाही असा आयुष्यभराचा आनंद मिळविण्याची प्रेरणा मिळो, हीच सदीच्छा!*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

**मुखपृष्ठाविषयी -**'शिक्षण ही मनुष्यघडणीची प्रक्रिया आहे', ही ज्ञान प्रबोधिनीतील एक मूलभूत संकल्पना. ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याची आध्यात्मिक बैठक दर्शवणारी मेघडंबरी, तिच्या आकृतिबंधातून हातात हात घालून कार्य करणाऱ्या प्रबोधकांची प्रतीकात्मक रचना आणि 'राष्ट्र हेच दैवत मानून आम्ही त्याची उपासना करू' हा संदेश देणारे ज्ञान प्रबोधिनीचे बोधचिन्ह मुखपृष्ठावर डावीकडे वरच्या बाजूला आहे, या ध्येयाच्या दिशेने होणारी वाटचाल प्रत्यक्ष प्रकाशचित्रांतून आणि भारतीय संस्कृतीच्या प्रतीकात्मक रचनेतून मांडली आहे. सर्वांगानी फुलणं, यज्ञाच्या पावित्र्याने, त्यागाने झळाळणं, बाहू उंचावून विश्वाला कवेत घेण्याचा उत्साह, मोरपिसाचे सौंदर्य इ. प्रतीकांच्या रचनेतून प्रबोधिनीची एकसंध ओळख करून देण्याचा प्रयत्न मांडणीतून केला आहे.

जी जी क्षेत्रे साद घालती यत्न तिथे पेरुनी ।
कस लावुनिया कर्तृत्वाचा ठसा नवा उमटवू ॥
**शुभेच्छा ! - शंतनू पटवर्धन, टेक्सास अमेरिका**

सुवर्ण महोत्सवी
प्रबोधिनी विशेषांक

छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९३४। वर्ष १२ अंक ११
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२)
२४१ वा अंक, वर्ष २१ अंक १
प्रकाशन दिनांक - २० श्रावण, शके १९३४/११ ऑगस्ट २०१२

ॐ
इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

... प्रबोधिनी विशेषांक... **अंतरंग** ... प्रबोधिनी विशेषांक...

१ **संवाद** - महेन्द्र सेठिया
३ **आपली प्रबोधिनी...** - मीरा शेटे
६ **आजची प्रबोधिनी**
७ **ध्येयाचा सुगंध लाभला जीवना** - वाच. व. सी. ताम्हनकर
१२ **मध्यवर्ती सहविचार समिती**
**(१३ - २५) विकसता विकसता विकसावे...**
**(पाच दशकातील विद्यार्थ्यांची प्रातिनिधिक मनोगते)**
**असु अम्ही सुखाने पत्थर पायातील** - वाच. अशोक निरफराके
**प्रेरणा विकसित करणारी...** - राजेंद्र वैद्य
**विधायक कामं करणारी...** -वाच. अनघा लवळेकर
**मोकळ्या वातावरणाची...** - उमा नामजोशी-बापट
**मी आणि प्रबोधिनी**- नचिकेत नित्सुरे
२६ **प्रबोधनाचे गीत आज हे...** - वाच. नलिनी गुजराथी
**(३० - ४८) अदम्य अपुल्या आकांक्षा**
**(प्रबोधिनीच्या काही स्फूर्तिदायी कहाण्या)**
**एक्सलन्स ॲवॉर्ड** - अनु. प्रा. भाग्यश्री हर्षे
**कथा उद्योगांची** - अनिल रिसबूड
**पंतप्रधानांची प्रबोधिनीला भेट** - सुभाष देशपांडे
**कथा वादळवाऱ्याची** - अविनाश धर्माधिकारी
**कहाणी एका संशोधनाच्या साधनेची** - वाच. सुजला वाटवे
**सारं बदललं** - सुवर्णा गोखले
**भारतभर प्रबोधिनी ४९**
**जाणून मंत्र घेऊ द्रष्ट्या ऋषिवरांचा ५०** - यशवंतराव लेले
**रसरसत्या चैतन्याचे झरे... (५५ - ७६)**
**(प्रबोधिनीच्या ५ शाळांमधील विद्यार्थ्यांचे अनुभव)**
**शाळा एक वेगळंच रसायन** - चि. प्रणव, चि. मयूर, पुणे
**तंबू शिबिर - एक साहस उपक्रम**- कु. अपूर्वा, सोलापूर
**संस्मरणीय सायकल सफर** - चि. ऋषिकेश, निगडी
**पवनामाई उत्सव** - कु. प्रतीक्षा, प्रियांका, प्राजक्ता, ऋतुजा - साळुंब्रे
**मला भावलेले अभियान** - चि. प्रतीक, हराळी
**जगण्याचे आंदण हे (कविता)...६४** - आश्लेषा महाजन
**प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया (६५-७७)**
**(केंद्रांवरील उपक्रमांमधून प्रबोधकांची वाटचाल)**
**आपलंसं करणारी प्रबोधिनी** - मृणाल, पुणे
**कर्तृत्वाला संधी** - निखिल, सांगली
**मलाच माझे रूप उमजता...**- अपूर्वा, बोरिवली
**अनुभव शिक्षणाची शाळा** - आराधना, सांगली
**प्रबोधिनीबरोबरचा प्रवास** - दीपाली, डोंबिवली
**मी बी घडलो तुम्ही बी...** - केदार, अंबाजोगाई
**किशोरी विकास उपक्रम...** - वेल्हे
**भविष्यवेधी प्रबोधिनी ७८** - वाच. गिरीश बापट
**माझ्या नजरेतून छात्र प्रबोधन ८०**

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.



अभिमानाने, अनासक्तीने, विश्वासाने, विनयवृत्तीने ।
एक विचारे, एक मताने, एक आम्ही होऊ।।

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

# आपली प्रबोधिनी...

**मीरा शेटे**

''उद्याच्या दिवस माझ्या ऐवजी नेहाताई येईल बरं का, बर्च्या घ्यायला,'' ऋचाताईने सगळ्या मुलींना सूचना दिली.

''काय गं ताई, तूच ये ना उद्यापण'' सगळ्यांनी एकाच आवाजात मागणी केली.

''अगं, मी रोजचतर येते. पण उद्या संचालकांबरोबर माझी बैठक आहे म्हणून माझ्याऐवजी नेहाताई येणार.''

''संचालक म्हणजे कोण?'' एकीने विचारले.

''आमच्या संस्थेचे प्रमुख, त्यांना आम्ही संचालक म्हणतो.''

''म्हणजे मुख्याध्यापक?''

''नाही ग, मुख्याध्यापक वेगळे आणि संचालक वेगळे.''

''हांऽऽ... म्हणजे director का तुमच्या शाळेचे?''

ऋचाताई विचारात पडली. 'हो director; पण बाकीच्या संस्थांचे असतात तसे नाही; हे या आठवीच्या मुलींना कसं समजावून सांगता येईल!

''बापरे ! अगं ताई एवढ्या मोठ्या माणसांबरोबर तू मीटिंगला जाणार? भीती नाही वाटत तुला?''

'मीटिंग' शब्द ऐकून ताईला गंमत वाटली. ती म्हणाली, ''छेऽ गं ! भीती बीती नाही वाटत त्यांच्याबद्दल. आमच्या संचालकांबद्दल आम्हाला फार आदर वाटतो. दर आठवड्याला आम्ही त्यांच्याबरोबर एकत्र बसतो. आम्ही काय काम केलं याची माहिती त्यांना देतो. मी तुमच्या शाळेमध्ये येऊन तुम्हाला बर्ची शिकवते याबद्दलचं सगळं निवेदन, उद्या द्यायचंय मला त्यांना.''

''निवेदन म्हणजे? ताई तू असे वेगळे शब्द का बोलतेस नेहमी अगदी मराठीतले ! मगाशी जसं director ना संचालक म्हणालीस...''

''अगं ज्ञान प्रबोधिनीमध्ये आपल्या भाषेचा आदर ठेवण्यासाठी आवर्जून मराठीचा उपयोग केला जातो. ती सवय मलाही आहे,'' ताई अभिमानाने म्हणाली.

शिक्षण मंदिरातील आठवी नववीच्या मुलींना बर्च्या शिकवण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीची ऋचाताई शाळेत येत होती. ज्ञानप्रबोधिनीचा विषय निघाला की तिला काय काय सांगू असं वाटायचं.

''ताई, एकदा पटकन आम्हाला तुझी शाळा दाखवून आणशील का?''

''हो दाखवते की ! पण पटकन बघून नाही होणार माझी शाळा. किमान २-३ तास तरी लागतील. मला तुमच्या बाईंची परवानगी घ्यावी लागेल.''

''घेना मग तू परवानगी प्लीज, प्लीज, सगळ्यांनी एकच गोंधळ केला.''

रीतसर सगळी परवानगी वगैरे झाली आणि एका दिवशी सकाळी ९ वाजता बर्च्यांमध्ये भाग घेतलेल्या ४० निवडक मुलींचा गट ज्ञान प्रबोधिनीसमोर ऋचाताईबरोबर अवतीर्ण झाला.

ऋचाताईने सगळ्यांना ओळीत उभं केलं. आपल्याबरोबरच्या नेहाताईची ओळख करून दिली आणि सांगितलं,

''आता आपण दोन गटात शाळा पाहायला जाणार आहोत. माझ्याबरोबर एक गट नवीन वास्तूत येईल आणि दुसरा गट नेहाताईबरोबर जुन्या वास्तूत जाईल.''

नेहाताईनी पहिल्या मजल्यावर जाता जाता सांगायला सुरुवात केली, ''आता आपल्याला शाळा बघता बघता अनेक वेगवेगळ्या खोल्या दिसतील. आपण त्यासुद्धा बघूयात. मी तुम्हाला कोडं घालणार त्यावरून तुम्ही ओळखायचं की, तिथे काय काम चालू असेल?'' कोडी म्हटल्यावर मुलींचा चेहरा खुलला.

नेहाताईनी विचारलं,

*''स्पर्धा आहे, परीक्षा आहे, अधिकारी पदाकडे वाटचाल आहे.''*

मुली विचारात पडल्या... म्हणजे काय हे कुणाला पट्कन उमजेना. एक जण म्हणाली,''ताई, इथे अधिकारी

सुवर्ण महोत्सवी वाटचाल ..१९६२..
ज्ञान प्रबोधिनीची स्थापना,
युवक प्रबोध शाळेस प्रारंभ

नव्या युगाचे पाइक आम्ही, तारे नवक्षितिजावरचे ।
निजरुधिराची आण वाहुनी, रूप पालटू देशाचे ।।
**शुभेच्छा ! – डॉ. मुकुंद करंबेळकर, चाळीसगाव**

व्हायला शिकवतात एवढंच कळलं मला या कोड्यावरून पण म्हणजे काय?''

नेहाताई म्हणाली, ''तुला कळलं ते बऱ्यापैकी बरोबर आहे. इथे सगळे मोठे ताई, दादा वेगवेगळे विषय शिकतात.''

''आंऽऽऽ म्हणजे ते प्रौढ शिक्षण म्हणतात तशीपण शाळा आहे का तुमच्याकडे?'' ताई मनापासून हसली. म्हणाली, ''नाही गं प्रौढ शिक्षण नाही. हे सगळे **स्पर्धा परीक्षा केंद्राचे** विद्यार्थी आहेत. प्रशासनात अधिकारी होण्यासाठी खूप अभ्यास करावा लागतो, परीक्षा द्यावी लागते. आपल्या राज्याचं, देशाचं काम चांगलं चालावं, आपल्याला त्यामध्ये सहभागी होता यावं, असं वाटणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणारं हे केंद्र आहे. पुण्यातच नाही तर बाहेरगावहूनसुद्धा हे विद्यार्थी आपल्याकडे येतात.''

इकडे दुसरा गटसुद्धा ऋचाताईबरोबर नवीन वास्तूत गेला. मध्येच एकीनी विचारलं, ''ताई, हे युवती विभाग काय आहे?''

''प्रबोधिनीत युवक-युवतींनी काम करावं या हेतूने **युवक विभाग** आणि **युवती विभाग** असे स्वतंत्र विभाग सुरू झाले. हे दोन्ही गट मुला-मुलींसाठी खेळाची दलं घेतात. विक्री उपक्रम, शिबिरं-सहली असे उपक्रम सुद्धा या विभागांतून आयोजित केले जातात.''

पुढे जाता-जाता ऋचाताईनं मुलींना कोडं घातलं,

*''पूजापाठ संशोधन, देवभाषेचे संवर्धन*
*होई संस्कारांचे जतन, डोळसपणाने...*
*ओळखा पाहू आपण काय पाहणार ते? ''*

मुली विचारात पडल्या. एक जण म्हणली, ''ताई, देवभाषा म्हणजे संस्कृत ना? इथे संस्कृत भाषेचा क्लास आहे का?''

ताई म्हणाली, ''क्लास तर नाही, पण तरीसुद्धा इथल्या हजारो संस्कृत पुस्तकांच्या मदतीने तुम्हाला खूप काही शिकता येईल. शाळेतली मुलंसुद्धा प्रकल्प करताना आवर्जून मोठ्या लोकांच्या मदतीने **संत्रिकेतली** संस्कृत पुस्तकं हाताळतात. वेगवेगळ्या विषयांवर संशोधन सुद्धा इथं केलं जातं.''

संस्कृत पुस्तकांचं हे भलं मोठ्ठं ग्रंथालय पाहता पाहता पूजाला एक काकू ओळखीच्या वाटल्या तिनं हळूच त्यांना विचारलं, ''काकू तुम्ही आमच्याकडे सत्यनारायण करायला आला होतात ना?'' काकू हसून 'हो' म्हणाल्या. ताई म्हणाली, ''या काकू पुरोहित आहेत. ज्यांना पूजा सांगायची आवड आहे, त्यांच्यासाठी संत्रिकेत वर्ग चालतात. आणि नंतर वर्गात शिकून पास झालेल्या व्यक्ती निरनिराळे संस्कार करायला जातात.''

दोन्ही गट इकडे तिकडे पाहात शाळेतून फिरत होते. नेहाताईनी पुढच्या मजल्यावर आल्यावर सांगितलं इथे सगळं प्रबोधिनीचं आर्थिक काम होतं. आणि हे पुढे आहे ते संचालकांचं कार्यालय. एकीनं विचारलं, ''ताई, ही समोर कुठली खोली, वर्ग तर नाही वाटत तो!''

''सांगते, पण आधी तुम्ही या कोड्याचं उत्तर सांगा.

*पाऊस पडला पाणी आलं, माझ्यामध्ये ते साठवलं*
*दुष्काळाचं संकट आलं, तरीही गाव सुखी राहीलं,*
*धरणाचा मी छोटा भाऊ, सांगा पाहू मी कोण?''*

इतका वेळ गप्प बसलेल्या सिद्धीला मामाच्या गावी पाणी साठवण्याचे केलेले प्रयोग आठवले. हात वर करून ती म्हणली, ''ताई धरणाचा भाऊ बंधारा.'' सगळ्याजणी आश्चर्याने पाहू लागल्या.

''हो बंधाराच. आपल्याकडे शहरात अनेक सोयी-सुविधा असतात; पण गावाकडे अगदी साध्या आवश्यक सोयीही नसतात. अशा सुविधा निर्माण करण्यासाठी, तिथल्या लोकांचे पाण्याचे, शेतीचे, आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी **ग्राम विकसन विभागा**तले अनेक ताई दादा गावात जाऊन काम करतात. शाळेतली मुलंसुद्धा गावांमध्ये सहलीला, भातलावणीला वगैरे जातात.''

''ताई तुमच्या शाळेत केवढं काय काय करायला मिळतं गं!''

''हो प्रबोधिनीतल्या सर्वच उपक्रमांचा कुठल्या ना कुठल्या माध्यमातून शाळेशी आणि शिक्षणाशी संबंध आहे.''

''आणि ताई एवढं सगळं करायला किती लोक लागत असतील ना!''

सुवर्णमहोत्सवी वाटचाल.. **१९६३**..
डॉ. विक्रम साराभाईंची भेट,
भगिनी निवेदिता यांचे चरित्र प्रकाशित



यंत्रदेव तो पूज्य अम्हाला, पूज्य अम्हाला वेदऋचा ।
विज्ञानावर भक्ति असुनही, गंध मोहवी काव्याचा ।।
। कै. प्रभाकर बळवंत करंदीकर स्मरणार्थ। **प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

''हो अर्थातच लागतात. पुण्याबाहेरसुद्धा अगदी बोरिवली, डोंबिवली, सांगली, अंबाजोगाई सगळीकडे प्रबोधिनीचे कार्यकर्ते आहेत.''

पुढे जाता जाता मुलींनी शाळेतले वर्ग पाहिले. प्रयोगशाळा पाहिल्या. ''ताई, इथे **छात्र प्रबोधन** लिहिलंय, म्हणजे ते मासिक ना! ज्यातल्या तू आम्हाला गोष्टी सांगतेस.'' ''अगदी बरोबर.''

इकडे ऋचाताईबरोबर फिरणाऱ्या गटातल्या चुणचुणीत शलाकाला ताईनी विचारलं,

''**शैक्षणिक उपक्रम केंद्र** म्हणजे काय असेल असं वाटतं तुला?'' उपक्रम हा शब्द ताईमुळे तिला चांगला माहीत झाला होता.

ती पटकन् म्हणाली, ''शाळेतल्या मुलांना वेगळ्या प्रकारे अभ्यास शिकवणं?''

''हो, पण इथे मुलांबरोबर त्यांच्या शिक्षकांसाठीही शिबिर होतात. तुम्हा मुलांना नवनवीन गोष्टी रंजक पद्धतीने शिकविण्याचं तंत्र शिक्षकांना शिकवलं जातं. आणि मुलांसाठी विज्ञान शिबिराचं सुद्धा आयोजन होतं.''

आणखी पुढे जाताना ऋचाताईनी विचारलं, ''मन वढाय वढाय... ही कविता तुम्हाला माहितिये का?'' ''होऽऽ बहिणाबाईंची कविता आहे ती... पण ते आत्ता का विचारलंस?'' ''अगं सोप्पय... ताईला असं सुचवायचं असेल की पुढे आपण जे बघणार तिथे मनाचा काहीतरी संबंध आहे.''

''फारच हुशार मुली आहात तुम्ही. बरोबर ओळखलंत. हा आमचा **मानसशास्त्र विभाग** आहे. मन, बुद्धी इ. अनेक विषयांवर इथे संशोधन होत आलं आहे. मुख्य म्हणजे मुलांसाठीची कलचाचणी, करिअर मार्गदर्शन, लहानांच्या व मोठ्यांच्या मानसिक अडचणींसाठी सल्ला-मार्गदर्शन अशा कितीतरी प्रकारचे काम इथे चालतं.'' प्रशालेतलेसुद्धा अनेक उपक्रम, परीक्षा इथल्या संशोधनावर आधारित आहेत.

सगळं बघत बघत आता दोन्ही गट एकत्र जमले. सगळ्या मुलींचं प्रबोधिनीबद्दलचं कुतूहल अजूनच वाढलं होतं. मोठ्ठी दोन ग्रंथालयं, सुसज्ज असे मुला-मुलींचे वर्ग, शिक्षकांशी धीटपणे बोलणारी आणि नवल म्हणजे शिक्षिकांना बाई किंवा मॅडम न म्हणता 'ताई' म्हणून हाक मारणारी मुलं-मुली, शाळेबरोबरीनीच होणारी एवढी वेगवेगळी कामं पाहून मुलींना खूप आश्चर्य वाटत होतं.डबा खाता खाता एकीनं विचारलं, ''ताई पण एवढं मोठ्ठं सगळं सुरू कुणी केलं गं?''

''बरं झालं तू विचारलं. मी आता सांगणारच होते तुम्हाला त्याबद्दल! ज्ञान प्रबोधिनीची स्थापना मा. आप्पा पेंडसे म्हणजे विनायक विश्वनाथ पेंडसे यांनी १९६२ साली केली. १९६९ मध्ये मुलांची व १९७५ मध्ये मुलींची शाळा सुरू झाली. पुण्यासारख्याच प्रबोधिनीच्या निगडी, सोलापूर, हराळी, साळुंब्रे येथे पण शाळा आहेत. आणि सगळ्या शाळांचं आपापलं असं वेगळं वैशिष्ट्य आहे. प्रबोधिनी अनेक प्रकारचं काम करते आणि त्यातून आपल्या आजूबाजूच्या सगळ्या लोकांना एकत्र आणून त्यांच्या मदतीनं आपला देश खऱ्या अर्थानं जगात 'महान' करण्यासाठी प्रयत्न करते.''

मागे बसलेल्या कोमलनं हाताची बोटं मोजली आणि मध्येच ओरडून म्हणाली, ''अगं ताई, म्हणजे प्रबोधिनी पन्नास वर्षांची झाली की...''

''अगदी बरोबर! हे प्रबोधिनीचं सुवर्णमहोत्सवीवर्ष आहे. या निमित्ताने होणाऱ्या अनेक कार्यक्रमांपैकी काही कार्यक्रमांना तुम्ही सुद्धा यायचं आहे बरं का!''

मग ताईनी अर्थातच 'छात्र प्रबोधन'च्या सौर श्रावणच्या म्हणजेच ऑगस्ट २०१२ च्या अंकाबद्दल मुलींना सांगितलं. तुम्हा मुला-मुलींना प्रबोधिनी कळावी, त्यातले उपक्रम समजावे म्हणून 'प्रबोधिनी विशेषांक' प्रसिद्ध करणार आहे. तो तुम्ही जरूर वाचणार ना! सगळ्या मुलींनी जोरात 'हो' म्हटलं. या मुली तर अंक वाचायला तयार आहेत. तुम्हीही तयार आहात ना!

**– मीरा शेटे**
२/८४ उत्कर्ष अपार्टमेंट,
महेश सोसायटी, बिबवेवाडी, पुणे 411037

सुवर्णमहोत्सवी वाटचाल
.. १९६४ ..
युवती रविवार बैठक सुरू

समोर मूर्ती मातृभूमिची, आज न काही प्रिय दुसरे ।
शुद्ध मनाचे कोंदण करुनी, तिच्या रुपाचे जडवू हिरे ।।
**शुभेच्छा ! – श्री. अमर परांजपे, सांगली**

# आजची प्रबोधिनी

**शके १९३४ (इ. स. २०१२-१३)**

**केंद्रे –** पुणे, निगडी, सोलापूर, हराळी **उपकेंद्रे –** शिवापूर, वेल्हे, शिरवळ, साळुंब्रे

**विस्तार केंद्रे –** अंबाजोगाई, डोंबिवली, बोरीवली, सांगली

**कार्यक्षेत्रे –**शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, आरोग्य, नेतृत्व संवर्धन, स्त्री शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक उद्योजकता

## १. शिक्षण -

**१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**
(माध्यमिक, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)

**२. ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक – मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकुल)

**३. ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक)

**४. शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर**

**५. ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे**
(माध्यमिक, सहनिवास)

**६. ज्ञान प्रबोधिनी, हराळी**
(प्राथमिक, माध्यमिक, सहनिवास)

**७. कृषि विद्यालय, हराळी**

**८. शैक्षणिक उपक्रम प्रशिक्षण केंद्र, पुणे**
(शिक्षक प्रशिक्षण, साधन केंद्र)

**९. छात्र प्रबोधन, पुणे**
(मासिक, स्पर्धा, प्रकाशन, उपक्रम)

**१०. अनौपचारिक शिक्षण प्रकल्प – पुणे, डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई**
(विकासिका, शिबिरे, विद्याव्रत संस्कार, उपासना केंद्र, क्रीडादल, अभ्यास गट इ.)

**११. स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे**
(केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा मार्गदर्शन)

## २. संशोधन -

**१. प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे**
(संशोधन, प्रशिक्षण, बुद्धीमापन, संवर्धन, समुपदेशन)

**२. संस्कृत संस्कृती संशोधिका, पुणे**
(संशोधन, संस्कार पोथ्या, पौरोहित्य, जनतंत्र उद्‌बोधन मंच)

**३. आयुर्वेद संशोधिका, पुणे**

## ३. ग्रामविकसन -

**१. नैसर्गिक संसाधने – गुंजवणी खोरे, हराळी**
(पाणलोट क्षेत्र विकास, सौर ऊर्जा, कृषी)

**२. स्त्री शक्ती प्रबोधन – शिवगंगा व गुंजवणी खोरे**
(बचत गट, आरोग्य, किशोरी-युवती विकास, स्वयंरोजगार)

**३. तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, शिवापूर**

**४. सर्वंकष ग्रामविकास प्रकल्प – साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई**

## ४. आरोग्य -

**१. दीनानाथ रुग्णालय व्यवस्थापन, पुणे**

**२. नेत्र रुग्णालय, शिरवळ**

## ५. नेतृत्व संवर्धन -

**१. युवक विभाग – पुणे, निगडी, सोलापूर**

**२. युवती विभाग – पुणे, निगडी**

**३. नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे**

## ६. स्त्री शक्ती प्रबोधन -

**१. संवादिनी – पुणे, सोलापूर, डोंबिवली, बोरीवली**
(समतोल द्वैमासिक, उमलत्या वयाशी जुळवून घेताना, मासिक कार्यक्रम, गप्पाकट्टा इ.)

## ७. राष्ट्रीय एकात्मता -

**१. नागरी वस्ती अभ्यासगट, पुणे**

**२. ईशान्य भारत समन्वय प्रकल्प, पुणे**
(अभ्यास सहली, मैत्री अभियाने, प्रशिक्षण)

**३. काश्मीर सौहार्द उपक्रम**

## ८. सामाजिक उद्योजकता -

**१. उद्योजकता विकास कक्ष, पुणे**

सु व र्ण म हो.. **१९६५**.. त्स वा ट चा ल
विद्युत अणु प्रयोगशाळा प्रारंभ,
गणेशोत्सव बर्ची नृत्यास प्रारंभ



स्वयंप्रकाशित अम्ही काजवे, दुष्ट ग्रहांवर मात करू ।
आकांक्षांच्या पूर्तीसाठी, मृत्यूशीही होड धरू ।।
शुभेच्छा ! – श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

प्रतिभावंत उद्यमशील प्रेरणास्रोत
नवभारत निर्माण विचारवंत अग्रणी



**मा. वि. वि. तथा आप्पा पेंडसे**
**(जन्म – १७ ऑगस्ट १९१६, मृत्यू – १९ ऑगस्ट १९८३)**

"मन विशाल समृद्ध करावे
मन प्रफुल्ल सदाचि हसावे
मन विवेकबळे उमलावे
मन त्वरे जनपदी रमवावे ।।"

# ध्येयाचा सुगंध लाभला जीवना...

**– वाच. व. सी. ताम्हनकर**

मी वयाची उणीपुरी तेहतीस वर्षं आप्पांच्या सहवासात घालवली. सर्वतोपरी नि समग्रपणे त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला. क्वचित बरोबरीच्या नात्यानं वाद केला, अनेक प्रसंगी त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वापुढे नतमस्तक झालो. आज मागे वळून पाहताना आप्पांविषयी काय वाटतं ?... अचंबा वाटतो. एका माणसाच्या जीवनाला इतके पैलू असू शकतात?

**आप्पांची बहुविध रूपं**

- 'आप्पा, कबड्डी खेळून दाखवा !' असा आग्रह लोक करत, एवढी गतिमान, आक्रमक कबड्डी आप्पा खेळत.
- आप्पांना केव्हातरी शोध लागला की आपल्याला गाता येतं. मग विविध गीतांना सुमधुर चाली देण्याचा त्यांना छंद लागला.
- बासरी तर जीवनसखी. सुखदुःखाच्या प्रसंगी एकाकी क्षणांमधला विरंगुळा असलेली बासरी. तिच्यातून स्वरांच्या आर्त, उत्कट, प्रसन्न लहरी बाहेर पडत नि आसमंत भारून टाकत.
- संघाचे प्रचारक म्हणून झोकून देऊन केलेलं काम.
- सशस्त्र क्रांतीसाठी अनंत धोके पत्करून चालवलेलं काम.
- सिंहगडाच्या माथ्यावर बसून केलेलं राष्ट्रचिंतन, विवेकानंद चरित्र आणि अन्य अनेक पुस्तकांचं त्यानंतर केलेलं लेखन, तेवढंच संघटनकुशल नि प्रेरक पत्रलेखन.

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९६६ ..
सिंहगड पायथ्याच्या कल्याण (जि. पुणे) येथे ग्रामीण शिबिर, तमिळनाडू अभ्यास दौरा

* सिंहगडाच्या पायथ्याच्या कल्याण गावापासून सुरुवात करून शिवगंगा व गुंजवणी खोऱ्यांतील १३७ गावांपर्यंत नेलेलं ग्रामविकसन कार्य.
* वाद्यबंदी मोडणं इत्यादींसारख्या राष्ट्र जागृती मंडळाच्या मोहिमा.
* राम-अशोक यांसारख्या मानस-पुत्रांचं पितृत्व करत असतानाच इतरही अनेक बुद्धिमान मुलांसाठी विशेष शिक्षणाचं चिंतन आणि प्रयोग.
* 'नेतृत्वशैली आणि नेतृत्वशिक्षण' या विषयात पीएच्.डी., नेतृत्वविकसन प्रयोगांचं उपयुक्त आणि महत्त्वाचं काम.
* मानसशास्त्र, संस्कृत-संस्कृति, आयुर्वेद यांत नव्या संशोधनाच्या गवसलेल्या दिशा.
* वैद्यकशास्त्रातले प्रयोग आणि मनःशक्तीने व्याधीमुक्ती करण्याचे प्रयोग.
* नवे औद्योगिक संबंध- उद्योगनीती निर्माण करण्यासाठी, प्रबोधिनीला स्वावलंबी करण्यासाठी सुरू केलेले उद्योग व्यवसाय.
* कोयनेपासून आंध्रपर्यंतचं आपत्ती निवारण कार्य.
* केरळ, पंजाबमधल्या सामाजिक, राष्ट्रीय समस्यांवरचं काम.
* उपनयन, विवाहादी संस्कारांची कालोचित पुनर्रचना.
* राष्ट्रीयत्व, अध्यात्म आणि विज्ञान यांसंबंधी मूलभूत मांडणी आणि सिद्धांत.
* आबालवृद्धांवर प्रेम करण्याची अपरंपार शक्ती.

केवळ वरवर पाहिलं तरी मनाला चकित करणारी अशी ही व्यक्तिमत्त्वाची आणि कार्याची व्याप्ती आणि कार्याच्या दिशा आहेत. आप्पांच्या व्यक्तिमत्त्वाला असे बहुविध रंग होते, म्हणून त्यांचा अनेकानेक क्षेत्रांतील व्यक्तींशी सहज संवाद जुळे. संबंध दृढ होत. त्यांचा प्रबोधिनीच्या

---

## *प्रतिभेला नित्य नव्या लाभती मीती...* *मा. आप्पा हे कल्पकतेचे चालते बोलते उदाहरण होते.*

प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना आपण देशाचे आणि समाजाचे काही देणे लागतो याची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी उभारलेल्या 'ज्ञान प्रबोधिनी' या शिक्षणसंस्थेतल्या मौलिकतेची दखल 'लंडन-टाइम्स'ने १९७२ मध्येच खास मुलाखतीद्वारा घेतली होती.

सामुदायिक उपासना त्यांनी नव्याने रूढ केली - 'प्रार्थना समाजा'च्या रुजू न शकलेल्या प्रयत्नांची पार्श्वभूमी असूनसुद्धा. धार्मिक संस्कारांमध्ये आधुनिक काळाला योग्य अशा सुधारणा त्यांनी केल्या - धर्मनिर्णय मंडळाच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर.

आयुर्वेदातल्या औषधांचे होमिओपथीच्या पद्धतीने सूक्ष्मीकरण ही अभिनव कल्पना त्यांनी शोधली आणि कार्यकर्त्यांच्या द्वारे यशस्वी करून दाखवली. मानसोपचारांमध्ये उपासनेचा उपयोग करण्याचे यशस्वी प्रयोग त्यांनी केले.

लेखक बनून त्यांनी तरुण मनांना ध्येयवादाचे आवाहन करणारी चरित्रे, पद्ये आणि गद्य प्रार्थना यांचे लेखन केले.

खेळाच्या मैदानावर त्यांनी 'बर्चीनृत्य' शोधले, त्यात लेझिमीप्रमाणे दोन्ही हात गुंतून पडत नाहीत आणि टिपरीनृत्याचा नाजूकपणाही नाही, तर मर्दानीपणा आहे.

व्यक्तिगत जीवनात तर ते नेहमीच प्रयोग करीत - पंधरा-वीस प्रकारची धिरडी आणि पौष्टिक पूर्णान्न बनवणे, ब्रशाऐवजी खादीच्या खरखरीत रुमालाने दात घासणे, देशी पोशाखात धोतराला सुरवारीचा अधिक सोयीस्कर पर्याय रूढ करणे, बाराबंदीऐवजी 'बारागुंडी' ही झब्ब्याची नवी तऱ्हा शोधणे, सुरेल बासरी वाजवणे, स्फूर्तिगीतांना चाली लावणे, ॲलेक्झांडर ड्यूमाच्या कादंबऱ्यांचे कथाकथन करणे असे त्या कल्पकतेचे असंख्य आविष्कार !

एक शिक्षक आणि संघटनाप्रमुख म्हणून त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांकडून आणि कार्यकर्त्यांकडून सतत नावीन्याची अपेक्षा केली आणि ते दिसताच त्याला उत्तेजन दिले.माझे प्रतिभाविषयक संशोधन चालू असताना त्यांनी, ते व्यवहारात वापरण्याजोगे असले पाहिजे असे आग्रहाने सुचवले.

*(डॉ. **अशोक निरफराके** यांच्या 'कल्पक बनूया' या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेतील काही भाग)*

सु व र्ण म हो.. **१९६७**.. त्स वा ट चा ल
कोयना भूकंप मदतकार्य, यंत्रशाळेची पुण्यात सुरुवात, पूर्वांचल अभ्यास दौरा



**तुम्ही अम्हाला इथे शिकविले इतरांसाठी जिणे।
घोर जरी अंधार भोवती तरुणांनी का भिणे ?**
। डोळस व्हा आणि हिंमतीने पुढे चला !। **शुभेच्छा ! - डॉ. सतिशचंद्र गोरे, पुणे**

कार्याला लाभ होई. आप्पांचा लोकसंग्रहसुद्धा आश्चर्य वाटेल इतका मोठा! कल्याणपासून कॅनडापर्यंत सर्वदूर तो पसरलेला आहे.



**स्वप्नं खरी करणारा माणूस**

आप्पा म्हणत, 'मी स्वप्नं पाहणारा माणूस आहे.' खरंच होतं ते. पण अचाट परिश्रम, प्रतिभा आणि अतिप्रबल अशी इच्छाशक्ती यांनी त्या स्वप्नांना सत्यसृष्टीत आणण्याचं सामर्थ्य आप्पांमध्ये होतं; यात आप्पांचं मोठेपण आहे. *'क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे!'*(कार्यसिद्धी होणे हे साधनांवर अवलंबून नसते तर व्यक्तीच्या मनोबलावर अवलंबून असते.) ही उक्ती त्यांच्या बाबतीत अक्षरशः खरी होती. साध्याला महत्त्व देऊन आपलं सत्त्व ते त्यात ओतत. साधनं पाठीमागून येतील असा त्यांचा विश्वास असे, आणि तशी ती येतही. प्रबोधिनी हा अक्षरशः शून्यातून साकारलेला संकल्प आहे. माणसं नाहीत, जागा नाही, पैसा नाही, पण काम उभं करण्याच्या इच्छेपाठोपाठ सारं आलं. आम्हां सर्वांना अनुभव आहे की त्यांनी मांडलेली कल्पना प्रथमदर्शनी अवास्तव वाटे. 'हे कसं शक्य आहे? काहीतरीच काय?' अशी प्रतिक्रिया येई. आणि कालांतरानं उमजे की आप्पा म्हणत होते ते बरोबर होतं. एक खांडसरी साखर कारखाना यशस्वी झाला नाही एवढं सोडलं तर आप्पांनी उद्योग क्षेत्रातसुद्धा ज्या ज्या कल्पना मांडल्या, त्यांच्या पोटी यशाची बीजं होती. काही ठिकाणी यश आलं, काही ठिकाणी आलं नाही. जिथे यश आलं नाही, तिथे आप्पांच्या अपेक्षांना आम्ही पुरे पडलो नाही हे कारण आहे.

**दृढ आणि लवचिक**

सौर कालगणना रूढ करायला हवी- ती विज्ञानाला धरून आहे- भारतीय आहे आणि शासनानं मान्य केलेली आहे, हे लक्षात आल्यावर आप्पांनी तिच्या प्रचारासाठी काय काय करावं? ज्योतिर्विदांच्या भेटी घेतल्या, सभा योजल्या, प्रबोधिनीची सौर पंचांग कालिका (कॅलेंडर) छापायला सुरुवात केली. विदेशी इतिहासकार भारतीय संस्कृतीचा काळ अलीकडे आणण्याच्या प्रयत्नात असतात. पण भारतीयांना कळावं म्हणून भारतात धर्मकार्यात, व्यापारी वर्गात प्रचलित असलेला विक्रम संवत् त्यांनी रूढ केला. आपल्याला इंग्रजी दिनांकांचं इतकं वळण पडलेलं आहे की प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांनासुद्धा अजून सौर कालगणना वापरायला अडचण वाटते. पण विज्ञानसंगत गोष्टी आपण स्वीकारल्या पाहिजेत, जगाला स्वीकारायला लावल्या पाहिजेत, असा आप्पांचा आग्रह होता.

पुष्कळदा लोकांना आप्पांचा आग्रह दिसे पण त्यामागचा विचार माहीत नसे. विदेशी पोशाखाला आप्पांचा विरोध होता. अगदी निकटवर्ती कार्यकर्त्यांनी पँट-सूट घातला तर त्यांना फार दुःख होई. लग्नात कार्यकर्ते सूट-पँटमध्ये दिसले तर कधी कधी राग येई. यामागे सूट-पँटचा राग नव्हता. आमच्या स्वतंत्र बुद्धीला पोषाखाच्या नवीन तऱ्हा का सुचू नयेत? सदैव आम्ही अनुकरणच करत राहणार का? आमच्या प्रतिभेनं आम्ही पोषाखांच्या आकर्षक शैली का निर्माण करू शकत नाही? असं हे लोकांच्या अनुकरण बुद्धीबद्दलचं दुःख असे. ते स्वतः सुरवार, झब्बा, कधी कधी वर कोट आणि मस्तकावर शुभ्र टोपी असा पोषाख करत. तो त्यांना अत्यंत शोभून दिसे. पण युवकांनी तऱ्हेतऱ्हेचे झब्बे शिवावेत, गुंड्या, नक्षी यांत प्रयोग करावेत यासाठी त्यांचं उत्तेजन असे. ते स्वतःही याबाबत नवनवीन प्रयोग करत. मुलींनाही ते म्हणत- तऱ्हेतऱ्हेच्या माळा, दागिने, कुंडलं करून पाहा ! सर्व क्षेत्रांतल्या नवीन सुचण्याला त्यांचा मनापासून पाठिंबा असे. नवीन यंत्रं तयार करण्यापासून ते

सुवर्ण महोत्सवी वाटचाल
.. १९६८ ..
सुरत पूर मदतकार्य

तुमच्या कर्मरतीतुन अमुच्या मनि आहे रुजला ।
'कर्मातच ज्ञानाचे सार्थक'-हा तुमचा सांगावा ।।
शुभेच्छा ! – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

खाद्यपदार्थ तयार करण्यापर्यंत! 'रसमयी' उद्योगाच्या 'चंपाकळी' या खाद्यपदार्थाचं आणि जांभळाच्या 'जमुना' नावाच्या सरबताचं ते इतकं रसभरित, काव्यमय वर्णन करत की ऐकणाऱ्याच्या तोंडाला पाणी सुटावं ! एकूण नावीन्याची ओढ हा आप्पांचा स्थायी भावच.

**क्षणक्षणा सांभाळावे**

प्रबोधिनीच्या सर्व कार्यकर्त्यांवर- माझ्यासह- त्यांनी अपरंपार प्रेम केलं. संघातले एक मित्र सांगतात की त्यांना बेचाळीस दिवसांचा भयंकर टायफॉइड झाला होता. यातून शुश्रूषा करून आप्पांनी त्यांना अक्षरशः मृत्युमुखातून बाहेर ओढून काढलं. सुभाषला (श्री. सुभाषराव देशपांडे, ज्ञान प्रबोधिनीचे सध्याचे कार्यवाह) दोनदा टायफॉइड झाला होता त्या वेळी आप्पांनी खूप जपलं, औषधं दिली. प्रबोधिनीतल्या कोणाचंही दुखत-खुपत असलं, कार्यवाहांपासून भैयाजींपर्यंत तर त्याची काळजी आप्पांना असे.

प्रबोधिनीचं वेड मुलांना - कार्यकर्त्यांना का लागतं? त्यामागची प्रेम ही संजीवनी आहे. असं छोट्या छोट्या गोष्टी जपणारं आप्पांचं प्रेम. प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनःस्थितीची त्यांना काळजी. समर्थांनी म्हटलं आहे,

*'क्षणक्षणा सांभाळावे बदलेल म्हणोनि।'*

तसे आप्पा क्षणाक्षणाला सांभाळत. एखाद्यानं विशेष यश मिळवलं तर ते कौतुक करत; पण 'अहंकाराचा वारा, न लागो राजसा' असंही म्हणत. बुद्धिमान विद्यार्थ्यांचं शिक्षण ही गोष्ट सोपी नाही. अहंकाराचे कंगोरे काढून

---

## *आप्पा... एक अदम्य उत्कट चैतन्य !*

...'आप्पा' हे रसरसत्या चैतन्याचं जिव्हाळ्याचं नाव. उत्कटता हा त्या चैतन्याचा स्वभाव होता. उत्तुंगता ही ओढ होती. 'रूप पालटू देशाचे' हा ध्यास होता. संकल्प आणि सिद्धी, स्वप्नं आणि त्यांची पूर्ती, यांच्यातलं प्रचंड अंतर पाहून हे चैतन्य कधी खंतावत असे तर कधी दाहकही होत असे. पण हृदय भरभरून प्रेम करणं हाच या चैतन्याचा मनोधर्म होता. तारूण्य हे परमेश्वरानं त्याला दिलेलं वरदान होतं. त्यामुळे काळाची झळ त्याच्या वृत्तींना कधी पोचली नाही. सदा सतेज, नवनवीन उन्मेषांनी बहरणाऱ्या त्याच्या प्रतिभेला उदासीनतेचा स्पर्शच झाला नाही. ती सदैव गतिमानतेनं काळापुढे झेपावत राहिली. आत्यंतिक शारीरयातनेतही हे चैतन्य केवळ दुर्दम्य राहिलं. अशक्य ते शक्य करण्याची ईर्षा स्वतःच्या आणि इतरांच्या मनात फुलवत राहिलं.

आप्पा म्हणजे -

- हिंदुस्थानच्या नवरचनेची स्वप्नं ज्याच्या द्रष्ट्या प्रतिभेनं पाहिली असा एक स्वप्नद्रष्टा
- ज्याच्या कुशल, समर्थ हातांनी ती स्वप्नं सत्यात आणण्याचा ध्यास घेतला असा एक समाजशिल्पी
- स्वातंत्र्योत्तर कालातील युवकशक्तीला कोणतं शिक्षण द्यावं, त्यांच्यात नेतृत्वगुण, नेतृत्वप्रेरणा कशी निर्माण करावी याचा वस्तुपाठ घालून देणारा कर्ता चिंतक
- भारतीय राष्ट्राचं प्रबोधन करण्याचं साधन म्हणून 'ज्ञान प्रबोधिनी' निर्मिणारा आद्य प्रबोधक
- शिक्षण, संशोधन, ग्रामविकास आणि उद्योग या क्षेत्रांत जोमानं भरारणाऱ्या प्रबोधिनीच्या कार्यामागचा प्रेरणास्रोत
- स्वामी विवेकानंदांचं तेजरसपूर्ण अध्यात्म आणि समाजप्रामाण्यावर आधारलेला व्यापक-समावेशक हिंदुत्वविचार यांचं विलक्षण रसायन घडवणारा विचारवंत
- प्राचीन अध्यात्म आणि विश्वरचनाशास्त्र यांची आधुनिक विज्ञान, आधुनिक मानसशास्त्र यांच्याशी सांगड घालत राष्ट्ररचनेचं आणि धर्मसंस्थापनेचं नवीन तत्त्वज्ञान मांडणारा दार्शनिक
- ज्याच्या जीवनाला निष्कांचनता, पावित्र्य आणि समर्पण यांचा सुगंध होता, असा एक विरागव्रती संन्यासी
- शतावधी कन्यापुत्रांचा कुटुंबवत्सल मानस-पिता

(मा. आप्पांच्या चरित्र ग्रंथाच्या लेखिका **वा. स्वर्णलता भिशीकर** यांच्या मनोगतातील काही भाग)

सु व र्ण म हो.. १९६९.. वा ट चा ल

युवक प्रशाला प्रारंभ, धारक उद्योगाची सुरुवात, कल्याण येथे बंधारे, विहिरींचे काम सुरू



बळ अमुच्या पंखांतुन वाहे ती तुमची माया ।
त्या मायेची ऊब लाभुनी तेज मिळे सद्भावा ।।
शुभेच्छा ! - श्री. गौरव सहस्रबुद्धे, डोंबिवली

टाकल्याशिवाय श्रेष्ठत्व नाही, हे ते पुनःपुन्हा कार्यकर्त्यांना सांगत. एका म्यानात दोन तलवारी राहात नाहीत असा अनुभव आहे. आप्पांना शेकडो तल्लख धारेच्या तलवारी एका म्यानात नांदवायच्या होत्या. समर्पण वृत्तीचे, बुद्धी आणि श्रद्धा या दोन्हींचा संगम झालेले कार्यकर्ते घडवायचे होते. त्यासाठी परमेश्वर शिवाजीमहाराज वा अन्य कुणाला पाठवून देईल, अशा दैववादाच्या भरवशावर ते नव्हते. प्रयत्न, पुरुषार्थ, 'विवेके क्रिया आपुली पालटावी' यांवर त्यांचा भर असे.

कडकडीत वैराग्य एके काळी पाळणाऱ्या आप्पांना नंतर जाणवलं की स्त्री ही एक मोठी शक्ती आहे. ती मातृशक्ती आहे. तिची उपेक्षा करून चालणार नाही. स्त्रीशक्तीचं या कार्यात योगदान घडवणं शक्य होईल का? ...या विचाराने आप्पांनी स्वतः युवती संघटना घडवण्यात लक्ष घातलं. आज ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यात महत्त्वाचं योगदान करणाऱ्या अनेक स्त्रिया-युवती आहेत. परस्परांविषयी आदर ठेवून- उचित अंतर ठेवून काम करण्याचं, स्त्रियांचं आणि पुरुषांचंही आरोग्यपूर्ण शिक्षण प्रबोधिनीत होत आहे.

**वेध प्रवाही जीवनाचा**

१९६२ नंतरचं आप्पांचं जीवन आणि प्रबोधिनीचं कार्य हे बव्हंशी एकरूपच आहे. आप्पांचं पूर्वीचं जीवन आणि नंतरचं जीवन यांत आपल्याला लक्षणीय फरक जाणवतो. आधीच्या जीवनात संघर्ष, वैचारिक आणि भावनिक आंदोलनं आहेत. प्रबोधिनीच्या स्थापनेनंतर आप्पांच्या जीवनप्रवाहातील हे कल्लोळ कमी झालेले दिसतात. वृत्ती अधिक व्यापक, समावेशक झालेली दिसते. विविध राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक संस्था, त्यांचे कार्यकर्ते यांच्याशी आपुलकीनं संवाद करणारी; त्यांचं स्वागत, गुणग्रहण करणारी; अधिक उदार अशी झालेली दिसते.

गेल्या वीस वर्षांत ज्ञान प्रबोधिनीचे अनेकानेक क्षेत्रांतील व्यक्तींशी, पक्षनिरपेक्ष, केवळ देशहितसापेक्ष असे संबंध जुळले. आप्पांचे १९६२ पूर्वी ज्यांच्याशी वाद झाले होते, कटुता निर्माण झाली होती, त्यांच्याशीही पुन्हा नव्याने संवाद जुळला. संबंधांत प्रसन्नता आली. आप्पा हा काही लौकिकाआगळा गुणसमुच्चय होता.

१९६२ ते १९८३ या काळात आप्पांनी फार महत्त्वाचं जर काही केलं असेल तर ते म्हणजे प्रबोधिनीची मजबूत वैचारिक बांधणी आणि कार्यपद्धतीची पायाबांधणी. आणि ती तरी कशासाठी? ती केवळ एका आगळ्यावेगळ्या शिक्षणसंस्थेसाठी नव्हे. तर आप्पांना जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारं एक सर्वंकष तत्त्वज्ञान मांडायचं होतं. त्यात शिक्षण, धर्म, कला, वाङ्मय, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, कौटुंबिक जीवन आणि जीवनाच्या अन्य सर्व अंगांबाबत काही मांडणी करायची होती. अध्यात्माचा पाया असलेलं, समाजसंघटनेची मजबूत बांधणी असलेलं, विज्ञानाचा प्रकाश असलेलं, संस्कारांच्या मंगल चिन्हांनी पवित्र-सुशोभित झालेलं, पुरुषार्थ-पराक्रमाच्या स्तंभांवर तोललेलं आणि *'कृण्वन्तो विश्वमार्यम्'* (पराक्रमाने सर्व विश्वाचे उन्नयन साधू) या शुभाकांक्षेचं शिखर असलेलं असं भारतीय राष्ट्रजीवनाचं एक मंदिर त्यांना उभवायचं होतं. यालाच त्यांनी नाव दिलं आहे- धर्मसंस्थापना.

**धर्मसंस्थापना**

*धर्मसंस्थापनेचे नर, ते ईश्वराचे अवतार।*
*मागे झाले पुढे होणार, देणे ईश्वराचे ॥*

या देशात कर्मकांडाच्या जागी खऱ्या, तेजस्वी धर्माची प्रतिष्ठापना करण्याचा ज्यांनी प्रयत्न केला, त्यांच्या मालिकेत विनायक विश्वनाथ पेंडसे हे नाव गुंफावं लागेल.

('ज्ञान प्रबोधिनी संस्थापक - आप्पा पेंडसे' या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेचा काही भाग)

**– वाच. व. सी. ताम्हनकर**
ज्ञान प्रबोधिनीचे द्वितीय संचालक
ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्राचे प्रमुख

सु व र्ण म हो.. **१९७०**.. त्स वा ट चा ल
प्रज्ञा मानस संशोधिका प्रारंभ,
युवक प्रबोध दलांना प्रारंभ

समकृती समकृती समकार्य, हृदयस्पंदन घडो मन एक।
विमल हेतु स्फुरो नवनीत, विमल राष्ट्र घडो अभिजात।।
**शुभेच्छा ! – श्री. श्रीकांत कुलकर्णी, ठाणे**




**बसलेल्या ओळीतील व्यक्ती (डावीकडून) -**

१. प्रा. विसुभाऊ गुर्जर (M.A., B.Ed.) संस्कृततज्ज्ञ, संत्रिका प्रमुख, लेखाधिकारी, सहकार्यवाह
२. मा. भाऊ / वामनराव अभ्यंकर (M.A., B.T.) शिक्षणतज्ज्ञ, निगडी केंद्र प्रमुख, 'पंचकोशाधारित गुरूकुल'चे प्रणेते
३. मा. अण्णा / व. सी. ताम्हनकर (B.Com., M.Ed., M.A., Ph.D.) शिक्षणतज्ज्ञ, द्वितीय संचालक, हराळी केंद्र प्रमुख
४. वा. गिरीशराव बापट (M.Sc., Ph.D., M.Ed., DBM) शिक्षणतज्ज्ञ, विद्यमान संचालक
५. मा. सुभाषराव देशपांडे (M.A., M.B.A.) ग्रामविकसन प्रमुख, कार्यवाह
६. मा. यशवंतराव लेले (M.A., B.T.) ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे पहिले प्राचार्य, संत्रिका मार्गदर्शक
७. वा. लताताई भिशीकर (M.A., Ph.D.) शिक्षणतज्ज्ञ, हराळी केंद्र उपप्रमुख

**उभ्या ओळीतील व्यक्ती (डावीकडून) -**

१. वा. विवेकराव कुलकर्णी (M.Tech., Ph.D.) शिक्षणतज्ज्ञ, स्पर्धा परीक्षा केंद्र मार्गदर्शक, कार्यकर्ता प्रशिक्षण प्रमुख
२. प्रा. विवेकराव पोंक्षे (M.Sc., B.Ed.) शिक्षण प्रभाग उपकार्यवाह, शैक्षणिक उपक्रम केंद्र प्रमुख, सोलापूर केंद्र कार्यवाह
३. प्रा. व्यंकटराव भताने (M.A., B.Ed.) मुख्याध्यापक ग्राम प्रबोधिनी विद्यालय साळुंब्रे, साळुंब्रे उपकेंद्र प्रमुख
४. वा. अनघाताई लवळेकर (M.A., B.Ed., Ph.D.) मानसज्ज्ञ, संशोधिका, 'संवादिनी' संघटक
५. प्रा. हर्षाताई किरवे (B.Com., M.A., M.S.W) नागरीवस्ती अभ्यासगट प्रमुख
६. प्रा. मनोज देवळेकर (B.Sc., M.P.Ed.) क्रीडातज्ज्ञ, क्रीडाकुल मार्गदर्शक, निगडी केंद्र उपप्रमुख
७. श्री. ज्ञानेश्वर सावंत (ITI, CTI.) निगडी केंद्र, संपर्काधिकारी
८. प्रा. महेन्द्रभाई सेठिया (B.E., M.Ed.) शिक्षणतज्ज्ञ, संपादक छात्र प्रबोधन, नेतृत्व संवर्धन केंद्र प्रमुख
९. श्री. यशवंत लिमये (B.E., MBA.) निगडी केंद्र व्यवस्थापक, चिखली उपक्रम केंद्र प्रमुख



**डावीकडून -** १. वा. उषाताई खिरे (M.A. Ph.D.) मानसज्ज्ञ, प्रज्ञामानस संशोधिकेच्या मार्गदर्शिका
२. वा. सुजलताई वाटवे (M.A. Ph.D.) मानसज्ज्ञ, प्रज्ञा मानस संशोधिका प्रमुख
३. श्री. प्रसाद चिक्षे (B.E., M.Tech.) अंबाजोगाई विस्तार केंद्र,प्रमुख सचिव - विस्तार कार्य

सुवर्ण महोत्सवी वाटचाल
.. १९७१ ..
शिवापूर येथे विस्तारित यंत्रशाळेची सुरुवात



समर्पणाची हाक जयांच्या हृदयाला कळली ।
अजिंक्य झाले राष्ट्र तयांचे अभेद्य बलशाली ।।
**शुभेच्छा ! - श्री. अजित परांजपे, पुणे**

# विकसता विकसता विकसावे...

ज्ञान प्रबोधिनीच्या ५० वर्षांच्या वाटचालीत त्या–त्या दशकामध्ये विद्यार्थी म्हणून प्रबोधिनीच्या संपर्कात आलेल्या ५ विद्यार्थी–विद्यार्थिनींची ही मनोगते ! त्या त्या काळातल्या प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेचा त्यांच्यावर कसा आणि किती ठसा उमटला, त्याचा त्यांच्या पुढील वाटचालीवर कसा प्रभाव पडला याचे चित्र या लेखांमधून तुम्हाला उलगडत जाईल. इथल्या शिक्षणप्रक्रियेतील प्रयोगशीलता, स्वयंअध्ययनावर भर देणारी प्रकल्प पद्धती, एकाच वेळी अनेक कामांमध्ये स्वत:ला झोकून द्यायला लावणारे विविधांगी उपक्रम, छोट्या वयातही मोठ्या जबाबदाऱ्या घ्यायला शिकवणारे प्रसंग, सामाजिक परिस्थितीचं भान आणि देशावरील संकटप्रसंगी धावून जाण्याची वृत्ती जोपासणारे अनुभव, विविध कौशल्यांच्या प्रशिक्षणाबरोबच प्रबोधिनीच्या उद्योग, ग्रामविकसन, संशोधन इ. क्षेत्रातल्या कार्याचा आणि कार्यकर्त्यांचा लाभलेला सहवास, धुंद आणि घरपण जपणारं वातावरण, प्रार्थना–उपासनेतून मिळणारं आत्मिक बळ अशा अनेक पैलूंनी प्रबोधिनीची शिक्षणप्रणाली समृद्ध झालेली तुम्हाला या मनोगतांमधून जाणवेल.



## असु अम्ही सुखाने पत्थर पायातील...

**– वाच. अशोक निरफराके**

(प्रबोधिनीच्या 'प्रबोधशाळे'च्या पहिल्या तुकडीचे विद्यार्थी. १९६४ मध्ये इ. अकरावीत महाराष्ट्रात सर्वप्रथम. प्रबोधिनीमध्ये दीर्घकाळ प्रज्ञा मानस संशोधिकेत कार्यरत. 'कल्पक बनूया', 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास', 'Be Creative' या पुस्तकांचे लेखक.)

वयाच्या पंधराव्या वर्षी मी प्रबोधिनीच्या संपर्कात आलो. माझे वडील म. गांधींच्या काँग्रेसमध्ये, आईवर महात्मा फुल्यांच्या विचाराचा प्रभाव, तर मोठा भाऊ राष्ट्रसेवा दल आणि समाजवादी चळवळीत. प्रबोधिनीत आल्यापासून मी आप्पांच्या नित्य सहवासात होतो. माझ्या जडण-घडणीवर मुख्य प्रभाव पडला तो त्यांचाच.

दहावी ते बी.ए. असा १९६२ ते १९६९ हा काळ मी स्वत:च्या जडणघडणीचा काळ म्हणेन. प्रबोधिनीतील आणि बाहेरचेही असे अनेक प्रभाव माझ्यावर पडत होते. आप्पांचा जसा माझ्यावर मुख्य प्रभाव होता; तसेच यशवंतराव लेले, अण्णा (व. सी. ताम्हनकर), पुष्पाताई आगाशे, भास्करराव कोल्हटकर अशा प्रबोधिनीच्या सदस्यांचा आणि शिक्षकांचाही माझ्यावर प्रभाव पडत होता. आप्पांना नवीन कल्पना सुचत तेव्हा पहिले प्रयोग अनेकदा माझ्यासारख्या नित्य सहवासातल्या मुलांवर होत. उपक्रम आणि नवीन कल्पना सुचण्याच्या प्रक्रियेचेसुद्धा अनेक अनुभव येत होते. त्यातून वैचारिक उपक्रमांचा प्रभाव तर जास्तच! साम्यवाद, समाजवाद इ. विविध विचारसरणींच्या पूर्वग्रहरहित अभ्यास शिबिरांमुळे प्रबोधिनी आणि आप्पांविषयीचा माझा आदर आणखीन वाढला. १९६२ ते १९६९ या काळात संध्याकाळचे तीन तास प्रबोधशाळा चालत

सुवर्णमहोत्सवी वाटचाल .. **१९७२** ..
युवती प्रबोध शाळा प्रारंभ,
ज्ञान प्रबोधिनी खंड १ प्रकाशित

**इथे याच मातीत योद्धे नि योगी, इथे मल्लविद्या, धनुर्वेद अस्त्र ।
घडो तेथ क्रीडाप्रयोगी समर्थ, जिथे भीम झाले जिथे वायुपुत्र ।।
शुभेच्छा ! – श्री. विद्याधर सहस्रबुद्धे, डोंबिवली**



**श्री. द. वा. पोतदार व श्री. कोटीभास्कर यांच्या उपस्थितीत सभेत भाषण करताना श्री. अशोक निरफराके**

असे. त्यात विविध शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांमधून बुद्धिमान मुलांची निवड करून त्यांच्यासाठी खेळ, क्रमिक अभ्यासाचे तास आणि देशस्थितीचा अभ्यास असा दैनंदिन कार्यक्रम असे. त्याशिवाय अनेकविध उपक्रमांची जोड त्यास मिळत होती. प्रबोध शाळेच्या त्या काळात तर काही आंदोलनंही केली. आप्पांच्या सहवासात विचार आणि कृती दोन्हीमुळे भरपूर जडणघडण होत होती.

''असू अम्ही सुखाने पत्थर पायातील
मंदीर उभविणे हेच आमुचे शील...''

या ओळींप्रमाणे आप्पा म्हणत की, ''आपली पिढी पायातील दगड असणार आहे.''

प्रबोधिनीच्या दलावर (संध्याकाळी क्रीडांगणावर) तेव्हा NCC च्या आज्ञा शिकण्यासाठी माजी सैनिकांना संचलन शिकवायला बोलावलं होतं. घरोघरी जाऊन आम्ही विद्यार्थ्यांना दलासाठी बोलावून आणायचो. सुरुवातीला रामभाऊ डिंबळे कार्यवाह होते तर मी मुख्य शिक्षक. कबड्डी, खो-खो, लंगडी याच्या बरोबरीनं प्रबोधिनीच्या दलावर फुटबॉल हा पाश्चात्त्य खेळ असावा की नाही अशी चर्चा त्यावेळी झाली. तेव्हा एकाने विवेकानंदांच्या 'फुटबॉल खेळून तुम्हाला गीता अधिक चांगली समजेल' या वाक्याचा दाखला दिला. मग बैठकीत निर्णय होऊन दलावर फुटबॉल सुरू झाला.

पोषाख स्वदेशी असावा, याबाबत आप्पांचा सतत आग्रह असे. पुण्याच्या स. प. महाविद्यालयात जात असताना रामभाऊ डिंबळे आणि मी सुरवार झब्बा घालायला सुरुवात केली. अनेक दिवस लोक आमच्याकडे 'हे काय?' म्हणून बघत. चित्रपटात सुरवार-झब्बा घातलेला राजेश खन्ना पाहिल्यानंतर लोकांना आमच्या वागण्यात तऱ्हेवाईकपणा वाटेनासा झाला. खरंतर 'पोषाख भारतीय असावा' हा विचार त्यामागे होता. अर्थात भारतात पोषाखाची तर खूप विविधता म्हणजे पुरुषांच्या बाबतीत धोतर, लुंगी, पायजमा, सुरवार आणि टोप्या, फेटे, पागोटी यांचे प्रकार! तेव्हा ''शिवाजी महाराजांनी घोड्यावर बसून लढण्यासाठी जो पोषाख वापरला तो हा'' असं सांगून आप्पांनी सुरवार-झब्बा निवडला.

खेळ, पोषाख, बैठका, दल, शिबिरं आणि मोठ्या उपक्रमांबरोबरच या काळात अनुभवलेला फारच मोठा आणि सुन्न करणारा अनुभव म्हणजे १९६७ साली झालेला कोयनेचा भूकंप. प्रबोधिनीत तेव्हा वार्षिक सभेचा मोठा कार्यक्रम होत असे. महिनाभर आधीपासून या सभेची तयारी सुरू असे. त्याही वर्षी सभेची अशीच मोठी तयारी झाली होती. त्या वर्षीच्या वार्षिक सभेच्या आदल्या दिवशी हा भूकंप झाला. मात्र सभेचा कार्यक्रम बाजूला ठेवून आप्पा, अण्णा आणि वसंतराव वैद्य तडक कोयनानगरपर्यंत गेले. दूरध्वनी उपलब्ध होताच त्यांचा भाष आला की 'खूप मदतकार्याची गरज आहे. कोयनानगर संपूर्ण उद्ध्वस्त झाले आहे.' तिथल्या एका केशकर्तनालयाच्या टपरीत कार्यालय उभे करून मदतकार्याला सुरुवात झाली. मी आजारी होतो त्यामुळे सुरुवातीच्या गटाबरोबर गेलो नव्हतो, परंतु जाता न आल्याची अस्वस्थता मनात होती. शेवटी मी तिकडे जायचंच असं ठरवलं. आप्पा पुण्यात आले तेव्हा मी तिकडे गेलो. यशवंतरावांनी मला कार्यालय सांभाळायची जबाबदारी दिली. गटागटानी ठरवलेली मदतकार्यं पार पडत होती. खालच्या वस्तीच्या गावांमध्ये मदत पोहोचत होतीच; त्यामुळे डोंगरात वरच्या भागात किंवा आतल्या गावांकडे मोर्चा वळवायचं ठरलं. एक दिवस सूर्यास्तानंतर एक माणूस मदत मागायला आला. सूर्यास्तानंतर शक्यतो कुणी येत नसे, त्यामुळे तेव्हा मदतकार्य बंद होत असे. या माणसाने एका शर्टची मदत मागितली. कपडे तर

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९७२..
आप्पांचा युरोप दौरा,
प्रतिज्ञाग्रहणाचा पहिला कार्यक्रम


सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमात्र येथे । सर्वार्थांनी रत्नवंत हो क्षेत्रक्षेत्र येथे ।।
। दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा ।
शुभेच्छा ! – डॉ. कीर्ती आपटे, पुणे ☎ ९४२२०१७१७५

संपलेले होते. 'उद्या सकाळी या' असं मी त्यांना सांगत असतानाच भास्कररावांनी स्वत:चा सदरा काढून त्या माणसाला दिला. असे करता येऊ शकते, हे मला तेव्हा सुचलेच नव्हते... त्यानंतर अनेक दिवस ते नुसत्या बनियनवर फिरत सगळीकडे मदत करत होते. आकड्यांमध्ये म्हणायचे तर १३० गावांत प्रबोधिनीचे कार्यकर्ते पोहोचले. ३५० गावांत वैद्यकीय मदत पोहोचवली. हजारो लोकांना साहाय्य केलं. यापेक्षा महत्त्वाचं झालं ते असं की, प्रबोधिनीत एक महत्त्वाचा परिपाठ पडला. आपल्या समाजावर जेव्हा कोणतीही आपत्ती कोसळते तेव्हा प्रबोधिनीय मागे राहूच शकत नाहीत. ती आपत्ती दूर करायला ते सर्वस्वानं उभे राहतात. वार्षिक सभा पुढे ढकलून कोयनेला फटफटीवरून धावत पोहोचलेल्या आप्पांनी हा वस्तुपाठ घालून दिला. मदतकार्याच्या काळात तिथल्या एका गुलाब उद्यानात रोजची प्रार्थना होई. आजूबाजूला सगळं उद्ध्वस्त झालेलं आणि प्रार्थना करताना बागेत मात्र गुलाब फुललेले... या प्रार्थनेचा मनावर खूप खोलवर ठसा उमटला.

माझी ग्रामीण कार्याची सुरुवात झाली ती कल्याणला झालेल्या श्रमशिबिरांपासून. कल्याण गावात शौचकूप बांधायचं पहिलं शिबिर होतं; तर दुसऱ्यामध्ये रस्ता आणि मोऱ्या बांधणी असं काम होतं. तिसऱ्या शिबिराच्यावेळी बंधारा बांधण्याचं काम होतं. या शिबिरांमध्ये सामाजिक विषमतेच्या निर्मूलनाचं काम प्रबोधिनीशी अगदी जवळून जोडलेलं असल्याचा अनुभव आला. एका शिबिराच्या काळात आप्पांनी गावातून बाजूला पडलेल्या उपेक्षित हरिजनवाड्यात भजन केलं आणि नंतर चहा मागवला. गावातील इतर लोकांना हो-नाही करत का होईना, चहा घ्यावाच लागला. प्रबोधिनीत आल्यापासूनच आपण आणि आपलं काम समाजासाठी आहे, हे सतत अशा घटनांमधून कळत होतं.

यशवंतराव, भास्कररावांबरोबर झालेला वारली आदिवासी अभ्यासदौरा, नंतर हिंदी विरोधी आंदोलन सुरू असताना तमिळनाडूमध्ये अण्णा दुराई, करुणानिधी अशा व्यक्तींपासून पानवाल्यांसारख्या सर्वसामान्य लोकांच्या घेतलेल्या मुलाखतींचे अनुभव आजदेखील संस्मरणीय आहेत. कुठल्याही प्रश्नावर, संकल्पनेवर, खोलवर माहिती गोळा करणं हे प्रबोधिनीचं वैशिष्ट्यच आहे. अभ्यास दौरे, शिबिरं, वैचारिकं यांनी प्रबोधिनीतल्या कार्यकर्त्यांची जडणघडण आजही चांगल्या पद्धतीनं होत असणार आणि यातून प्रबोधिनीच्या कार्यासाठी नव्या दमाची पिढी घडत असणार असा विश्वास आहे.

**– वाच. अशोक निरफराके**

'भवानीकृपा', २६०, सहकार नगर क्र. १, पुणे 411009


(नचिकेत नित्सुरे यांनी घेतलेल्या मुलाखतीचा संपादित अंश)



# प्रेरणा विकसित करणारी प्रबोधिनी

**– राजेंद्र वैद्य**

(१९७८ च्या दहावीच्या तुकडीचे प्रशालेचे विद्यार्थी, युवक विभागात काही काळ कार्यरत. सध्या रेम्युनन्स सिस्टिम प्रा. लि. चे संस्थापक कार्यकारी संचालक)



का माहीत नाही पण प्रबोधिनी आणि प्रबोधिनीचे विद्यार्थी हा माझ्या महाविद्यालयातील सर्वच गटामध्ये चर्चेचा विषय असे. कधी आदराने, कधी चेष्टेने, मला वेगळेपणाची जाणीव करून दिली जायची. पाचवीत IQ test घेऊन प्रवेश हासुद्धा त्याकाळी पुण्यात मोठा चर्चेचा विषय होता. शाळेत प्रवेश घेण्यासाठी नाही पण बघू आपला मुलगा हुशार आहे का, हे तपासण्यासाठी माझ्या पालकांनी मला या प्रवेश परीक्षेस बसवलं होतं. प्रवेश मिळाल्यावर अशा विचित्र शाळेत प्रवेश घ्यायचा का नाही याविषयी आमच्या घरी खूप चर्चा झाल्याचं आठवतं.

पाचव्या मजल्यावरच्या उपासना मंदिरात, २००३

सुवर्ण महोत्सवी वाटचाल

.. १९७३ ..

मार्क्सवाद अभ्यास शिबिर

विश्वास हा मनीचा सांगू उभ्या जगाला ।
आम्ही रवी उद्याचे, अंधार भेदण्याला ।।
शुभेच्छा ! – श्री. सुधीर विष्णु दफ्तरदार, पुणे

साली दहावीला २५ वर्षं पूर्ण झाली म्हणून सर्व वर्गमित्र जमलो होतो आणि जेवणाबरोबर नॉस्टॅल्जिक (भूतकाळातल्या आठवणींच्या) गप्पा सुरू झाल्या...

''अरे, मी पाचवीची टेस्ट द्यायला, लाकडी जिन्यावरून आलो होतो. त्यादिवशी तिसऱ्या मजल्याची स्लॅब चालू होती.''

''माझी टेस्ट आणि इंटरव्ह्यू तर विद्याताईच्या घरी झाला होता.'' Early 70's मधल्या वास्तुविषयी अशी चर्चा करत आम्ही वर्गापाशी पोहोचलो.

''या पाचवीच्या वर्गात देवनागरी लिपीत इंग्रजी शिकलो.''

''या वर्गात नलुताईंनी पिरिऑडिक टेबलला गाण्याची चाल लावून पूर्ण टेबल पाठ करून घेतलं होतं.'' नंतर मग सातवीच्या वर्गाजवळ आल्यावर जोगळेकर सरांनी शिकवलेल्या पॅरलल लाईन, ट्रिग्नॉमेट्री, जॉमेट्री; चाफेकर सरांनी सांगितलेल्या शेरलॉक होम्सच्या गोष्टी, परचुरे सरांनी पोवाडे गाऊन शिकवलेला 'मराठ्यांचा इतिहास' हे सगळं अजून मनात कसं ताजं आहे, याची चर्चा चालू होती. तेव्हा सुधीरला त्याचं अस्वच्छ दप्तर विनयरावांनी कसं खिडकीतून फेकून दिलं होतं ते आठवलं. शिरीषला 'नहीं' मधल्या 'ही' वरचा अनुस्वार विसरतो म्हणून १० -१० वेळेला लिहिलेला 'नहीं' आठवला. डॉ. गिरीश म्हणाला, ''राजा, प्रदीपला वर्ग चालू असताना खुर्चीवरून पाडलं म्हणून तुला डोक्यावर खुर्ची घेऊन बाकावर दोन तास उभं केलं होतं. आणि मला भिंतीला नाक लावून. आठवतंय का?''

''तुम्ही होतातच द्वाड,'' वामनरावांनाही (त्यावेळचे उपप्राचार्य) त्यांनी केलेली शिक्षा आठवत होती.

''सिद्धार्थ, आज चांगले इस्त्रीचे कपडे घालून आलायस.'' यशवंतराव (त्यावेळचे प्राचार्य) सिद्धार्थच्या पाठीवर थाप देत म्हणाले.

''हो, मला अजून तुमची शिक्षा आठवते, म्हणून अजूनही रोज स्वत: कपड्यांना इस्त्री करून घालतो.''

सिद्धार्थच्या या वाक्यावर सगळेच हसले. ''पण यशवंतराव, एक सांगू, प्रबोधिनीच्या शिकवण्यात आणि शिक्षांमध्ये जे वैविध्य आणि कल्पकता होती ना त्यामुळे आयुष्याला शिस्त लागली आणि विचारांना कल्पकता ! शिक्षांची आणि शिक्षणाची कधी भीती नाही वाटली. आता मागे वळून बघताना त्यामुळेच गोष्टी उमजल्या असं वाटतं.'' IPS अधिकारी अतुल म्हणाला.

''आपल्याला सर्व प्रयोग करून बघायची मुभा होती. खरंतर प्रकल्प शिबिरांसारख्या शिबिरातून 'डू इट युवरसेल्फ' ची सवय लागली. म्हणूनच मी आजसुद्धा कार्यालयात खूप प्रयोग करून बघायला घाबरत नाही.'' मोटोरोला कंपनीत iridium प्रकल्पावर काम करणारा संजय म्हणाला.

"I know what you are saying. I owe lot to this school!" अमेरिकेत नुकतीच स्वत:ची कंपनी विकून आलेला जयंत म्हणाला.

जयंत जेव्हा 'school' म्हणाला तेव्हा मला माझ्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील एक प्रसंग आठवला...

*इंग्रजी माध्यमाच्या कॉन्व्हेंट शाळेतून आलेल्या वर्गमित्राने 'Young Rotarians Club' मध्ये माझं भाषण ठेवलं होतं...*

"Friends, here is Rajendra, Raja as we all know him. He did his schooling from St. Appa's highschool."

"When we all were studying hard for 10th, in 1978, he was in Andhra Pradesh as a volunteer, doing relief work for cyclone hit area and today he is back from a study tour of Terror hit Punjab. From News papers we all know Punjab as a Military ruled, terror hit state full of bloodshed, religious tensions, once a prosperous state now on the verge of breakdown. Let us hear from him."

'St. Appa's highschool' ही प्रबोधिनीची ओळख माझ्या दृष्टीनी आप्पांच्या Missionary zeal ला मिळालेली पावती होती. आणि इतक्या अशांत ठिकाणी मला पाठवायला तयार झालेल्या पालकांचा त्याच्यावरचा विश्वास...

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९७४..

आप्पांची संन्यासव्रताची चतुर्थ प्रतिज्ञा,
क्षणमाप उद्योगाची सुरुवात, हिंदुत्व अभ्यास शिबिर



अन्याय, भ्रष्टतेला अमुच्या जगी न थारा।
जे जे अनाथ त्यांना पंखात द्या निवारा ।।
शुभेच्छा ! – श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.), पुणे

*''आपण रोज वर्तमानपत्रात पंजाबमध्ये १०-१५ माणसं मारली जाण्याबद्दल वाचतो. बॉम्बस्फोट, एके ४७ चा गोळीबार, प्रवाशांनी भरलेल्या बस जाळणे, लग्नाच्या वऱ्हाडावर झालेले हल्ले आपल्याला सुन्न करतात आणि हिंदूंमधली वाढती दरी अस्वस्थ करते.''* माझ्या भाषणाला सुरुवात झाली होती. पुढचे २ तास अंबाल्यापासून सुरू केलेल्या साधारण ३० दिवसांच्या 'पंजाब सद्भावना यात्रा' या अविदाच्या (अविनाश धर्माधिकारी) नेतृत्वाखाली केलेल्या १९८२ च्या अभ्यासदौऱ्याबद्दल मी बोलत होतो. दौऱ्यानंतर ठिकठिकाणी जाऊन पंजाबप्रश्नाबद्दल बोलणे, चर्चा करणे हा आमचा नंतरच्या २-३ महिन्यातला कार्यक्रम होता. पंजाबप्रश्नासारखा ज्वलंत देशप्रश्न, अनेक नागरिकांना भेटून, गुरुद्वारांमध्ये राहून, शबद कीर्तनाच्याद्वारे, लंगरमध्ये शिखांबरोबर मांडीला मांडी लावून जेवताना केलेल्या चर्चेतून, समजून घेण्याचा प्रयत्न आम्ही केला. संत लोंगोवाल, श्री बादल, गुरुचरणसिंह तोहरा यांसारख्या, शीख समाजाच्या राजकीय व धार्मिक नेत्यांशी चर्चा करून, प्रसंगी वाद घालून समजून घेण्यासाठी केलेला अभ्यास आणि जहालमतवादी संत भिंद्रानसिंगांसारख्या नेत्याच्या भेटीच्या वेळेस, शस्त्रधारी माणसांच्या खोलीत सर्वांनी दाखविलेले धारिष्ट्य, असे प्रसंग सगळ्यांचे मनोधैर्य वाढवणारे होते...

पंजाब अभ्यासदौऱ्याच्या निमित्ताने केलेला अभ्यास, चर्चा, वादविवाद यामुळे विचारांना येणारी स्पष्टता आणि अवघड प्रसंगातून जाताना येणारे धारिष्ट्य हे आजही एखादा व्यावसायिक प्रश्न समजून घेताना आणि त्यावर उत्तर काढताना उपयोगी ठरतो...

दहावीच्या वर्गमित्रांबरोबरच्या गप्पा अजूनच रंगल्या होत्या आणि अनेक प्रसंग डोळ्यासमोरून भराभर सरकत होते. ''आपल्या खो-खोच्या संघाची तिघांची तुकडी कधी कुठच्या प्रतिस्पर्धी संघाला संपूर्ण आउटच करता आली नव्हती ना?'' प्रशांतनी, संदीप, शिरीष आणि मला उद्देशून विचारले.

सु व र्ण म हो त्स वी ..१९७५.. वा ट चा ल

मा. आप्पांना उपराष्ट्रपतींच्या हस्ते एक्सलन्स ॲवॉर्ड,
स. का. पाटील विद्युत अणु संशोधिका प्रारंभ



**पंजाब सद्भाव यात्रेत शीख बांधवांसोबत शबद-कीर्तन करताना**

आमच्या अजिंक्य संघाच्या तयारीबद्दल मला नेहमी आठवणारा एक अविस्मरणीय प्रसंग परत अगदी काल घडल्यासारखा डोळ्यांसमोर उभा राहिला.

पहिल्या वर्षी जेव्हा गोल खोखोचा प्रबोधिनीचा संघ आंतरशालेय स्पर्धेत उतरला; त्या स्पर्धेत दुसऱ्याच सामन्यात आमचा दारुण पराभव झाला. सामना संपवून प्रबोधिनीत परत येताना फार लाज वाटत होती. दारातच आप्पा उभे होते.

''काय हो, उदास दिसताय, काय झालं?'' लहान मुलांनाही अहो-जाहो करणाऱ्या आप्पांनी प्रश्न विचारल्यावर अजून सुन्न झालो.

''आज आम्ही मॅच हरलो.'' मी शरमेने उत्तरलो.

''ठीक आहे. लागा तयारीला. पुढच्यावर्षी अशी तयारी करून उतरा की, पराभवाची शक्यतासुद्धा निर्माण होणार नाही.''

मी ओशाळून हो म्हटलं आणि पुढं जायला निघालो.

''कुठे निघालात? जिंकायचंय ना पुढच्या वर्षी? मग जा मैदानावर, सराव सुरू करा.''

कानशिलं गरम होणे म्हणजे काय हे त्यादिवशी अनुभवलं. संपूर्ण संघ त्यादिवशी हरून परत आल्यावर, जोमाने पुढच्या वर्षीच्या अजिंक्यपदाच्या तयारीला लागला होता. रोज मैदान झाडून साफ करून, झारीने समांतर पाणी मारून, फक्कीने नेटकं आखायचं आणि त्यावर २-३ तास इतका सराव करायचा की, नंतर उभंही राहाता येणार नाही. अशी आमची रोजची संध्याकाळ असायची.

अर्थातच पुढच्यावर्षी आम्ही अजिंक्य ठरलो. त्यानंतरही अनेक स्पर्धा, अनेक स्तरांवर जिंकलो; पण सर्वांची पायाभरणी त्या गोल खोखोच्या मैदानावर झाली.

उधळून मेघ टाकू जलहीन गर्जणारे ।
घडवू सशक्त बाहू अविराम कष्टणारे ॥
**शुभेच्छा ! - स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे**

तेव्हा जो अजिंक्यपदासाठी प्रवास केला तो जास्त प्रेरणादायी बनला.

१९७८ साली आंध्रमध्ये प्रचंड चक्रीवादळ झालं होतं. प्रचंड हाहाकार माजला होता. अशा सर्वच अवघड प्रसंगांच्या वेळी धावून जायचं, असा जणू पायंडाच होता. आम्ही त्यावेळी दहावीत होतो. पण अभ्यास बाजूला ठेवून आमच्या वर्गातले बरेचजण गिरीशरावांच्या नेतृत्वाखाली मदतकार्यासाठी रवाना झालो.

मोडकी घरं धीरानं उभी करणाऱ्यांना मदत करायची, विस्कळीत संसार परत उभे करायला शहरातून आलेल्या अल्प सामानाचं गरजेनुसार वाटप करायचं, असा पहिल्या काही दिवसांचा दिनक्रम होता. रोज संध्याकाळी कॅम्पवर दमून आल्यावर खाण्याची इच्छासुद्धा मेलेली असायची.

संध्याकाळी सर्वस्व उद्ध्वस्त झाले म्हणून वेड लागलेली माणसं रस्त्यावरून ओरडत, रडत सैरावैरा धावत असत. पांढऱ्या डगल्यातले मिशनरी दोन घास खायला आणि आजाराला औषध देतात म्हणून धर्मांतर करणारे अगतिक लोक मन विषण्ण करायचे. प्रचंड दुर्गंधी, भयानक विध्वंस आणि वाढत्या रोगराईशी आम्ही रोजच मुकाबला करत होतो.

आंध्रमधून परत येऊन आज ३०-३५ वर्षं झाली; पण त्यादिवसापासून आजपर्यंत एकदाही मी जेवणाला नावं ठेवल्याचं आठवत नाही. १० -१५ वर्षांचा असताना वास्तवाचा विदारक अनुभव घेतला. त्यामुळे आजही या स्पर्धात्मक चढाओढीत पैसा अणि जीवनमूल्य यांचे तारतम्य बाळगायला मार्गदर्शक ठरला.

**– राजेंद्र वैद्य**
११, मेघना, मृत्युंजय सोसायटी, कोथरुड पुणे– ३८

---




# विधायक कामं उभी करणारी प्रबोधिनी

**– वा. अनघा लवळेकर**

(१९८२च्या दहावीच्या तुकडीच्या कन्यका प्रशालेच्या विद्यार्थिनी, सध्या ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा मानस संशोधिकेत ज्येष्ठ संशोधक, 'संवादिनी' च्या संघटक व प्रबोधिनीच्या मध्यवर्ती सहविचार समितीच्या सदस्या म्हणून कार्यरत.)

'ज्ञान प्रबोधिनी आणि मी' या विषयावर लिहायला सुरुवात केल्यावर वाटलं की नुसतं 'मी'वर लिहायला सांगितलं तरी त्यात प्रबोधिनीच जास्त डोकावेल, इतकं प्रबोधिनीचं आणि माझं आयुष्य जोडलं गेलं आहे. वयाच्या दहाव्या वर्षापासून ते आज पंचेचाळिशीपर्यंत गेली पस्तीस वर्षं एकही दिवस मी प्रबोधिनीत आले नाही किंवा तिचा विचार केला नाही, असं घडलेलं नाही.




मी प्रबोधिनीत आले तेव्हा खरंतर मला दुसऱ्यांदा पाचवीत बसावं लागलं, त्यामुळे मला 'पुन्हा पाचवीत' बसण्याची थोडी नाराजी होती; पण शाळेतल्या वातावरणात ती कधीच धुऊन निघाली. ...आमचा पाचवीचा वर्ग म्हणजे 'ज्ञान प्रबोधिनी कन्यका प्रशाले'ची दुसरीच तुकडी. सगळ्या मिळून उण्यापुऱ्या ७०-८० जणींची शाळा, त्यातून शिकवणाऱ्या ताया-खरोखरीच्याच 'ताया' असाव्यात एवढ्या तरुण, उत्साही आणि आप्पांच्याच मानसकन्या. लताताई, विद्याताई, मुक्तीताई, नलूताई, हेमाताई... कुणी कुठला विषय शिकवला ते फारसं आठवतच नाही, इतके सगळ्यांनी वेगवेगळे विषय बदलून बदलून शिकवले. आठवते ती शिकण्यातली धम्माल! वाचनवेग, प्रतिभा विकसनाच्या तासांना उडालेले हसण्याचे फवारे, अशोकरावांनी आमच्याकडून लिहून घेतलेला 'कवितेतील गुप्त संदेश' आणि आर्याताईंनी गणित शिकवताना घेतलेला 'शोले'तल्या गब्बरसिंगच्या पिस्तुलातील 'शेवटच्या तीन गोळ्यांचा' probability चा प्रश्न!

सु व र्ण म हो.. **१९७५..**त्सी वा ट चा ल
संस्कृत संस्कृति संशोधिका प्रारंभ,
युवती प्रशाला प्रारंभ



उन्मत्त धाक कधि ना ढळवेल निश्चयाला।
भुलवील ना धनाची राशी समर्पणाला ।।
**शुभेच्छा ! – व्ही. व्ही. आर्किटेक्ट, प्रा. लि., पुणे**

वार्षिक परीक्षा देऊन झाल्यावर आमची प्रकल्प शिबिरं असायची. विषय निवड; अक्षरशः वाट्टेल ती! पाचवीतून सहावीत जाताना मी केलेला प्रकल्प होता - 'प्रयोगशाळेतील टेबले कशाची असावीत? लाकूड / लोखंड/दगड/प्लॅस्टिक....' त्यासाठी सर्व प्रकारच्या आम्लांचा आणि अल्कलींचा केलेला उपयोग आणि काढलेले निष्कर्ष! माझ्या एका मैत्रिणीनं 'रक्तगट' ओळखण्याचा तर दुसरीनं रेशमी किड्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास केला होता. त्यात अर्थातच 'रक्तदाते' म्हणून आणि 'रेशमी किड्यांना तुतीची पानं भरवणे' यासाठी आम्ही वर्गमैत्रिणीच पुढे होतो.

'स्व-अध्ययनाचे' असे असंख्य अनुभव प्रबोधिनीत शिकताना मिळाले. स्वतःच्या घरची स्वच्छतागृहं घासण्यापासून ते स्वतःच्या अभ्यासासाठीचा टेबललॅम्प स्वतःच जोडून बनवण्यापर्यंत, स्वतः लिहिलेलं नाटुकलं स्नेहसंमेलनात बसवण्यापासून ते 'वृत्तपत्रांच्या' ग्रंथालयात तासन्‌तास बसून 'फाळणीचा इतिहास' आपल्या शब्दांत मांडण्यापर्यंत... करंजावण्याचा खांडसरी साखर कारखाना पाहण्यासाठी ८-१० किलोमीटरची पायपीट करण्यापासून ते वारीमध्ये भजनं गात रममाण होण्यापर्यंत... एक अत्यंत समृद्ध अशी अनुभव शिदोरी नकळत आम्हाला, आमच्या मन-बुद्धीला मिळत होती.

१९७८ साली तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई हे ज्ञान प्रबोधिनीला भेट देणार होते. त्यावेळी दूरदर्शनच्या स्पर्धेत बक्षीसपात्र ठरलेलं 'हे आनंदी गाणे' हे पद्य संपूर्ण शाळेनं म्हणायचं होतं, तेही साभिनय! 'उत्तमता' हा तर आप्पांचा ध्यास! त्यासाठी पूर्ण तयारीचा आग्रह! पंतप्रधान भेटीपूर्वीचे अनेक दिवस आमची औपचारिक शाळा अक्षरशः झालीच नाही!

सर्व वेळ पद्याचा सराव..., हातवाऱ्यांचा सराव
बारीक बारीक सुधारणा..., उत्तम - अधिक उत्तम
बिनचूक सादरीकरण! नलूताईंचा जागता पहारा आणि आप्पांची चिकित्सक दृष्टी! मी माझ्या मैत्रिणींना नेहमी



पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांची प्रबोधिनी भेट

सांगते की, आज मध्यरात्री जरी उठवून मला ते गाणं साभिनय म्हणायला सांगितलं तर सेंटिमीटरचाही फरक न पडता त्या हालचाली मी करू शकेन! एखाद्या कामात किती उत्कटतेनं रमावं, याचा तो जणू वस्तुपाठच आप्पांनी आणि प्रबोधिनीनं आम्हाला प्रत्यक्ष अनुभवातून दिला.

दुसरा महत्त्वाचा अनुभव म्हणजे आंतरशालेय क्रीडा स्पर्धांचा. 'पूना गर्ल्स स्कूल्स स्पोर्टस् असोसिएशन'तर्फे ह्या स्पर्धा भरायच्या. कन्यका प्रशालेनं त्यात (मी सातवीत असताना प्रथमच) योगासने व सूर्यनमस्कार स्पर्धांमध्ये भाग घ्यायचा ठरवला. स्पर्धेमधल्या प्रतिस्पर्धी होत्या हुजूरपागा, रेणुका स्वरूप, अहिल्यादेवी, नूमवि सारख्या दिग्गज, प्रस्थापित शाळा. अर्थातच त्या वर्षी आमचा क्रमांक आला नाही. सामूहिक धो धो रडून झाल्यावर निश्चय केला पुढच्यावर्षी नंबर काढायचाच.

...आणि खरोखरच त्या पुढच्या वर्षी फक्त आमचा आम्ही सराव करून, गणवेशापासून रचनांपर्यंतच्या सर्व गोष्टी ठरवून स्पर्धेत भाग घेतला. आणि दोन्ही स्पर्धांमधला 'प्रथम' क्रमांकाचा मुकुट मिळवून 'प्रबोधिनी-प्रबोधिनी...' असा जोरदार गजर केला सुसाट धावत येऊन, ओरडत प्रबोधिनीचे पाच मजले एका दमात चढलो. आणि आश्चर्यानं 'काय झालंय' ते बघायला खोलीच्या दारात आलेल्या कन्यका प्रशालेच्या प्राचार्या नलुताईंना अक्षरशः मिठीच मारली!

शाळेत विद्यार्थी म्हणून वावरतानाचे असे असंख्य अनुभव! 'घर आणि शाळा' यातील अंतर मिटवणारे. अध्यापकांशी मैत्रीचं नातं जोडायला शिकवणारे. नव्या नव्या कल्पनांचा ध्यास घ्यायला लावणारे. शाळेच्या

सु व र्ण म हो.. १९७६.. वा ट चा ल
आयुर्वेद संशोधिकेस प्रारंभ, साखर नदीवर पुलाचे बांधकाम,
तांदूळ विक्री उपक्रमास प्रारंभ

ज्ञानासवेच तोलू विज्ञान स्रोत आम्ही ।
नवनिर्मितीस लागू स्मरणात ठेवू आम्ही ।।
शुभेच्छा ! - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

पलीकडचं विस्तृत जग दाखवणारे. एखाद्या संस्थेचे संचालक पाचवीच्या वर्गात येऊनही किती सहजपणे दिलखुलास गप्पा मारू शकतात हे दाखवणारे आणि प्रत्येकातला 'स्व' अलगद आणि टप्प्याटप्प्यानं जागा करत जाणारे!

प्रशालेतून बाहेर पडल्यावर मग हळूहळू प्रबोधिनीच्या संघटनेच्या कामात मी आपोआपच ओढली गेले. महाविद्यालयात शिकताना एकीकडे जाणिवा विस्तारत होत्याच, त्याला प्रबोधिनीच्या ज्ञान आणि अनुभवानं समृद्ध वातावरणाचं टॉनिक मिळालं. दर रविवारी लताताईंच्या घरी होणारी बैठक, प्रशालेय दलाची 'ताई' म्हणून घेतलेली जबाबदारी, १९८६ साली 'आशा भोसले संगीत रजनी'च्या कार्यक्रमासाठी केलेली प्रसिद्धी आणि तिकिट विक्री, प्रबोधिनीच्या साहित्याचं वाचन आणि कितीतरी अगणित अनुभव.

१९८६ मधील कन्याकुमारीचा विवेकानंद केंद्र दौरा आणि १९८७ मधला गुरखा प्रश्न अभ्यास दौरा असेच स्मरणीय! माझा 'स्त्री-प्रश्नांच्या' बद्दलचा खरा अभ्यास इथून सुरू झाला असं म्हणायला हवं. त्याही आधी देवराळा येथे झालेली 'सती' ची घटना, त्यावेळी झालेल्या अभ्यास दौऱ्यातील अनुभवकथन. ह्यामुळे हा प्रश्न किती खोल आणि व्यापक आहे हे कळायला सुरुवात झाली होती. कन्याकुमारीला गेलेल्या आम्ही पाच युवती आणि कोलकत्याला गेलेल्या पंचावन्न जणी आजूबाजूच्या लोकांच्या मते 'एकट्याच मुली-मुली' होतो आणि त्या काळात असं फक्त मुलीमुलींनीच लांब अभ्यासाला जाणं काहीतरी फारच रीतीला सोडून, क्रांतिकारी वगैरे होतं, असं त्यांच्या प्रश्नांवरून जाणवलं. अन्यथा प्रबोधिनीत, 'तुम्ही मुली आहात म्हणून अमुक करू नका', असं कधीच कुणी लादलेलं स्मरत नाही. तेव्हा प्रबोधिनीमुळे आपण माणूस म्हणून सक्षम बनत असलो तरी अशा लाखो-करोडो स्त्रिया आहेत ज्या ह्या 'सक्षमतेची' कल्पनाही करू शकत नाहीत, ही विदारक गोष्ट लक्षात आली.

पुढे पदवीनंतर जेव्हा 'खेड-शिवापूर' भागात पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम सुरू केलं तेव्हा तर ग्रामीण स्त्रीचं जीवन अगदी माजघरापासूनच थेट बघायला मिळालं. 'चुलीतलं लाकूड चुलीतच जळायचं', 'पायीची वहाण पायीच बरी' अशा म्हणी प्रत्यक्षात जगणाऱ्या स्त्रिया जशा पाहिल्या, तशा दारूबंदीसाठी पोलिसांच्या आणि नवऱ्याच्या लाठ्या खाऊनही जिद्द न सोडणाऱ्या सबला पाहिल्या. अपेक्षा न ठेवता अतिथीवर प्रेम करणारी घरं अनुभवली. आपल्या पोटच्या लेकींसारखी माया आमच्यावर करणारे, अगदी हातावर पोट असणारे, पण घास बाजूला ठेवणारे लोक पाहिले. या सगळ्यांमुळे 'आपण ह्या समाजाचा किती अभिन्न भाग आहोत आणि जे आपल्याला त्यांच्याकडून न मागताच मिळतं आहे, ते किती पटींनी परत करायला पाहिजे' हे खूप मनापासून जाणवलं. व्यक्ती म्हणून ह्या पूर्ण कामाच्या काळात मी जशी वाढले तशीच एक कार्यकर्ती म्हणून, समाजासाठी उत्तरदायी व्यक्ती म्हणूनही घडले. त्या सगळ्या कामाच्या संधी माझ्या खऱ्या 'शिक्षणाच्या' संधी होत्या. रात्री-बेरात्री गावोगाव फिरून केलेली कीर्तनं, गावबैठका, कुंभारवाड्यात राहून मातीचे गोळे मळून स्वत:च्या हातांनी बनवलेल्या निर्धूर चुली, गावोगाव योजलेले आरोग्य तपासणी मेळे, दारूबंदी अभियान मोर्चे, ग्रामीण महिलांसोबत केलेली राळेगणसिद्धीची सहल, आणि असे अनेक अनुभव! हा सगळा काळ माझ्या प्रबोधिनीतील कामाच्या पायाभरणीचा काळ होता. त्या ३-४ वर्षांत मी जेवढं शिकले, ते मला नंतर प्रबोधिनीतल्या प्रशालेत, प्रज्ञा मानस संशोधिकेत काम करताना उपयोगी पडलं - पडत आहे. इथल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी झालेल्या वेळोवेळीच्या चर्चा, आप्पांचं चरित्र आणि त्यांचं लेखन, प्रबोधिनीचं अन्य साहित्य ह्या सर्वांमुळे मानसशास्त्रज्ञ म्हणून, अध्यापक म्हणून काम करणं मला अधिक चांगलं जमलं.

पूर्ण वेळ कामाच्या पहिल्या दिवशी मी शिवापूरला निवासी कार्यकर्ता म्हणून गेले आणि प्रत्यक्षात ठोस काही जबाबदारी तोवर दिली नसल्यानं कंटाळून संध्याकाळी परत आले. अण्णांनी (व. सी. ताम्हनकर) मला वास्तूत बघितलं आणि ते म्हणाले, ''तुम्ही कशा इथे? तुम्ही शिवापूरला गेला होता ना?''

सु व र्ण म हो.. १९७७.. वा ट चा ल
रसमयी उद्योग प्रारंभ, सर्वधर्मीय महापुरुष पूजा,
महाराष्ट्रात युवकांची विस्तार शिबिरे सुरू



देशच माझा - माझी भूमी, माझे दैवत येथील व्यक्ती ।
हिच्याचसाठी माझा कण-क्षण, हिच्याकारणी माझी शक्ती ।।
शुभेच्छा ! – डॉ. चंद्रशेखर चितळे, पुणे

मी जरा घाबरून म्हटलं, ''पण आज मला तिथे काहीच काम नव्हतं!''

''काम नव्हतं म्हणजे? तुम्ही काम उभं करायला जाता आहात. सांगितलेली कामं करायला नव्हे! एकदा निवासी कार्यकर्ता म्हणून जायचं ठरवलं की संचालकांनी सांगेपर्यंत घाट ओलांडून इकडे यायचं नाही. तिथेच राहायचं. काम शोधा, निर्माण करा आणि वाढवा. आजचा मुक्काम इथे करायचा नाही. ८-३० ची कल्याण गाडी घ्या आणि परत जा!''

त्या एका संवादातून प्रबोधिनीच्या कामाची नस मला सापडली असावी, असं आज वळून बघताना वाटतं! असं वाटतं, की प्रबोधिनीला आपण जे देऊ केलं त्यापेक्षा कैक पटींनी जास्त प्रबोधिनीनं आपल्याला दिलेलं आहे. ते ऋण कधीही न फिटो. कारण तेच पुढे जाण्याचा प्रेरणास्रोत आहे!

**– वा. अनघा लवळेकर**
'कुलश्री' १२६, नारायण पेठ, पुणे ४११०३०

---




# मोकळ्या वातावरणाची प्रबोधिनी

**उमा नामजोशी–बापट**

(१९९१ च्या दहावीच्या प्रशालेच्या तुकडीच्या विद्यार्थिनी,
सध्या प्रज्ञा मानस विभागात कन्सल्टींग सायकॉलॉजिस्ट म्हणून कार्यरत)

मी प्रशालेत असताना प्रज्ञा मानस संशोधिकेतील मानसतज्ज्ञ आमच्या तासिका घ्यायला यायचे. आम्ही गंमतीचे खेळ खेळायचो, त्यातून आमची कल्पकता, प्रतिभाशक्ती वाढावी यासाठी प्रयत्न असायचा. लोकांशी वागायचे कसे, इतरांच्या भावना समजून कशा घ्यायच्या, असाही एक तास असायचा. तो मला आवडायचा. अशा तासांना आलेल्या मानसतज्ज्ञांशी माझी ओळख झाली. मी उत्सुकतेने त्या विभागात जायचे. या लोकांना भेटायचे. मानसशास्त्रातील पीएच. डी. मिळवल्याबद्दल काही मानसतज्ज्ञांचा गौरव आमच्या प्रार्थनेच्यावेळी केल्याचे आठवते. या सगळ्यातून मानसशास्त्र हा अभ्यासाचा आणि कामाचा विषय असतो, याची ओळख खूप लहान वयात झाली. प्रबोधिनीच्या वास्तूत केवळ शाळा भरत नाही. यामागे उद्देशच असा आहे की प्रबोधिनीत होणारे संशोधन, ग्राम विकसन अशा अन्य विभागांशी शालेय विद्यार्थ्यांचा संपर्क यावा. याचा प्रत्यय मला खरोखरच आला.

आता माझी मुलगी प्रशालेत शिकते आहे. कधी ती 'छात्र प्रबोधन'मध्ये जाते आणि तिच्या मैत्रिणींबरोबर रंगवलेल्या पणत्या दिवाळीची भेट म्हणून त्या विभागाला देते. कधी शाळेत चालू असलेल्या गवंडी कामाच्या कामगारांच्या मुलांशी गप्पा मारते, त्यांच्यासाठी घरून कपडे नेते. हे प्रबोधिनीच्या शिक्षकांनी आखून दिलेले उपक्रम नसतात. या वास्तूत असलेल्या मोठ्या कुटुंबातील मोकळ्या वातावरणाचा तो परिणाम असतो. माझ्या मुलीच्या अनुभवांचा उल्लेख केला कारण ती तुमच्या एवढीच आहे. पंचवीस वर्षांपूर्वी या वास्तूत मी ज्या मोकळेपणाने वावरले तसे आजही घडू शकते, आजच्या पिढीलाही प्रबोधिनी त्यांचे घर वाटते.




असे वाटते की अनेक अनुभव मी या शाळेशिवाय कदाचित कधी घेतले असते का? पाचवीत असताना ट्रकमधून मागे बसून छोटा का होईना पण एकटीने केलेला प्रवास, निधी संकलनासाठी संगीत रजनीची तिकीट विक्री करताना अनोळखी घरांमध्ये जाऊन तिकिटे खपवण्याचा प्रयत्न, पर-प्रांतीय लोकांच्या मुलाखती घेताना गटनायिका म्हणून गटाची जबाबदारी घेत, समोर अनोळखी माणसे आणि त्यांच्याशी अमराठी

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९७७ ..
आंध्र वादळ मदतकार्य,
ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश न्यासाची स्थापना

निश्चय, निष्ठा, नीती यांचे कंकण बांधुन हाती ।
व्रतस्थ होउनि व्यापुनि टाकू विश्वाच्याही मिती ।।
**शुभेच्छा! – संतुल, पुणे**



सहलीचा आनंद लुटताना

संभाषण अशी झालेली कसरत!

शाळेचा प्रत्येक दिवस वेगळा असायचा. यात कधी शिक्षकांवर वैतागणे, दलावरच्या तायांशी तावातावाने भांडणे, वर्गातल्या वर्गात झालेल्या अनेक चर्चा असेही प्रसंग आठवतात. महाराष्ट्र बोर्डाच्या सातवी शिष्यवृत्ती परीक्षेला काही मुलींना बसायचे होते. आमची शाळा सी. बी. एस. ई. बोर्डाची म्हणून त्याकाळी काही कारणाने परीक्षेला बसता आले नाही. तेव्हा 'आम्हाला परीक्षेला का बसता येणार नाही?' असे आमच्या अख्ख्या वर्गाने शिक्षकांना फार तळमळीने विचारले होते. त्यानंतर प्रबोधिनीने आपल्या प्रशालेसाठी सातवीला 'गुणविकास योजना-शिष्यवृत्ती' सुरू केली.

शाळेत रूढ अभ्यास, परीक्षा व त्यातील यश यापलीकडे जाऊन जे अनेक उपक्रम होते त्याचे आकर्षण वाटायचे. माझ्या गुरुजनांनी मात्र मला शालेय अभ्यासाचे महत्त्वही लक्षात आणून दिले. अभ्यास कसा करायचा हे फार वैयक्तिक लक्ष देऊन शिकवले. आपण प्रयत्न का करायला हवेत? कसे करायला हवेत हे कायमसाठी माझ्या अंगी रुजले ते प्रबोधिनीतील शिक्षकांमुळेच. कष्ट म्हणजे काहीतरी ढोर मेहनत नाही, त्याचा कंटाळा करून चालत नाही हे अनुभवातून शिकत गेले. आपल्या योग्य मेहनतीमुळे मिळवलेल्या यशाचे समाधान आणि त्यातला आनंद काय असतो ते हळूहळू जाणवायला लागले.

सुरुवातीला संस्कृतसारख्या विषयात संपूर्ण धातू रूपावली लिहून काढणे माझ्या जिवावर यायचे. दहावीच्या सुरुवातीला सातवीपासूनची गणिते परत का करायला सांगतात, असा वैताग पण यायचा. पण प्रबोधिनीत अभ्यास सोडून शंभर उद्योग करणाऱ्या आम्हा अनेक विद्यार्थ्यांना दहावी, बारावी आणि पदव्युत्तर शिक्षणापर्यंत मिळत गेलेल्या शैक्षणिक यशाचे हे रहस्य आहे. एकाच वेळी अनेक गोष्टी करता येणे, वेळेचे नियोजन, आपले प्राधान्यक्रम ठरवणे अशा अनेक कौशल्यांचा सराव शालेय जीवनापासून झाला. आज मी मुक्तपणे, स्वतंत्रपणे काम करते तेव्हा या साऱ्या सवयीची मला मदत होते.

शाळेत खूप वेगवेगळ्या गोष्टी आम्हाला करायला मिळाल्या, तरी इतर शाळांसारख्या काही गोष्टी फारशा करायला मिळायच्या नाहीत. त्यामागे शाळेचे काही विचार असले तरी त्या वयात त्याची रुखरुख आम्हाला वाटायचीच. सर्व शाळांमध्ये दरवर्षी स्नेहसंमेलन हा मोठा उत्साहाचा सोहळा असतो. आमच्यासाठी मात्र तो दुर्मिळ कार्यक्रम असायचा. माझ्या पाचवी ते दहावीच्या शालेय वर्षांमध्ये फक्त दोनदाच स्नेहसंमेलने झाली. त्यात मात्र मी खूप धमाल करत सहभागी झाले.

आता अनेक शाळांमध्ये मुलांना प्रकल्प करायला मिळतात. पूर्वी ते इतके बघायला मिळायचे नाहीत. सध्या इंटरनेटवर खूप माहिती तुम्ही मुले सहजतेने वाचता तसे आम्ही शाळेत असताना नव्हते. 'गुगलवर पटकन शोधले', असे नसायचे. एनसायक्लोपिडिया सारखे संदर्भ ग्रंथ हाताळणे, ग्रंथालय कसे वापरायचे हे समजणे, पुस्तके शोधणे, हे सरसकट सगळी मुले शालेय वयात करू शकत नाहीत. पण तेव्हा प्रबोधिनीत मात्र अगदी लहान इयत्तांमध्ये आम्ही एनसायक्लोपिडिया वापरायला शिकलो, स्वत: अभ्यास करून एखादा विषय वर्गासमोर मांडायची संधी शाळेतच आम्हाला मिळाली. मी परदेशात शिकत असताना तिथली ग्रंथालये पाहून भारावून गेले तरी बुचकळ्यात पडले नाही. पाठांतरावर भर नसलेल्या तिथल्या परीक्षांचा अभ्यास करणे मला अवघड वाटले नाही. पुस्तकी अभ्यासक्रमाच्या पलीकडे प्रबोधिनीत इतके जण आमच्याशी बोलायला यायचे, की भाषणांमधून, लोकांच्या बोलण्यामधून माझ्या नकळत मी 'ऐकायला', 'वेचायला' शिकले. अर्थात हे खूप नंतर जाणवत जाते.

सुवर्णमहोत्सवी वाटचाल .. १९७८..

पंतप्रधान श्री. मोरारजीभाई यांची प्रबोधिनीला भेट,
गीतारहस्य अभ्यास शिबिर




नजरेपुढती वाटा खडतर, हाताशी केवळ निर्धार ।
स्वप्न उद्याच्या उजळ दिसांचे, जिद्दीने करुया साकार ।।
शुभेच्छा ! – श्री. अभय लिमये, पुणे

माझ्या पालकांनी शाळेवर खूप विश्वास ठेवला. म्हणून कोणत्याही वेळी, कितीही वेळ मी घरच्या दडपणाशिवाय मनसोक्त झोकून देऊन शाळेतल्या सर्व उपक्रमात पुरेपूर सहभागी होत गेले. 'दहावीचे साल म्हणजे फक्त दहावीची परीक्षा नाही,' असे विचार इथले ज्येष्ठ कार्यकर्ते आमच्या पालकांना सांगत. माझ्याबरोबर माझ्या कुटुंबाशीही प्रबोधिनी जोडली गेली. आमचे प्राचार्य, दलाच्या ताई आमच्या घरी यायचे. तेव्हा तर कोण आनंद व्हायचा !

आजकाल चुका आणि अपयश आलं की, आपण फार निराश होतो. लगेच सगळे कंटाळवाणे होते. अजूनही असे कधी झाले की, शाळेतल्या काही गोष्टी आठवतात. आमच्या एका निवासी सहलीच्या वेळी परतीची तिकिटे चुकून आदल्या दिवशीची काढली गेली होती. ही गोष्ट लक्षात येईपर्यंत ती गाडी आदल्या दिवशीच निघून गेली होती आणि नुसतीच तिकिटे आमच्या हातात. वाया गेलेले अनेक पालकांचे पैसे आणि शेवटच्या दिवसापर्यंत खरेदी, मजा असे करत सगळ्यांकडेच जवळ उरलेले मोजकेच पैसे, या सगळ्यातून परत जायचे कसे? पण आमच्या सहल प्रमुख ताईंनी तो प्रसंग तोल न जाऊ देता हाताळला. सर्व मुलींना कसा धीर दिला, परत येऊन पैसे कसे उभे केले, हे सारे आठवते. खूप नियोजन, शिस्तबद्ध काम करणाऱ्या व्यक्तींकडूनसुद्धा कधी काही गोष्टी चुकून घडतात. माणूस म्हणून एकमेकाला समजून घेणे, सावरून घेणे हे मनापासून हळूहळू जमायला लागते. आपण किती कुशलतेने सर्व करू शकतो असा अभिमान असला तरी आपली चूक होऊच शकत नाही; अशा भ्रमात न राहणे असे भान यायला लागते.

शाळेत असल्यापासून 'प्रबोधिनी' म्हणजे फक्त पुण्यातली शाळा - इमारत असे नाही तर 'प्रबोधिनीपण' आपल्या असण्याचा एक अविभाज्य भाग व्हायला पाहिजे असं ऐकत आले. म्हणजे प्रबोधिनीने जे शिकवले ते जगता आले पाहिजे. आपण जिथे जाऊ तिथे प्रबोधिनी आहे, असे शाळेच्या वयात ऐकलेले मला फार महत्त्वाचे वाटले. ते 'प्रबोधिनीपण' आणि प्रबोधिनीच्या इमारतीपलीकडची 'प्रबोधिनी' माझ्या सोबत कायम असते आणि कायमच मला उपयोगी पडते, असे मला वाटते.

**– उमा नामजोशी-बापट**
४८४/९९, मित्रमंडळ कॉलनी,
'शांतायन' अपार्टमेंट, पर्वती, पुणे 411009



# मी आणि प्रबोधिनी

**नचिकेत नित्सुरे**

(२००५ च्या दहावीच्या प्रशालेच्या तुकडीचा विद्यार्थी, युवक प्रतोद व विज्ञान दल प्रमुख म्हणून कार्यरत, शास्त्र शाखेत शिक्षण चालू.)

**प्र**बोधिनीचा माझा पहिला संपर्क प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे घेण्यात येणाऱ्या बालविकास शिबिरांमुळे आला. जुन्या दगडी इमारतीत (वाड्यात) एक रात्र राहिल्याचे मला आठवते. जास्तीत जास्त मी तेव्हा इयत्ता पहिलीत वगैरे असेन. तेव्हा मी अभिनव विद्यालयात (मराठी माध्यम) शिकत होतो. तिसरीत असताना आम्हाला एक बाई संगीत शिकवायला यायच्या. त्यांनी आम्हाला 'शतकातुनी द्रष्ट्यांचे...' , 'प्रबोधिनीत यायचे...' अशी पद्यं शिकवली होती. अभिनवमध्ये या कोण बाई होत्या, का त्यांनी ही पद्ये आम्हाला शिकवली ते काही कळले नाही. त्यातच माझी चुलत बहीणसुद्धा प्रबोधिनीच्याच शाळेत होती. तिसरी-चौथीत असताना त्यामुळे माझा पक्का आणि अगदी ठाम निश्चय झाला

सुवर्णमहो.. **१९७८**.. वाटचाल
खांडसरी साखर कारखाना प्रारंभ, युवक फटाके विक्री उपक्रम प्रारंभ, दारुबंदीचे पहिले आंदोलन

वज्रता विनम्रता तनूमनात बाणवू, ।
स्नेहशील एकता निजांतरात तेववू ।।
**शुभेच्छा ! – संतोष साटम, पुणे**



**विज्ञानदलात प्रयोग करताना**

होता की, मला प्रबोधिनीच्या प्रशालेत जायचे आहे. माझ्या खूप मोठ्या सुदैवाने/भाग्याने मला प्रशालेत प्रवेश मिळाला.

प्रशालेत सहावीत असतानाचा एक उपक्रम मला आजही आठवतो. आमच्या वर्गातील मुलांनी 'विज्ञान दिन साजरा करायचा' ही संकल्पना मांडली. आम्हा मुलांनीच त्याची कल्पना फुलवली, दृढ केली. मला पहिल्यापासूनच विज्ञानाची आवड असल्याने मी या उद्योगात चांगलाच पुढाकार घेतला. मा. संचालकांनी आणि इतर मान्यवरांनी त्या विज्ञानदिनाच्या सादरीकरणाचे केलेले कौतुक अजूनही आठवते आहे. जुन्या ओव्हरहेड प्रोजेक्टरवर पारदर्शिकांच्या साहाय्याने आम्ही बऱ्याच वेगवेगळ्या विषयांचे सादरीकरण केले होते. प्रशालेत होणाऱ्या बाकी इतर गोष्टी इतक्या आहेत की त्यांची गणना करणे फारच अवघड आहे. म्हणून त्यातल्या त्यात मी अगदी जवळ जपलेल्या विज्ञानदिनाचे उदाहरण दिले आहे.

युवक विभागाच्या उपक्रमांमधील मी इ. सहावी व आठवीत असतानाची क्रीडा प्रात्यक्षिके आठवतात. त्याशिवाय आम्ही सर्वजण सहावी-सातवीत असतानाची घरपोच फटाकेविक्री चांगलीच आठवणीत राहिली आहे. त्यासाठी किती फिरावे लागले होते हे आठवून मजा येते.

इ. नववीमध्ये असताना मी जे दोन प्रकल्प केले होते, ते अत्यंत फालतू आणि टुकार होते. मी गेल्या काही वर्षांत संशोधनात्मक प्रकल्प या गोष्टीच्या जर मागे लागलो असेन तर ते या कटू आठवणींमुळेच होय. इ. नववीतच मी शेवटच्या काही महिन्यांमध्ये आत्ताचे प्रशालेचे प्राचार्य वा. मिलिंद नाईक यांच्याबरोबर रात्री उशिरापर्यंत थांबून संगणकांच्या लॅन करण्याचे (जोडणीचे) काम करत असे. ज्येष्ठांच्या सहवासाने जी जवळीक निर्माण होते ती याच काळात तयार झाली. इ. दहावीमध्ये आम्हाला भविष्यवेध शास्त्रासाठी विविध गावांचा अभ्यास करायला पाठवले होते. त्यात मी कर्नावड गावाचा अभ्यास केला होता. खेड्यातून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतराच्या समस्येची तीव्रता तेव्हा चांगलीच जाणवली होती.

सर्वात चांगला स्मरणात आहे, तो अनुभव म्हणजे मी दहावीत असताना विज्ञान प्रदर्शनातला माझा सहभाग. बी. जे. मेडिकल कॉलेजमधून तेव्हा सरांनी खरा मेंदू आणि हृदय (क्लोरोफॉर्ममध्ये बुडवलेले) आणले होते. या दोन गोष्टी आणि एक मानवी सांगाडा यांच्या साहाय्याने मी प्रदर्शन बघायला आलेल्यांना बऱ्याच शरीररचना समजावून सांगायचो. या प्रदर्शनानंतर मी दर शनिवारी न चुकता विज्ञान दलाला जाऊ लागलो व तिथे शिकवूही लागलो. विज्ञान दलामध्ये मुख्यत: शालेय पाठ्यपुस्तकामधील प्रयोग करून पाहाणे हा मुख्य भाग असायचा. प्रयोगाच्या निमित्ताने त्या प्रयोगामागच्या संकल्पनांवर चर्चा व्हायच्या. त्या चर्चांमधून पुस्तकात दिलेली माहिती परिपूर्ण असेलच असे नाही असे मुलांनाच समजून यायचे. मग त्यातून प्रश्न निर्माण व्हायचे. अतिशय अनौपचारिक वातावरणामुळे मुले हे प्रश्न विचारायची आणि आम्ही त्यावर पुष्कळ वेळ काथ्याकूट करायचो. कधी कधी एकच प्रश्न आम्हाला अनेक आठवडे पुरायचा. आम्ही त्यावर प्रयोग, पुन्हा प्रश्न, पुन्हा प्रयोग अशा मालिकेवर तुटून पडायचो. 'छात्र प्रबोधन' मध्ये मी गेल्या काही वर्षांमध्ये लिहिलेले 'प्रकल्पातून प्रयोगाकडे' सारखे लेख किंवा अन्य प्रयोग या मागे सर्वात मोठी प्रेरणा ही विज्ञान दलाची आहे. मोठी मोठी विज्ञान प्रदर्शने उभारणे, सर्वांनी मिळून विज्ञान पुस्तिका तयार करणे, त्या हजारो लोकांपर्यंत पोचविणे यातून विज्ञान दलाचे काम वाढत गेले. अनेक शिबिरं, शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम यातून विज्ञान दल मोठं होत गेलं.

सुवर्णमहोत्सवी वाटचाल ..१९७९..
युवतींची विस्तार शिबिरे आणि प्रबोध दलांना प्रारंभ,
मोरवी पूर मदतकार्य, रांझे-आर्वी श्रमदानातून रस्ता बांधणी



जरी लोक येथील कोट्यानुकोटी, कसे दैन्य देशात कोणी बघेना ?
करू मातृभूमी जगी श्रेष्ठ ऐशी, चला पौरुषाची प्रतिज्ञा करू या ।।
शुभेच्छा ! – श्री. गजेंद्रगडकर, पुणे

मनापासून उपक्रम केले तर उपक्रमांवर श्रद्धा निर्माण होते आणि या श्रद्धेला अनुभव आणि बुद्धीची जोड मिळाली तर तेच उपक्रम पुढे नेण्याची प्रेरणा आणि क्षमताही निर्माण होते. फटाकेविक्री, विज्ञान प्रदर्शन, दल तसेच प्रकल्प या विषयांच्या बाबतीत गेल्या १० वर्षांतील माझी वाटचाल लाभार्थी ते आता मार्गदर्शक अशी आहे. हा आखीव-रेखीव सुरचित प्रवास हेच माझ्या मते प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीचे किंवा मनुष्यघडणीचे वैशिष्ट्य आहे. मी अर्थातच माझीच उदाहरणे दिली आहेत, पण आता पाहतो, तर प्रबोधिनीच्या सर्वच विभागातल्या अनेक कार्यकर्त्यांनी याच प्रकारे प्रवास केला आहे, हे दिसून येते. मनुष्यघडणीच्या कामातील वय वर्षे ३ ते ७५-८० आणि ग्रामीण क्षेत्रातील महिला ते उद्योगांमधील मोठे व्यवस्थापक यांना आपलीशी वाटणारी व्यापक, सर्वसमावेशक आणि सुरचित संघटना असे ज्ञान प्रबोधिनीचे स्वरूप गेल्या काही वर्षांमध्ये अधिक जोमाने वाढले आहे, असा माझा व्यक्तिगत अनुभव आहे.

मी ज्या काळात प्रबोधिनीत आहे, त्या काळात प्रबोधिनीच्या कामात झालेली महत्त्वाची वाढ म्हणजे दीनानाथ रुग्णालयाची उभारणी. मी या रुग्णालयाच्या मदतीसाठी झालेल्या संगीत-रजनीचे एकही प्रवेशपत्र विकू शकलो नव्हतो, पण तो वातावरणातील उत्साह फारच भारावून टाकणारा होता.

याच सुमारास प्रबोधिनीने उभारलेल्या 'साखरशाळा' उपक्रमाचे पहिल्यांदा महाराष्ट्रभरासाठी सार्वत्रिकीकरण शासनाच्या माध्यमातून झाले. ऊसतोडणी कामगार महाराष्ट्राच्या विविध भागांमधून पुण्यामध्ये - पुणे जिल्ह्यामध्ये - पिकलेले ऊस तोडण्यासाठी २-३ महिने येऊन राहतात. बीड, परभणी अशा जिल्ह्यांमधून इथे राहायला आलेल्या या कुटुंबांबरोबर त्यांची लहान-लहान मुलेही आई-बाबांबरोबर एखाद्या मोठ्या मैदानावरील छोट्याशा पालामध्ये इतर शेकडो कुटुंबांबरोबर राहात असतात. या मुलांची २-३ महिन्यांची शाळा बुडते आणि ही मुलं अभ्यासात खूप मागे पडतात. हे चित्र बदलण्यासाठी १९९२-९३ पासून प्रबोधिनीनं '१०० दिवसांची साखरशाळा' हा उपक्रम सुरू केला. पालावरच्या पोरांना गोळा करणं, त्यांच्या स्वच्छतेकडे लक्ष देणं, त्यांचे खेळ घेणं, त्यांना शिकविणं ही कामं प्रबोधिनीचे कार्यकर्ते करत होते. या कार्यकर्त्यांना मदत म्हणून इ. आठवीतील प्रशालेतील मुलं जायची. मी आठवीत असताना मीही गेलो आणि एक विलक्षण जिवंत अनुभव घेऊन परत आलो. या उपक्रमाचे यश आणि त्याचे महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प राबविणे सर्व साखर कारखान्यांसाठी बंधनकारक केले आणि प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांना या उपक्रमात मार्गदर्शक म्हणून सहभागी करून घेतले. प्रबोधिनीच्या शैक्षणिक नेतृत्वावर ही चांगलीच मोहोर उठवलेली आहे. नंतरही अनेक उपक्रमांमध्ये प्रबोधिनीच्या या शैक्षणिक नेतृत्वाचा परिचय होत गेला.

प्रबोधिनीच्या वेगामध्ये आणखी जोराची भर घालणारा, प्रबोधिनीला अधिक गतिमान करणारा आणि अधिक एकात्मिक करणारा उपक्रम म्हणजे दर वर्षीचा 'सेतुबंधन' मेळावा होय. प्रबोधिनीच्या सर्व केंद्रांवरील 'प्रबोधिनी हे आमचे कार्यमाध्यम राहील' असे म्हणत असलेले ३००हून अधिक सदस्य यावेळी एकत्र जमतात. काही सामायिक विषयांवर एकत्र चिंतन करतात. तेव्हा त्यातून जी ऊर्जा निर्माण होते, दोन वेगळ्याच विषयावर काम करणाऱ्या विभागांमधील जो परस्परसंवाद वाढतो, त्याने प्रबोधिनीचे हे अद्‌भुत रसायन आणखी एकजीव आणि उमदे होते, असे माझे तीन सेतुबंधन मेळाव्यांनंतर तयार झालेले ठाम मत आहे. यापुढच्या काळात आमच्याकडून आणखी मोठे काम उभे राहो. एकच काय हजारो आप्पा पेंडसे आणि विवेकानंद, अरविंद आम्हा कार्यकर्त्यांमधून बनोत, अशी या सर्व इतिहासाकडे पाहून आशा व्यक्त करतो.

**– नचिकेत नित्सुरे**
nachiket.nitsure@jnanaprabodhini.org
meghnadsaha.dal@jnanaprabodhini.org

सु व र्ण म हो.. **१९८०**.. वा ट चा ल
आरंभ महाविद्यालय प्रारंभ, ज्ञान प्रबोधिनी खंड २ प्रकाशित, सर्वंकष ग्रामीण आरोग्य योजनेची सुरुवात

**बांधवांच्या आर्त हृदयी, मेघसे ओसंडुनी ।**
**शिंपिती जे प्रेम अपुले असति का ऐसे कुणी ।।**
**शुभेच्छा ! – श्री. पी. सी. पेठे, पुणे**

# प्रबोधनाचे गीत आज हे मुक्त स्वरांनी गाऊ...

**- डॉ. नलिनी गुजराथी**

प्रबोधिनीतील पहिल्या दिवसापासूनचा माझा प्रवास हा संगीतमय होता. मी आठवीत असताना १९६४ मध्ये प्रबोधिनीत यायला लागले. कै. आप्पासाहेब पेंडसे आम्हा युवतींच्या बैठका घेत. आप्पांचा आवाज अतिशय सुरेल, अमृतमधुर होता. बैठकीच्या सुरुवातीला ते देशभक्तिपर गीतं, भजनं स्वतः गात, आम्हाला म्हणायला शिकवत. आम्हाला सुरुवातीला शिकायला मिळालेली पद्यं ही बहुतेक संघातली होती. 'असार जीवित केवळ माया, रडगाणे हे गाऊ नका', 'हे अखंड राष्ट्रपुरुष', 'जननी जगन्मातकी...' अशी कितीतरी गीतं आजही आठवतात. या पद्यांमधून देशभक्तिपर विचार मनात नक्कीच रुजत होते. पण आप्पांना आणि कार्यकर्त्यांना असेही वाटत होते की, या पद्यांमधून ज्ञान प्रबोधिनीचे विचार कोठे व्यक्त होत आहेत? तेव्हा प्रबोधिनीचे विचार मांडणारी नवी पद्ये रचली पाहिजेत. जे कार्यकर्ते कविहृदयाचे होते, ज्यांच्याकडे काव्य करण्याची प्रतिभा होती, त्यांना यातून प्रेरणा मिळाली आणि प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांनी पद्ये रचण्यास सुरुवात केली. त्यांना चाली लावण्यास, बैठकांतून, प्रशालेतून म्हणण्यास सुरुवात केली.

अगदी सुरुवातीला मी एकेलेलं पद्य होतं. - प्रा. विनयराव हर्डीकरांचं-

*नव्या युगाचे पाईक आम्ही तारे नवक्षितिजावरचे।*
*निजरुधिराची आण वाहुनी 'रूप पालटू देशाचे'।।*

*या* पद्यातील 'रूप पालटू देशाचे' हे शब्द म्हणजे प्रबोधिनीचे उद्दिष्ट नेमक्या शब्दात सांगणारा मंत्रच बनून गेला. कार्यकर्त्यांच्या हृदयात जाऊन रुजला. आपल्याला काय करायचंय? तर देशाचं रूप पालटायचंय, हा विचार या पद्यामुळे मनात घट्ट रुजला. प्रबोधिनीचं तत्त्वज्ञान मांडणारं सखोल चिंतन आप्पांच्या मनात प्रबोधिनीच्या स्थापनेपूर्वीपासूनच चालू होतं. विवेकानंदांनी मांडलेलं विचारधन हे त्यामध्ये पायाभूत होतं. 'यापुढे मातृभूमी हे एकच दैवत - त्याचीच पूजा करा - शक्तीची उपासना करा, हिंदुस्थानचा प्राण हा त्याच्या आध्यात्मिकतेत आहे - हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे, राष्ट्रभक्तीने भारलेले आणि सर्वस्व मातृभूमीच्या पायी अर्पिणारे युवक तिला जगताच्या गुरुस्थानी बसवतील,' असे अनेक तेजस्वी विचार स्वामीजींनी मांडले होते. हे विचार

*समोर मूर्ती मातृभूमिची, आज न काही प्रिय दुसरे...*
किंवा *त्यागपत्र हे आजच लिहिले अवघ्या जीवनपुष्पाचे...*

यांसारख्या ओळींतून अभिव्यक्त होत गेले. त्याप्रमाणे 'अध्यात्माच्या बाबतीत सनातन्यातील सनातनी आणि विज्ञानाच्या बाबतीत आधुनिकातले आधुनिक बनूया' हा विवेकानंदांचा विचार

*यंत्रदेव तो पूज्य आम्हाला, पूज्य आम्हाला वेदऋचा।*
*विज्ञानावर भक्ती असूनही, गंध मोहवी काव्याचा ।।*

या ओळीतून प्रगट होतो. प्रा. डॉ. अशोक निरफराके यांनी विवेकानंदांचे विचार सांगणारं पद्य रचलं -

*त्या तेजस्वी डोळ्यांमधली वीज अजून सांगते।*
*उत्तिष्ठत जाग्रत ! बंधूंनो, उत्तिष्ठत जाग्रत ।।*

हे गीतही कार्यकर्त्यांच्या ओठी रुळलं.

युवती विभागात १९७० ते ७५ या काळात डॉ. लताताई भिशीकर, प्रा. हेमाताई अंतरकर, प्रा. विद्याताई हर्डीकर, प्रा. नीलाताई देशमुख,

सु व र्ण म हो.. **१९८०**.. वा ट चा ल
प्रज्ञा मानस संशोधिकेस पुणे विद्यापीठाची मान्यता,
मीनाक्षीपुरम् धर्मांतर अभ्यासदौरा



त्रिभुवनाला उजळणारे, प्रखर ते तेजोमणी।
प्राणदायी जे प्रचोदक असति का ऐसे कुणी ?
प्रबोधिनी विशेषांकाला हार्दिक शुभेच्छा। - **श्री. सुधाकर दत्तात्रय मुळे, ठाणे**

प्रा. रंजनाताई अभंग आणि मी अशा सहाजणी एकत्र येऊन युवती विभागाचं काम बघत होतो. एकीकडे महाविद्यालयात शिक्षण घेणं चालू होतं आणि संध्याकाळच्या वेळात युवतींसाठी प्रबोधशाळा चालवत होतो. १९७५ मध्ये युवती प्रशालेचा पाचवीचा वर्ग सुरू झाला होता. युवती विभागातलं वातावरण ध्येयानं भारलेलं होतं. अशा वातावरणात पद्यांची बीजे न रुजतील तरच नवल!

लताताई या अत्यंत प्रतिभावान अशा कवयित्री. प्रबोधिनीचे विचार सांगणारी बहुसंख्य पद्ये ही त्यांनी लिहिलेली आणि त्यातल्या अनेक पद्यांना मी चाली लावलेल्या! या सर्वच पद्यांचे शब्द हृदयातून आले होते, उत्कट होते. त्यातले देशभक्तीचे भाव सच्चे होते. त्याला प्रत्यक्ष करीत असलेल्या कार्याची पार्श्वभूमी होती. वाङ्मयाच्या दृष्टीने सुद्धा त्यातले शब्द काव्यात्म, चपखल, अर्थघन होते. भाषा संस्कृतप्रचुर, आशयसंपन्न होती. सर्वसामान्यांनासुद्धा खूप आवडणारी, पण अर्थ समजायला गहन अशी ही पद्यरचना होती.

लताताईंचे *'यापुढे यशाकडे अखंड झेप घ्यायची'* हे पद्य कार्यकर्त्यांच्या मनावर मार्चिंग करू लागले. या पद्याचे शब्द खणखणीत होते.

*वज्रता, विनम्रता तनूमनात बाणवू ।*
*स्नेहशील एकता निजांतरात तेववू ।।*

या ओळी किंवा *'मृगेन्द्रता स्वयंहि एव मंत्र एक जाणते...'* यांसारख्या ओळीतून संस्कृतप्रचुरता जाणवत होती. हे पद्य म्हणत असताना 'आम्हाला काही तरी भव्य दिव्य असं करून दाखवायचं आहे' ही प्रेरणा आजही युवक-युवतींच्या मनात जागी होते.

*आव्हान हे ज्योतिंना की या ।*
*मातृभूमिपूजनास या, या प्रकाशसाधनेस या ।।*

हे पद्य लताताईंनी खास युवतींसाठी लिहिलेलं. *'तत्वरत्नवैजयंतिशोभिनी'* सारख्या भारदस्त ओळी असलेलं हे पद्य! सुंदर चालीमुळे हे पद्यही युवतींना कंठगत झालं.

*ध्येयसूर्य ना कधीही मावळो ।*
*की अफाट नभ वरून कोसळो ।।*

या ओळीतून कितीही संकटे आली, अडचणी आल्या तरी ध्येयाचा ध्यास सोडायचा नाही हे मनावर ठसत होतं.

१९७७ साली लताताईंनी लिहिलेलं *'हे आनंदी गाणे'* हे गीत खूप गाजलं. प्रथम आकाशवाणीवरील स्पर्धेसाठी युवती प्रशालेतील ५-६ जणींनी हे पद्य गायलं. बहुधा त्यांनी हे पद्य या स्पर्धेसाठीच लिहिलं असावं. त्याला चाल लावली होती कै. श्री. मनोहर केतकरांनी. त्याला बक्षीसही मिळालं. त्यावेळचे पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांची प्रबोधिनीला भेट होती. त्यासाठी ते गीत बसवून घेण्याची जबाबदारी माझ्यावर होती. वास्तूतील सरावाच्यावेळी सकाळ-संध्याकाळ या गीताचे शब्द घुमू लागले आणि सगळी प्रबोधिनीच गीतमय, धुंद होऊन गेली! सगळ्यांच्या मनात होतं की, हे पद्य अप्रतिम झालं पाहिजे, आणि तसं ते झालंही.

*प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया ।*
*समर्थ मायभूमिला जगी करावया ।।*

हे पद्य लताताईंनी ५ वी ते ७ वी या वयोगटासाठी लिहिलं होतं. खेळ खेळून, अभ्यास करून, लेखन- वाचन करून फक्त विषयाचं अध्ययन करणं महत्त्वाचं नाही तर प्रत्येक विषयाच्या अभ्यासातून देशासमोरचे कोणते प्रश्न सोडवता येतील याचा विचार करायचा. हे आप्पांनी प्रबोधिनीच्या शिक्षणाचं सांगितलेलं उद्दिष्ट, या पद्यात अतिशय सोप्या शब्दांतून मुलांपर्यंत पोहोचवलं होतं.

लताताईंचंच आणखी एक पद्य... *'हिंदु ऐक्याची ध्वजा...'* ते सुद्धा असंच सगळ्यांच्या मनात रुंजी घालू लागलं. त्यातील प्रत्येक कडव्याला वेगवेगळ्या चाली लावल्या होत्या. त्यामुळे डोलणाऱ्या ध्वजाप्रमाणेच हे पद्य मनात लहरत जायचं. इतिहासकाळापासून ते आतापर्यंत हिंदूंनी लढाया केल्या, धर्मरक्षणासाठी प्राण सांडले, त्या हिंदुऐक्याचा ध्यास आम्हाला लागो, तो आमचा प्राण हेतू बनो, हा विचार त्यातून मनात दृढ होत गेला.

सु व र्ण म हो.. **१९८१**.. त्स वा ट चा ल
नवनगर विद्यालय निगडी स्थापना,
समाज ऐक्य समितीची स्थापना, मुद्रण विभाग प्रारंभ

यत्नात स्वप्न पाहू सामर्थ्य वैभवाचे ।
येथेच अवतरो की ते ब्रह्मतेज साचे ।।
**शुभेच्छा ! – श्री. नागेश साने, पुणे**

*क्षुब्ध लाट होऊनी कधी नभी थरारते*
*हर्षमत्त होउनी कधी रणात नाचते।*
*उधळिते घेऊनी अग्निपुष्पे करी ।।*

या शब्दातून ती अमूर्त अशी हिंदुऐक्याची संकल्पना ध्वजाच्या रूपकातून आपल्यासमोर जणु नृत्य करू लागते.लतातार्ईंनी लिहिलेलं

*शतकातुन द्रष्ट्यांचे स्वर निनादती ।*
*अग्रेसर हिंदुराष्ट्र हिंदू संस्कृती ।।*

हे पद्य तसंच प्रा. सुहासिनीताई देशपांडे यांनी लिहिलेलं -

*गर्जोन उठे कथण्याते जल आज सप्तसिंधुंचे ।*
*आसिंधुसिंधु धरतीचे, हे राष्ट्र हिंदु हिंदुंचे ।।*

हे पद्य, या तीनही गीतांतून हिंदुत्वाची गर्जना खणखणीतपणे निनादत होती. फाळणीचं दु:ख व्यक्त होत होतं. त्यातूनच उज्ज्वल भविष्यकाळ घडविण्यासाठी समर्पणाची हाक कार्यकर्त्यांसाठी होती.

या सगळ्या काव्यभरल्या वातावरणात प्रा. हेमाताई अंतरकरांना पण पद्य रचण्याची स्फूर्ती झाली आणि दोन अप्रतिम पद्ये प्रबोधिनीला लाभली. *'तनू मनात एक ध्यान, प्रिय महान हिंदुस्थान'* हे असंच खणखणीत पद्य.

*सरेल दैन्य येथले, सुबुद्ध कष्ट सिंचता ।*
*बहरतील वैभवे ध्यासबीज पेरता ।*
*शतयुगे अदीन हा, प्रिय महान हिंदुस्थान।।*

जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याने आपल्या देशाचे दारिद्र्य दूर करता येईल असा भक्कम आशावाद या कडव्यातून व्यक्त होतांना दिसतो. प्रा. हेमाताईंचं दुसरं पद्य

*विश्वात सर्व शोभो, हा हिंदुदेश अमुचा।*
*त्याच्याच पूजनाचा हा ध्यास अंतरीचा ।।*

त्यांनी हे पद्य मला चाल लावायला दिलं होतं. पण प्रत्येक कडव्यात ८ लहान ओळी असल्याने चाल सुचत नव्हती. त्यामुळे अनेक दिवस ते पद्य फाईलमध्येच अडकून पडलं होतं. एका संध्याकाळी अचानक मला चाल सुचली. रात्री ९ पर्यंत ती बांधून पूर्ण झाली होती. मी हेमाताई, लतातार्ईंना लगेच प्रबोधिनीत बोलावलं आणि उपासना मंदिरात त्यांना चाल ऐकवली. त्या रात्री मी हवेतच तरंगत होते. दुसऱ्या दिवशी आप्पांना चाल ऐकविली. आप्पांना गीतांचे शब्द व चाल एवढी भावली की 'हे गीत तर राष्ट्रगीतासारखं म्हटलं जायला हवं', असे उद्‌गार त्यांनी काढले. त्यानंतर अनेक महिने ह्या गीताचे स्वर प्रबोधिनीत दुमदुमत राहिले. कुणीही युवती, विद्यार्थिनी आप्पांना भेटायला कार्यालयात गेल्या, की पहिल्यांदा त्यांना हे गीत आप्पांना म्हणून दाखवावं लागे नि मगच पुढची चर्चा सुरू होई. या गीतातील

*सत्यासमोर असणे हा सूर्यफूल बाणा ।*
*नचिकेत निर्भयांचा हा हिंदुदेश अमुचा ।।*

यासारख्या ओळीतून काव्यात्म रूपकांची सुंदर शब्दयोजना झालेली आहे. *'व्योमास व्यापू अवघ्या प्रज्ञेत ही भरारी'* या ओळीतून युवा शक्तीची झेप जाणवते. या गीतातून आप्पांनी पाहिलेली स्वप्नं, प्रबोधिनीची स्वप्नं, विवेकानंदांची स्वप्नं अतिशय भावपूर्ण रीतीने अभिव्यक्त झाली होती आणि सुमधुर चालीमुळे ती हृदयापर्यंत पोहोचत होती. माझ्यासाठी हे सारेच क्षण अविस्मरणीय ठरले...!

प्रबोधिनीत कार्यकर्त्यांचा कार्यप्रवास प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ प्रतिज्ञा घेऊन पुढच्या पुढच्या टप्प्यावर जातो. युवती विभागाच्या प्रथम व द्वितीय प्रतिज्ञा ग्रहणाच्या पहिल्या कार्यक्रमासाठी लतातार्ईंनी *'शुभ्र सुगंधित'* हे पद्य लिहिलं होतं आणि मी चाल लावली होती.

*शुभ्र सुगंधित पुष्पे आणिक शुभ्र सुगंधित मने ।*
*मातृभूमि तव चरणी याहुन अन्य काय अर्पिणे ।।*
*हे अमुचे सश्रद्ध समर्पण स्वीकारी वरदे ।*
*अमुच्या शुभव्रतांना आई तुझे शुभाशिष दे ।।*

या गीतातून उमटलेले समर्पणाचे, त्यागाचे भाव मनं भारून टाकत होते.

*हिंदुभूमिच्या गौरवात मज श्रेय गवसले हो।*

या लतातार्ईंच्या गीतातून चतुर्थ प्रतिज्ञा घेतलेल्या व्यक्तींचं सर्वस्व समर्पणाचं व्रत अत्यंत तळमळीनं व्यक्त होत होतं. आप्पा जेव्हा हे पद्य स्वत: गाऊ लागत तेव्हा त्यातील व्याकुळतेने, उत्कटतेने डोळ्यांत अश्रू उभे राहत.

प्रबोधिनीत अनेक पद्ये नंतरच्या काळात विविध

सु व र्ण म हो.. १९८१.. वा ट चा ल
कृषितांत्रिक विद्यालय शिवापूर प्रारंभ,
युद्धनेतृत्व अभ्यास शिबिर, क्रीडा प्रात्यक्षिकांना प्रारंभ



मातृभूमी हे दैवत येथे स्थापियले, पूजिले ।
त्याग - पराक्रम - सेवा यांचे त्रिदल पदी वाहिले ।।
**शुभेच्छा ! – श्री. शैलेंद्र म्हसकर, पुणे**

निमित्तांनी रचली गेली. *'अंतरीच्या एका स्वप्नाने मूर्त रूप घेतले'* हे हृदयस्पर्शी पद्य प्रबोधिनीच्या वास्तुपूर्ती समारंभासाठी लिहिलं गेलं. *'हे वीर विवेकानंद...', 'असे हे शब्द नरेन्द्राचे...'* ही पद्ये विवेकानंद जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या युवक दिनासाठी लिहिली गेली. *'हे निवेदिते माते...'* किंवा *'हे ऋषिवर श्री अरविंद...'* ही गीते भगिनी निवेदिता, योगी अरविंद यांच्या विचारांचे स्मरण करून देतात. *'नमोऽस्तुते गुरुदेवा'* हे अशोकरावांचं गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करणारं गीत गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी रचलं गेलं. *'शिवभूमि आजला नवेच लेणे ल्याली'* हे गीत शिवगंगा खोऱ्यातील ग्रामविकसन कार्याच्या कार्यक्रमासाठी रचलं गेलं. आताच्या पिढीतील अनघाताई लवळेकर या प्रतिभावान कवयित्रीने पण अनेक स्फूर्तिप्रद गीते रचली आहेत. त्यांनी रचलेलं *'निवेदितांचे स्वप्न जयस्वी वास्तव होण्या अथक श्रमू...'* हे निवेदितांचे विचार सांगणारं पद्य युवक-युवतींसाठी प्रेरणादायी झालं आहे. *'हे गाणे मुक्त मनांचे, हे गाणे मुक्त स्वरांचे...'* हे गीत किंवा *'विश्वास हा मनीचा सांगू उभ्या जगाला, आम्ही रवी उद्याचे अंधार भेदण्याला...'* हे गीत आताच्या पिढीच्या भाषेत सहज, सोप्या शब्दांत रचलं असून युवकांना ते प्रेरणा देणारं आहे.

प्रबोधिनीची ही सर्व पद्ये शहरी विभागातील कार्यकर्त्यांना प्रेरक ठरत होती; पण खेड्यातील तरुणांना ती अवघड वाटत होती. ग्रामविकासाची विविध स्वप्ने रंगवणारी, खास ग्रामीण ढंगातली, सोप्या शैलीतली अनेक पद्ये श्री. रामभाऊ डिंबळे यांनी रचली. *'या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलुनी यावी'* या गीतातून किंवा *'ऐसे माझे नमुना गाव'* या गीतातून हे भाव व्यक्त होतात. खेड्यातील महिला नवऱ्याच्या दारू पिण्यामुळे, मारहाणीमुळे त्रस्त झालेल्या असतात. त्यांच्यासाठी तसेच बचत गटाचे काम करणाऱ्या आपल्या महिला कार्यकर्त्यांना काम करण्यासाठी विचारांचं भक्कम पाठबळ मिळावं म्हणून अनके पद्ये त्यांनी लिहिली. *'धडधाकट घरधनी हवा...', 'मी परावलंबी नाही...', 'आता नाही मी एकटी, मला मिळाल्यात सख्या, आता एकमेळ करू, नाही राहणार मुक्या...', 'गाव सुधारलं अन्...', 'एकीचा हिसका दाऊ या कीरं...'* या सर्व पद्यांमधून प्रबोधिनीच्या ग्रामविकासाच्या ध्येयाचं सुंदर दर्शन घडतं. एकाच लेखातून या सर्व पद्यांचा आस्वाद घेणं केवळ अशक्य आहे. येथे केवळ उल्लेख करावा लागतोय याची चुटपुट लागलीये! रामभाऊंचं वैशिष्ट्य म्हणजे अनेक पद्यांबाबत त्यांना कुणीतरी चाल सुचवली आणि मग त्या चालीवर त्यांनी सुंदर पद्ये रचली. शीघ्रकवित्व हे त्यांचं अजून एक वैशिष्ट्य!

'प्रबोधन गीते' या पद्यसंग्रहात सत्तर पद्ये संकलित केली आहेत. प्रत्येकच पद्य प्रबोधिनीचे विचार सांगणारं, आशयसंपन्न, उत्कट आहे. कार्यकर्त्यांनी ती कंठगत केली तर त्यातून सदैव प्रेरणा मिळत राहील. यातील अनेक गीतं छात्र प्रबोधनच्या अंकांमधून यापूर्वी प्रसिद्ध झालेली आहेतच. या गीतांची सीडी पण काढण्यात आली आहे. विविध शाळा महाविद्यालयांमधून कुमारांसाठी ही गीतं अध्यापकांनी बसवून घेतली तर युवकांना कार्यप्रेरणा निश्चितच मिळू शकेल.

युवा शक्तीला दिशा मिळत नाही, तिच्यासमोर आदर्श नाहीत अशी नेहमीच तक्रार असते, या गीतांद्वारा विवेकानंदांसारखे आदर्श तरुणांना भेटतील. समाजासाठी काय केलं पाहिजे हे कळेल. या सर्व पद्यांमध्ये मा. आप्पांनी लिहिलेलं पद्य - *'विकसता विकसता विकसावे'* हे आम्हा सर्वांच्या हृदयशिंपल्यातील जपून ठेवलेला मोतीच जणू! व्यक्तीनं स्वत:चा विकास कसा करावा? तो करता करता देशाचा, समाजाचा विकास करण्यासाठी कसे प्रयत्न करावेत हे सांगणारं, विकासाचा कानमंत्र देणारं हे पद्य म्हणजे मर्मबंधातली ठेव आहे! ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने पद्यांच्या या सुवर्णखजिन्याचं दर्शन घडविण्याची संधी मिळाली त्याबद्दल आनंद वाटतो.

**– डॉ. नलिनी गुजराथी**
१२७७ शुक्रवार पेठ, सुभाषनगर, गल्ली क्र. ५ पुणे – २
(युवती कन्यका प्रशालेच्या पहिल्या प्राचार्या)

सुवर्णमहो.. **१९८२** .. वाटचाल
मंजुश्री सारडा हत्येच्या निषेधार्थ आंदोलन,
कुष्ठरोग निवारणार्थ १२० गावांमध्ये काम सुरू

ध्येयासाठी उसळत जाता, या देहाचे भान कुठे?
तरुणांच्या धमन्यांत आजला, समर्पणाची आस उठे ।।
**शुभेच्छा ! – श्री. विजय निकम, पुणे**

# अदम्य अपुल्या आकांक्षा

उत्तमता, कल्पकता, पराक्रम, 'नाही' चं 'हो' करण्याचे धाडस, प्रश्नाच्या मुळाशी जाऊन त्यावर उत्तर शोधण्याचे प्रयत्न, संकटावर मात करण्यासाठी मदतीला धावून जाण्याची वृत्ती, अनेकविध उपक्रम – अनुभवांमधून विविध वयोगटातील व विविध आर्थिक, सामाजिक, भौगोलिक पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींमधला आत्मविश्वास वाढवण्याचा प्रयत्न, त्यांना सामाजिक जाणीवेची जोड देणारी शिक्षणप्रणाली, स्वदेशी व अध्यात्मिकतेचा स्पर्श असलेली जीवनपद्धती ही प्रबोधिनीच्या कार्याची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये. ही कार्यवैशिष्ट्ये ठळकपणे जाणवणाऱ्या प्रबोधिनीच्या काही विभाग–प्रकल्प–उपक्रम–प्रसंग यांच्या कहाण्या तुम्ही पुढे वाचाल. प्रबोधिनीच्या ५० वर्षांच्या वाटचालीत तितक्याच उत्कट, भारावून टाकणाऱ्या शंभराच्यावर कहाण्या निश्चितच सांगता येतील. प्रत्येक पानाखाली त्या–त्या वर्षांमधल्या महत्त्वाच्या घटनांचा निव्वळ उल्लेख केला आहे. त्या एकेका कहाणीची जणू शीर्षकेच आहेत. एकाच छताखाली चालणाऱ्या इतक्या विविधांगी प्रकारच्या कामाचं दर्शन त्यातून तुम्हाला घडेल.

## कौतुकाची थाप – एक्सलन्स ॲवॉर्ड !

**अनु. वाच. भाग्यश्री हर्षे**

दि. ९ डिसेंबर १९७५ ! ज्ञान प्रबोधिनीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा सुवर्णदिन ! याच शुभ दिवशी 'इंडियन सेंटर फॉर एन्करेजिंग एक्सलन्स' या मुंबईच्या संस्थेने डॉ. वि. वि. तथा आप्पासाहेब पेंडसे यांना सन्मानपूर्वक 'एक्सलन्स ॲवॉर्ड' देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. हा सोहळा दिल्लीला उपराष्ट्रपती भवनात पार पडला. तिथल्या सभागृहात या सोहळ्यासाठी सुमारे दीडशे मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या.

प्रो. एन. एच. आत्रेय यांनी मा. उपराष्ट्रपती श्री. जत्ती व अन्य मान्यवरांचे स्वागत केले; तसेच पुण्याच्या 'ज्ञान प्रबोधिनी' व मुंबईच्या 'इंडियन सेंटर फॉर एन्करेजिंग एक्सलन्स' या संस्थांच्या कार्याचा परिचय करून दिला.

*''डॉ. वि. वि. तथा आप्पा पेंडसे हे पुणे येथील ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे संस्थापक व शिल्पकार ! ज्ञान प्रबोधिनीची स्थापना १९६२ साली झाली आणि आप्पांच्या मार्गदर्शनाखाली प्रबोधिनीचे काम सुरू झाले. शिक्षणातील एक सुनियोजित आगळा-वेगळा प्रयोग म्हणजे ज्ञान प्रबोधिनी ! शिक्षण हे मनुष्य घडणीसाठी, समाजघडणीसाठी आहे, असे आग्रहाने सांगत, राष्ट्रघडणीस आवश्यक असे ओजस्वी शिक्षण देण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीची सुरुवात झाली. देशप्रश्नांची सोडवणूक*

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९८२..
त्रिवेंद्रम येथे पूर्ण वेळ कामासाठी युवक दाखल, पंजाब
पहिली सद्भावना यात्रा, सांगली येथील उपक्रमांना प्रारंभ




एकजीव उमदे व्हावे, जनजीवन गावोगावी ।
या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलुनी यावी ।।
शुभेच्छा ! – सायली साटम, पुणे

*करणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. 'कुटुंब, समाज, राष्ट्र आणि विश्वशक्ती यांच्याशी जोडलेले राहून व्यक्तींचे विकसन करणे,' यासाठी ज्ञान प्रबोधिनीतील प्रयोगशील शिक्षण पूरक ठरते. इथले सर्व उपक्रम व शैक्षणिक प्रयोग याच दिशेने जाणारे आहेत.*

*ज्ञान प्रबोधिनीच्या या वाढत्या उपक्रमांमुळे भारतातील बहुसंख्य शिक्षणतज्ज्ञ, लोकहितकर्ते आणि समाज कार्यकर्ते यांचे तसेच मुंबईच्या 'इंडियन सेंटर फॉर एन्करेजिंग एक्सलन्स' या संस्थेचेही लक्ष प्रबोधिनीच्या उपक्रमांकडे गेले.*

*'इंडियन सेंटर फॉर एन्करेजिंग एक्सलन्स' हा ग्रूप १९७२ पासून मुंबई येथे कार्यरत आहे. लोककल्याणासाठी कार्य करणाऱ्यांना प्रोत्साहक सहकार्य करण्याचे तसेच सर्वार्थांनी उत्कृष्ट अशा कार्याचा, गुणांचा गौरव करण्याचे कार्य ही संस्था करते. डॉ. आप्पा पेंडसे यांचे त्याच दिशेने चाललेले काम पाहून संस्थेने या 'एक्सलन्स ॲवॉर्ड'साठी ज्ञान प्रबोधिनी संस्थेची निवड केली.''*



**डॉ. आप्पा पेंडसे यांना मिळालेल्या एक्सलन्स ॲवॉर्डचे मानचिन्ह**

या परिचयानंतर एक्सेल इंडस्ट्रीजचे सदस्य श्री. बाबूभाई कराणी यांनी डॉ. पेंडसेंना दिलेल्या मानपत्राचे वाचन केले. डॉ. पेंडसेंविषयीचे गौरवोद्गार या मानपत्रात होते -

**मानपत्र**

*''बुद्धिमान विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या क्षेत्रात मूलभूत काम केलेल्या ज्येष्ठ व्यक्तीचा आपल्या रूपानं आज आम्ही सत्कार करीत आहोत.*

*आपण विद्यार्थीदशेत होतात तेव्हा आपल्याला जाणवलं की, या देशातील बुद्धिमान तरुणांची पिढी सामाजिक जाणिवेवाचून दिशाहीन झाली आहे. त्याच वेळी आपल्याला विश्वासही वाटत होता की योग्य मार्गदर्शन आणि मन:पोषण मिळालं, तर आपल्याकडील बुद्धिमान तरुणांची एक शुभशक्ती उभी राहू शकेल आणि देशाच्या गरजा ती पूर्ण करू शकेल.*

*आपला आपल्या स्वत:वर आणि सहकाऱ्यांवर पूर्ण विश्वास होता आणि म्हणूनच आपलं संपूर्ण आयुष्य या कामी खर्च करायचं आपण ठरवलंत. जवळ पैसा नसताना, मनुष्यबळ पाठीशी नसताना, आपण जवळ जवळ एकट्यानेच एका वैशिष्ट्यपूर्ण कल्पनेला आकार दयायला सुरुवात केली. ही संकल्पना होती बुद्धिमापन करून मुलं निवडण्याची आणि त्यांच्या संस्कारक्षम वयात त्यांच्यावर उत्तमोत्तम संस्कार करण्याची.*

*आपली स्वच्छ दृष्टी, शास्त्रीय पद्धतीनं विचार करण्याची पद्धत, मिशनरी वृत्ती आणि सतत प्रयत्न यांतून आपल्या संकल्पनेनं 'ज्ञान प्रबोधिनी' नावाच्या संस्थेचा आकार घेतला.*

*१४ वर्षांच्या आपल्या अथक प्रयत्नांतून निर्माण झालेली ज्ञान प्रबोधिनी ही वैशिष्ट्यपूर्ण संस्था आहे. विवेकानंदांच्या विचारांनुसार 'मानव-घडणीचे' शिक्षण देणारी, त्यासाठी वास्तवाचं भान देणारी व समाजाशी प्रत्यक्ष सांधा जोडणारी, भारतीय तत्त्वज्ञानाच्या पायावर उभी अशी ही संस्था आहे. तसेच इथे आधुनिकातल्या आधुनिक विज्ञानाचीही कास धरलेली आहे. मानवी आयुष्याशी निगडित असलेल्या सर्व क्षेत्रांशी संबंधित शिक्षण इथे प्रकल्पातून दिले जाते. हा केवळ शैक्षणिक प्रयोग नाही तर हा एक पथदर्शी, बहुआयामी असा प्रकल्प आहे; चळवळ आहे.*

*ही चळवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशव्यापी व्हावी*

सुवर्ण महोत्सवी वाटचाल ..१९८३..
उद्वाहक विभागास प्रारंभ, आप्पांचे महाप्रयाण,
जिव्हाळा समुपदेशन केंद्र प्रारंभ, केरळ अभ्यास दौरा

निर्भयता बळ आस्था यांचे एकी हे दैवत समजावे ।
जे जे वंचित त्यांच्यासाठी, संघटना हे सूत्र बनावे ।।
शुभेच्छा ! – श्री. अनिलराव देशमुख, पुणे

*यासाठी वयाच्या साठाव्या वर्षीही आपण प्रयत्नशील आहात. उत्साही कार्यकर्ता, उत्तम योजक आणि प्रभावी प्रेरक म्हणून आपण पुढची पुष्कळ वर्षे जबाबदार नेतृत्वासाठी तरुणाईला घडविण्यात घालवावीत, अशी सदिच्छा ही संस्था व्यक्त करीत आहे. आमच्या आदराचे, कौतुकाचे आणि प्रेमाचे प्रतीक म्हणून आपण या पुरस्काराचा स्वीकार करावा.''*

मानपत्राच्या या वाचनानंतर टाळ्यांच्या कडकडाटात मा. आप्पांनी उपराष्ट्रपती श्री. बी. डी. जत्ती यांच्या हस्ते हे पारितोषिक स्वीकारले.

हा एक्सलन्स पुरस्कार जेवढा मानाचा व अर्थपूर्ण आहे तेवढीच त्याची दृश्य छबीही अत्यंत सूचक व परिणामकारक आहे. हे पारितोषिक अनंत आकाशाला गवसणी घालणाऱ्या एखाद्या रॉकेटप्रमाणे दिसते. त्यावर ACME ही अक्षरे कोरलेली आहेत. ACME म्हणजे शिखर किंवा कळस. हा पुरस्कार म्हणजे जणू आप्पांच्या शिखरगामी कार्याचा निदर्शकच !

हे पारितोषिक स्वीकारल्यावर या सत्काराला उत्तर देताना मा. आप्पांनी केलेल्या भाषणाचा हा सारांश त्यांच्याच शब्दांत...

*''...आमच्या गटाला १९५६ च्या सुमारास ज्ञान प्रबोधिनी सुरू करण्याची कल्पना सुचली. प्रबोधिनीची शाळा केवळ अभ्यासक्रमाला नाही तर उद्दिष्टाला प्रधान मानणारी शाळा आहे. एखादा तरी देशप्रश्न समजून घेऊन तो सोडविण्याची जबाबदारी स्वीकारायची या हेतूने प्रबोधिनीतील सर्व अभ्यास चालला पाहिजे. पुस्तकी अभ्यासाकडे आम्ही साधन म्हणून अवश्य लक्ष देतो.*

*प्रेरणा-जागरण ही शिक्षणातील पहिली पायरी आहे तर वृत्ती-घडण ही त्यानंतरची पायरी आहे. काही वृत्ती जीवनमूल्यांकडे निर्देश करतात. जशा 'मातृदेवो भव । पितृदेवो भव। आचार्यदेवो भव। राष्ट्रदेवो भव ।' ती अंगी बाणवायला हवीत. तशाच काही कष्टसाध्य वृत्ती आहेत. 'माझ्या आयुष्यात काहीतरी लक्षणीय केल्याशिवाय मी समाधानी नाही. माझ्या प्रत्येक कामात उत्तमता आल्याशिवाय माझ्या आयुष्याचे सार्थक होणार नाही.' व्यक्तिमत्त्व विकसित होण्यासाठी अशा वृत्ती अंगी मुरल्या पाहिजेत. त्यासाठी आवश्यक ते बदल स्वत:मध्ये करता यायला हवेत. मन लवचिक ठेवण्याची वृत्ती घडवायला हवी. अशा वृत्ती - घडणीवर ज्ञान प्रबोधिनीमध्ये खूपच भर असतो.*

*क्रमिक विषयांचे अध्ययन, प्रेरणा-जागरण, वृत्ती-घडण आणि नेतृत्व-विकसन ही सर्व दैनंदिन कामातून साधायची **आजची उद्दिष्टे** आहेत. पुढाकार घेण्याची वृत्ती, धडाडी, निर्णयक्षमता, चिकाटी यांसारखे नेतृत्वाचे विविध गुण वाढविण्यासाठी प्रबोधिनीत सातत्याने प्रयत्न केले जातात.*

*याशिवाय उद्याचेही एक उद्दिष्ट आहे. प्रबोधिनीत शिकलेला विद्यार्थी भारतीय संस्कृती व अध्यात्माचे पुनर्जागरण करण्याच्या ध्येयाचा उपासक व्हावा, त्यासाठी त्याने सामाजिक वा भौतिक शास्त्रातील संशोधक व्हावे, भाषा व कला यातून त्याला विचार प्रसारित करता यावेत अशा पद्धतीचे शिक्षण देणे, हे **उद्याचे उद्दिष्ट** आहे.*

*केवळ आजच्या व उद्याच्या उद्दिष्टावर थांबून चालणार नाही, तर प्रबोधिनीच्या दृष्टीने परवाचे उद्दिष्ट हे अधिक महत्त्वाचे आहे. प्रबोधिनीच्या कामाचा पाया भारतीय अध्यात्म आणि समता, बंधुता, सामाजिक न्याय व विज्ञानातील उत्तमता यांच्या समग्रतेतच आहे. या उद्दिष्टांनी प्रेरित झालेले किमान दोनशे युवक आणि युवती देशाला देणे, हे प्रबोधिनीचे **परवाचे उद्दिष्ट** आहे.''*

मा. आप्पांच्या या भाषणातून ज्ञान प्रबोधिनीची शिक्षणविषयक भूमिका आणि उद्दिष्टे स्पष्टपणे मांडली गेली. या विचारांनी जागवलेली प्रेरणा हीच प्रबोधिनीची प्राणशक्ती आहे. तिच्यामुळेच प्रबोधिनी आजही उद्दिष्टांच्या दिशेने कार्यरत आहे. मोठे कार्य उभे राहायला खरोखरच कौतुकाची एक थापही मोलाची मदत करीत असते.

(ज्ञान प्रबोधिनी खंड - २ मधील मूळ इंग्रजी लेखाचा अनुवाद)

**– अनु. वा. भाग्यश्री हर्षे**
२/२२, त्रिमूर्ती हौ. सोसा., शिवतिर्थनगर, कोथरुड, पुणे – ३८
(ज्ञान प्रबोधिनी पुणे प्रशालेच्या पर्यवेक्षिका)

सु व र्ण म हो.. **१९८३**.. त्स व टा च ला

दोन युवती दोन वर्षांसाठी पंजाबमध्ये
पूर्णवेळ कामासाठी दाखल, पुण्यात NTS वर्गांना प्रारंभ



एक जयांचे दुखणे त्यांनी, समदु:खी बंधू समजावे ।
आणि एकता हेच आपुले, याच्यापुढती दैवत व्हावे ।।
**शुभेच्छा ! – संतुल, पुणे**




# कथा उद्योगांची

**अनिल रिसबूड**

मुलांनो, तुम्हाला कदाचित असा प्रश्न पडेल की ज्ञान प्रबोधिनी ही एक शैक्षणिक संस्था आहे, तरी तिचा उद्योगांशी काय संबंध? तर त्याचे असे आहे...

मुंबईतील उद्योगपती आप्पासाहेब कोटीभास्कर हे प्रबोधिनीचे पहिले अध्यक्ष होते. १९६१-६२ चे वर्ष असेल ते; तेव्हा प्रबोधिनीची घटना लिहिण्यात येत होती. घटनेची विविध कलमे मांडली जात होती. त्यावेळी कोटीभास्करांनी एक कलम आवर्जून सुचविले की 'संस्था अर्थार्जनासाठी स्वत:चे उद्योग, व्यवसाय चालवू शकेल.' त्यांचे असे म्हणणे होते की सरकारी अनुदानामुळे येणारी अनेक बंधने संस्थेचे स्वातंत्र्य व प्रयोगशीलता नष्ट करतात. प्रबोधिनीचे ध्येय शिक्षणक्षेत्रात काहीतरी नवीन करून दाखवायचे (A new Experiment in Education) असे आहे. अनुदानामुळे हे साध्य होण्यास अडचण येणार व केवळ देणग्यांवरही अवलंबून राहणे योग्य होणार नाही. तेव्हा संस्थेला स्वत:चे अर्थार्जन करता आले पाहिजे. अशाप्रकारे उद्योगाच्या दिशेने प्रबोधिनीच्या विचारांची सुरुवात झाली.

**यंत्रशाळेची सुरुवात**

प्रबोधिनीचे आद्य संस्थापक डॉ. आप्पा पेंडसे संस्थेला देणग्या मिळविण्यासाठी विविध व्यक्तींना, उद्योगपतींना भेटत असत. एकदा असेच आप्पा शंतनुराव किर्लोस्कर यांना भेटायला गेले होते. त्या भेटीत शंतनुराव किर्लोस्कर म्हणाले, ''मी एखादी देणगी देईन पण ते पैसे संपून जातील, पुढे काय कराल? तुमची तयारी असेल, तर मी किर्लोस्कर ऑईल इंजिन या माझ्या कंपनीतून यंत्रे व काम देऊ शकेन, पण ती यंत्रे कोण चालविणार? उद्योग चालविणे सोपे नाही. तुम्ही तर शिक्षण क्षेत्रातील मंडळी. तुमच्याकडे उद्योग व्यवस्थापनाचे ज्ञान, कौशल्य व अनुभव कुठे आहे?'' तो प्रश्न तेथे अनुत्तरित राहिला. परंतु आप्पांनी त्या दिशेने जायचे ठरविले. भास्करराव कोल्हटकर व अरविंद वाकणकर यांना हाताशी धरून प्रायोगिक तत्त्वावर पुण्यात कर्वे रस्त्याला भाड्याच्या जागेत छोट्या प्रमाणावर यंत्रशाळा सुरू झाली. ते वर्ष होते १९६९.

**सुवर्णमहोत्सवी वाटचाल .. १९८४ ..**
पंजाबमध्ये शांतियात्रा, युवक व युवती प्रशालांचे व्यवस्थापन एकत्र, शिवापूर येथे नवजीवन वर्गांना प्रारंभ

**मी आणि यंत्रशाळा**

१९७० मध्ये मी अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षात शिकत होतो. मी प्रबोधिनीच्या पहिल्या तुकडीचा विद्यार्थी - १९६२ सालचा. त्यावेळी प्रबोधिनीची पूर्णवेळ शाळा सुरू झाली नव्हती. 'प्रबोध वर्ग' नू.म.वि. प्रशालेमध्ये सकाळी भरायचे. ६४ साली एस. एस. सी. पास झाल्यानंतरही माझे प्रबोधिनीत येणे-जाणे असायचे.

त्यावेळी आप्पांनी मला यंत्रशाळेविषयी त्यांची योजना सांगितली व 'शिक्षण पूर्ण झाल्यावर यंत्रशाळेच्या कामासाठी प्रबोधिनीत ये,' असे सुचविले. पूर्ण शून्यातून हा प्रकल्प उभारायचा हे मोठे आव्हान मी स्वीकारले आणि शेवटचा पेपर देऊन तडक दुसऱ्या दिवसापासून मी यंत्रशाळेच्या उभारणीसाठी प्रबोधिनीत रुजू झालो!

**शिवापूर - कोटीभास्कर स्मृतिउद्योग**

प्रबोधिनीची शिवगंगा व गुंजवणी खोऱ्यांच्या विकासासाठी काम करण्याची योजना होती. प्रस्तावित यंत्रशाळा ही या योजनेशी सांगड घालून शिवापूरला (पुण्यापासून २० कि.मी. अंतरावर) शिवगंगा खोऱ्यामध्ये करावी असा निर्णय झाला.

पूर्व दिव्य आज फिरूनि आठवू , रम्य भाविकाल चित्र रंगवू ।
यत्न सेतुनी मार्ग घडवुनी, ध्येयसाधनेची करू सांगता ।।
शुभेच्छा ! – श्री. विश्वास हर्षे, पुणे



**यंत्रविस्तार योजनेतील श्री. गुलाब कांबळे यांच्या पहिल्या उद्योगाचे उद्घाटन करताना श्री. शंतनुराव किर्लोस्कर**

कुठलाही उद्योग नव्याने सुरू करताना काही गोष्टींची नितांत आवश्यकता असते. कच्चा माल, वीज, पाणी, दळणवळण व संपर्काची साधने, कुशल कर्मचारी, ग्राहकापासूनची नजिकता इत्यादि. यातली एकही गोष्ट शिवापूरमध्ये उपलब्ध नव्हती. तरीही शिवापूरलाच यंत्रशाळा चालू करण्याचा आग्रह पुढील उद्‌दिष्टांसाठी होता : स्थानिक तरुणांना प्रशिक्षण व रोजगार, शेतीला पूरक उत्पन्न व शहराकडे जाणारा तरुणांचा ओघ रोखणे. यासाठी शिवापूरला जागा खरेदी करून तेथे उत्तम यंत्रपडवी बांधण्यात आली. बँकेचे अर्थसाहाय्य किर्लोस्करांनी मिळवून दिले.

उद्योग सुरू करण्याची मूळ संकल्पना कोटीभास्कर यांची असल्यामुळे या यंत्रशाळेला कृतज्ञता म्हणून 'कोटीभास्कर स्मृतिउद्योग' असे नाव देण्यात आले. पेशवेकालीन देशपांडे वाड्यात अभियंत्यांची राहाण्याची व्यवस्था करण्यात आली. प्रत्यक्ष काम करणारे सर्व तरुण स्थानिक असतील, असा आग्रह धरण्यात आला.

**यंत्रशाळा**

किर्लोस्करांनी इंजिनचे स्पेअर पार्टस् बनविण्यासाठी सुमारे ५० विविध प्रकारची यंत्रे वापरण्यासाठी दिली व त्या यंत्रांवर करण्यास आवश्यक तेवढे कामही दिले. किर्लोस्कर ऑईल इंजिन नंतर क्रमाक्रमाने अल्फा लावल, थर्मेक्स, कंताल या पुण्यातील अन्य उद्योगांशी यंत्रशाळेचे साहचर्य राहिले व त्यामुळे यंत्रशाळेमध्ये महत्त्वाची भर पडली. डिझेल इंजिनच्या स्पेअर पार्टस्‌शिवाय डेअरीसाठी लागणारी यंत्रसामुग्री (मिल्क टँकर्स, पाश्चराइजर्स इ.) व विशिष्ट प्रकारची कास्टिंगज् आणि फॅब्रिकेशन्सची कामे यंत्रशाळेत होत असत.

सुरुवातीची काही वर्षे अत्यंत अडचणीत गेली. परंतु कार्यकर्त्यांनी अत्यंत चिकाटीने व खडतर प्रयत्नांती यंत्रशाळा शिवापूरला रुजविली. यंत्रशाळेत एका वेळी सुमारे २५० स्थानिक तरुणांना रोजगार मिळत होता. यंत्रशाळेतून व प्रबोधिनीच्या अन्य उद्योगांतून झालेल्या अर्थनिर्मितीतून प्रबोधिनीची पुण्यातील वास्तू उभी राहिली आहे.

**यंत्रशाळा आणि ग्रामविकसन**

यंत्रशाळेमध्ये सुमारे १८०० स्थानिक तरुणांना प्रत्यक्ष कामातून प्रशिक्षण (कमवा आणि शिका) या संकल्पनेचा लाभ घेता आला. त्यापैकी काहींनी स्वत:चे उद्योगही त्या भागात सुरू केले.

यंत्रशाळेत ५ कि.मी. परिसरातून स्थानिक तरुण कामास येत असत. सर्वांना आपण कर्मचारी सदस्य असे संबोधत असू. म्हणजे ते सर्व ज्ञान प्रबोधिनीचे सदस्यच आहेत, असे आपण मानत असू. हे सर्व सदस्य त्यांच्या त्यांच्या गावात प्रबोधिनीच्या अन्य उपक्रमांना (आरोग्य योजना, ग्रामविकसन, व्यसनमुक्ती, महिला बचत गट इ.) सक्रीय साहाय्य करीत असत. त्यांच्यापैकी काही सदस्यांनी गावामध्ये ग्रामपंचायतीत सदस्य, सरपंच इ. पदे देखील भूषविली होती.

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे व प्रबोधिनीचे कृषितांत्रिक विद्यालय, शिवापूर येथील विद्यार्थ्यांना यंत्रशाळेत प्रत्यक्ष कामाची व अनुभवाची संधी मिळत असे.

खेड्यापाड्यांच्या प्रश्नांशी निगडित असे विविध उपक्रम यंत्रशाळेमध्ये करण्यात आले. त्यामध्ये गोबरगॅस प्लँटचे उत्पादन व प्रचार अंतर्भूत होता. युनिसेफ व अफार्म या संस्थांच्या सहकार्याने यंत्रशाळेमध्ये 'इंडिया मार्क २' या हातपंपाची निर्मिती केली गेली. तसेच हातपंप बसविण्यासाठी लागणाऱ्या टूल्सची देखील निर्मिती केली गेली. आजमितीला संपूर्ण भारतभर व विविध आफ्रिकन

सु व र्ण म हो. **१९८४** त्सवी वा ट चा ल

नागा प्रदेशात शैक्षणिक कार्याचा प्रयोग,
संगणक प्रशिक्षण केंद्र प्रारंभ, त्रिवेंद्रम येथे शिबिर



विक्रमी कृती करू चला दिगंत हालवू ।
तेज मायभूमीचे उभ्या जगास दाखवू ।।
**शुभेच्छा ! - श्री. गजेंद्रगडकर, पुणे**

देशात युनिसेफ मार्फत हे पंप बसविण्यात आले आहेत. इ. स. १९७२ च्या भीषण दुष्काळामध्ये महाराष्ट्र व तमिळनाडूमध्ये सुमारे ३००० हातपंप उभारून देण्यात व बोअर वेल्स खणण्यात यंत्रशाळेचे मोठे योगदान होते.

१९७१ साली सुरू झालेली यंत्रशाळा सुमारे ३० वर्षे कार्यरत राहून प्रबोधिनीच्या सर्व उपक्रमांसाठी आर्थिक बळ देत राहिली. त्यानंतर मात्र यंत्रसामुग्री जुनी झाल्यामुळे ती नाईलाजाने बंद करावी लागली.

**इतर उद्योग व्यवसाय**

यंत्रशाळेनंतर वेळोवेळी चालून आलेल्या संधी उचलत प्रबोधिनीत नवीन उद्योग सुरू करण्यात आले. त्यामध्ये धारक विभाग, क्षणमापन विभाग, उद्‌वाहक विभाग, व्यापार उद्योग व खांडसरी उद्योग यांचा समावेश होता.

गुंजवणी खोऱ्याचा मूलभूत विकास व्हावा यासाठी वेल्ह्याजवळ करंजवणे येथे **खांडसरी साखरेचा कारखाना** प्रबोधिनीने सुरू केला होता. त्यातील महत्त्वाची यंत्रसामुग्री शिवापूरच्या यंत्रशाळेतून बनवून देण्यात आली होती. लेव्हीसाखरेविषयीच्या सरकारी धोरणात काही अमूलाग्र बदल झाले व त्यामुळे हा कारखाना पुढे चालू शकला नाही.

पुण्यातील संरक्षण खात्याच्या ARDE या संस्थेसाठी वायुदलासाठी लागणारे काही **प्रिसिजन टायमर्स** आपण प्रबोधिनीमध्ये विकसित केले व त्यानंतर उत्पादित केले. हे उत्पादन आयात पर्यायी असल्यामुळे संरक्षणातील स्वयंनिर्भरता व परकीय चलन खर्चात बचत यासाठी प्रबोधिनीचा हातभार लागला. हा विभाग 'क्षणमाप विभाग' म्हणून प्रबोधिनीच्या पुण्यातील इमारतीच्या तळघरात कार्यरत होता. पुढील मागणी लष्कराकडून न आल्यामुळे तो नंतर बंद करण्यात आला.

प्रबोधिनीच्या फ्रान्समधील काही मित्रमंडळींच्या मदतीने **पॉवर फॅक्टर कपॅसिटर्स** करण्याचा कारखाना आपण प्रबोधिनीच्या पुण्यातील वास्तूत तळघरात सुमारे २० वर्षे चालविला. प्रबोधिनीच्या सर्व उत्पादनांना 'प्रबोधन' असे नाव (Trade mark) नोंदविले होते. प्रबोधन कपॅसिटर्स हे अजूनही उत्तम दर्जाचे कपॅसिटर्स म्हणून नावाजले जातात. विद्युत वितरणातील वाया जाणारी वीज वाचविण्यासाठी हे कपॅसिटर्स वापले जातात.

पुणे प्रशालेची वास्तू जेव्हा बांधून पूर्ण झाली तेव्हा तेथे उद्‌वाहक (lift) बसविण्याची तरतूद करण्यात आली होती. परंतु ते बसविलेले नव्हते. मा. आप्पांनी यंत्रशाळेच्या कार्यकर्त्यांना हा उद्‌वाहक आपण स्वतःच करूया, असे आवाहन केले. हे आव्हान स्वीकारून यंत्रशाळेतील कार्यकर्त्यांनी शंतनुराव किर्लोस्करांच्या साहाय्याने 'ब्लू डायमंड' या हॉटेलातील उद्‌वाहकांचा अभ्यास करून आपल्या वास्तूतील उद्‌वाहकांचे आराखडे स्वतः तयार केले व अशा पद्धतीने पहिला उद्‌वाहक तयार झाला. हा अनुभव लक्षात घेऊन नंतर **उद्‌वाहक विभागच** प्रबोधिनीत सुरू करण्यात आला. त्यामार्फत अनेक नवीन 'प्रबोधन उद्‌वाहक' पुणे व पुणे परिसरात प्रबोधिनीने बसविले. तसेच मोठ्या संख्येने इतर उद्‌वाहकांची देखभालही विभागामार्फत केली जात असे. लातूर येथील विवेकानंद रुग्णालयातील उद्‌वाहक आपणच केलेले आहेत.

**समारोप**

सर्वच उद्योगातून प्रबोधिनीच्या उद्दिष्ट्यपूर्तिसाठीचे अत्यावश्यक अर्थार्जन तर झालेच त्याशिवाय प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांना व कार्यकर्त्यांना उद्योग विश्वात प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली.

विविध उद्योगांनी त्यांच्या नफ्यातून चालविलेल्या शैक्षणिक संस्था आपण सर्वत्र पाहतो. परंतु स्वयंनिर्भरतेसाठी शैक्षणिक संस्थेने चालविलेले उद्योग हे प्रबोधिनीच्या उपक्रमाचे वैशिष्ट्य व वेगळेपण होते.

**– अनिल रिसबूड**
५, जानकी अपार्टमेंट, नचिकेत पार्क,
बाणेर रस्ता, पुणे – ४५

(१९६२ च्या 'प्रबोध शाळे'च्या पहिल्या तुकडीचे विद्यार्थी,
१९७० ते १९८८ यंत्रशाळेत पूर्णवेळ प्रमुख,
नंतर १० वर्ष प्रबोध उद्योगमध्ये.
आता SQS सॉफ्ट वेअर कंपनीमधून निवृत्त)

सु व र्ण म हो.. **१९८४**.. वा ट चा ल
गांधीविचार अभ्यास शिबिर,
पंजाबमधील शीख बांधवांची महाराष्ट्र मैत्री यात्रा

विक्रमगाथा इतिहासाच्या पानोपानी जयांची ।
त्या रणवीरा नमन करोनी धाव पुढे घ्यायची ।।
शुभेच्छा ! – श्री. शैलेंद्र म्हसकर, पुणे

# पंतप्रधानांची प्रबोधिनीला भेट

**सुभाष देशपांडे**

२ सप्टेंबर १९७८... विभागप्रमुखांची बैठक सुरू होती. बैठक सुरू असतानाच संचालकांनी (मा. आप्पांनी) घोषणा केली... ''दि. २१ रोजी पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई आपल्या प्रबोधिनीस भेट द्यावयास येणार आहेत.'' ज्येष्ठ गांधीवादी प्रेमाताई कंटक यांच्या पत्रामुळे ही भेट लवकरात लवकर ठरली होती. या आधी आप्पांना 'एक्सलन्स ॲवार्ड' मिळाले तेव्हा प्रबोधिनीची अखिल भारतीय पातळीवर दखल घेतली गेली होती. पण पंतप्रधानांसारख्या महत्त्वाच्या व्यक्तीची संस्थेला पहिलीच अधिकृत भेट होती. टाळ्यांच्या कडकडाटात आम्ही या घोषणेचं स्वागत केलं आणि आता तिथे बैठकीसाठी जमलेल्या सर्वांच्या डोळ्यांसमोर बऱ्याच दिवसांपासून नक्की होऊ घातलेली 'पंतप्रधानांची प्रबोधिनीला भेट' ही एकच गोष्ट तरळू लागली.

सहा तारखेला गणेशचतुर्थी झाल्यानंतर १२ तारखेला नेहरू स्टेडियमवर सहाशे प्रबोधकांचे बर्चीनृत्याचे प्रात्यक्षिक झाले. त्यानंतर १३ तारखेला प्रबोधिनीच्या गणपतीची विसर्जन मिरवणूक आणि १५ तारखेला अनंत चतुर्दशीच्या मिरवणुका... गणेशोत्सवाच्या भरगच्च कार्यक्रमाला लागूनच हा मोठा कार्यक्रम ठरला होता. १६ तारखेला सकाळी ७ वाजता विसर्जन मिरवणुकीनंतर प्रभात रस्त्यावर प्रार्थना झाली आणि सगळ्यांना गणेशोत्सवाच्या धामधुमीत जे इतके दिवस जाणवलं नव्हतं ते जाणवलं... 'आपल्यालाही दोन हात, दोन पाय आहेत तर...' संचालकांनी सर्वांना विश्रांती घ्यायला सांगितली. विश्रांतीबरोबरच सगळ्यांना घाई होती ती दुपारच्या बैठकीची!!

दुपारी सगळेजण संचालकांच्या कार्यालयात जमले. अपुरी झोप बाजूला ठेऊन आल्यावर आता सर्वांना वेध लागले ते २१ तारखेच्या पंतप्रधानांच्या भेटीचे! संचालकांनी विचारले, ''हं. मग कसं काय करूया?'' मग काय विचारता... वेगवेगळ्या कल्पना पुढे येऊ लागल्या. उत्साह तर अमाप होताच आणि दिवस तर हातावर मोजण्याइतकेच शिल्लक होते. या उदंड उत्साहाला नियोजनबद्ध कामांमध्ये गुंतवणं अत्यावश्यकच होतं. त्यादृष्टीने पावलं पडू लागली... फलक झळकला- 'पंतप्रधान भेट नियोजन कार्यालय.' भराभर कामांची यादी तयार झाली. भराभर खाते विभागणी झाली. खाते प्रमुखांनी आपल्या कामांची तपशीलवार योजना करण्यास सुरुवात केली. त्या त्या खात्याचं अचूक नियोजन, वेगवेगळ्या कंत्राटदारांबरोबरचे प्रेमळ संवाद, रंगकाम, सजावट, आनंद, उत्साह... वातावरण नुसतं खुलून आलं होतं. दिवसाचे चोवीस तास कमी पडतील अशी स्थिती होती; पण ते पुरेपुर कसे वापरायचे हे आम्ही पाहात होतो.

कार्यक्रमाचा भाग म्हणून अर्ध्या तासात प्रबोधिनीची समग्र कल्पना येईल, असे प्रदर्शन उभे करायचे ठरले. शिक्षण, संशोधन, उद्योग आणि ग्रामविकसन ही प्रबोधिनीची परवलीची चौकडी प्रदर्शनात मांडूयात, यावर विचारमंथन सुरू झाले. प्रदर्शनासाठी मोजून २७ मिनिटे मिळणार होती. चार दालनांमध्ये असणाऱ्या १५ निवेदकांच्या एकापेक्षा एक अशा चढत जाणाऱ्या आठ तालमी झाल्या.

'पण घाईतल्या पाहुण्याला आपल्याला पाहिजेत तेच मुद्दे थोडक्या वेळात कसे सांगायचे...' हा प्रश्न उरलाच. सगळीकडेच धामधूम सुरू होती.

'या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग नेमका कसा असणार?' खल सुरू.

''गेल्यावर्षी टी.व्ही. वरील स्पर्धेसाठी बसवलेलं समूहगीत म्हणूया...''

''तेसुद्धा सगळ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी...

सु व र्ण म हो.. **१९८५**.. त्स वा ट चा ल

सोल्डरिंग स्कूल प्रारंभ, गोमसंयंत्र प्रकल्प प्रारंभ,
पडसरे येथे १०० दिवसांच्या शाळेत सहभाग



मर्यादांनी मर्यादुन ? छे !! त्यांना उल्लंघुनी ।
पुढे पुढे चालणे असू दे हेच ध्येय तव मनी ।।
**एक शुभचिंतक, ठाणे**

अगदी हावभावांसहित...''

कल्पनेनं मूळ धरलं आणि वर्गावर्गांतून सराव सुरू झाला. त्या दृष्टीने पावले पडू लागली... प्रा. लताताईंचं काव्य. संगीत दिग्दर्शक श्री. मनोहर केतकर मुलामुलींच्या आवाजांच्या ब्लेंडिंगच्या खटपटीत. प्रा. नलुताईंच्या देखरेखीखाली प्रबोधिनीत सूर घुमू लागले.

*''श्रमता आपण हिमगिरीचे ते वितळतील हिमहिरे*
*मरुभूमीवर उभी राहतील विभवे - सुखमंदिरे*
*सळसळणाऱ्या शेतांमधुनी हसेल हिरवे सोने...*
*हे आनंदी गाणे...''*

सराव... सतत सराव... गुणवत्तेसाठी, अचूकतेसाठी!

शेवटचे दोन-तीन दिवस उरले होते. रंगरंगोटीमुळे वास्तू खुलून दिसत होती. बघता बघता मांडव उभा राहिला. रंगीत दिव्यांच्या माळांनी वास्तू झगमगू लागली. आकाशवाणी, टी.व्ही., एम.एस.ई.बी., फिल्म डिव्हीजन... माणसं अखंड येत होती तपासण्या करून जात होती. PWD च्या अधिकाऱ्यांनी stage ची बळकटी तपासली. तयारी कुठपर्यंत आली आहे, हे बघण्यासाठी जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्तांची फेरी झाली... भेट शेवटी पंतप्रधानांची होती... जय्यत तयारी अपरिहार्यच...! निमंत्रितांची यादी मोठी, तर जागा अगदी मर्यादित. परत चर्चा... संचालकांनी वृत्तपत्रात निवेदन दिले.

''आम्हाला क्षमा करावी ! वास्तूमधील जागेच्या मर्यादेमुळे अनेकांना इच्छा असूनही निमंत्रणे देता आली नाहीत. कृपया राग मानू नये...''

एकेक कामं पूर्णत्वास जात होती. राहिलेल्या त्रुटी तत्काळ दुरुस्त होत होत्या. प्रचंड उत्साह, धावपळ... अखेर दि. २१ ची सकाळ उजाडली. प्रबोधिनीचे संचालक, तेव्हाचे प्राचार्य मा. वामनराव अभ्यंकर आणि युवती सचिव नलिनी उजळंबकर विमानतळावर पंतप्रधानांचे स्वागत करण्यासाठी गेले. पंतप्रधानांचे

सु व र्ण म हो.. **१९८६** .. वा ट चा ल

युवतींचा बर्चींगट प्रारंभ, दारुबंदीचे दुसरे आंदोलन
अर्थ उभारणीसाठी आशा भोसले संगीत रजनी कार्यक्रम



**पंतप्रधान मा. मोरारजींसमवेत मा. आप्पा**

दिवसभर इतर कार्यक्रम ठरले होते. प्रबोधिनीतील कार्यक्रम होता संध्याकाळी ५.२५ वाजता. दुपारी दोन वाजल्यापासूनच प्रबोधिनी परिसरातील रस्त्यावर लगबग दिसू लागली. चारच्या सुमारास तर पोलिसांच्या गाड्या, सरकारी अधिकाऱ्यांच्या जीप्स्, सिक्युरिटीचे लोक यांनीच सगळे रस्ते भरले आहेत, असं वाटायला लागलं. रस्त्यावर दुतर्फा हजारो नागरिक दाटीवाटीने उभे होते. सगळी लगबग बघायला पाऊसही डोकावून गेला. सेकंदकाटा पुढे पुढे सरकत होता. इतक्यात 'आले, आले' असे उद्गार घुमू लागले. 'भारतमाता की जय' च्या आरोळ्या उठल्या. भारताचे पंतप्रधान आदरणीय श्री. मोरारजीभाई देसाई आपल्या शानदार मोटारीतून हात हलवीत प्रबोधिनीकडे येत होते.

पंतप्रधान वास्तूच्या दारापाशी आले. संचालकांनी त्यांच्या हातात चाफ्याची ओंजळभरून फुले दिली. प्रबोधिनीच्या कलशविराजित वास्तूकडे सुहास्य नजरेने पाहात मोरारजीभाई वास्तूत प्रवेशकर्ते झाले. वयाची जाणीव विसरायला लावेल असं अतिशय सोज्वळ व्यक्तिमत्त्व! पंतप्रधान वास्तूत येताच विद्यार्थी, कार्यकर्ते, सहकारी निमंत्रित सगळ्यांनीच टाळ्यांचा गजर केला. फोटोग्राफर्सची धमाल उडाली. सर्व वातावरणच कसे एकदम प्रफुल्लित झाले.

सुरुवातीला प्रबोधिनीच्या कार्याचे स्वरूप थोडक्यात दर्शविणाऱ्या प्रदर्शनाला पंतप्रधानांनी भेट दिली.

विद्या नि अविद्या दोन्ही, एकाच गुंफू धाग्यात ।
कर्मातून उमजे ज्ञान, हे सूत्र असो मर्मात ।।
**शुभेच्छा ! – श्री. नितीन वसंत बाळ, ठाणे**




**व्यासपीठावर मा. मोरारजीभाईंसमवेत मा. आप्पा, रँग्लर महाजनी, मोहन धारिया, वसंतराव वैद्य, एस. एम. जोशी, महापौर रामभाऊ वडके, कुलगुरू प्रा. कोगेकर व डॉ. राम ताकवले**

शैक्षणिक विभागाच्या पुष्पाताई आगाशेंनी इंग्रजीत निवेदनाला सुरुवात केली. ''मराठीत बोललं तरी चालेल,'' असं सांगून पंतप्रधानांनी प्रदर्शन पाहण्यास सुरुवात केली. अगदी सुरुवातीची प्रबोध शाळा, नंतरची पूर्णवेळ शाळा, साप्ताहिक बैठका यातून कार्यकर्ते कसे घडत आहेत, हे त्यांना निवेदनातून जाणवत होतं.

''Leadership development हे आमचं महत्त्वाचं कार्य आहे,'' मा. संचालकांनी पंतप्रधानांना सांगितलं.

''But leaders cannot be made,'' पंतप्रधान.

''पण विशेष प्रकारच्या शिक्षणाने नेतृत्वगुण वाढू शकतात. NDA मध्ये आपण हेच नाही का करत?'' संचालक.

''त्याची गोष्ट वेगळी आहे,'' पंतप्रधान.

''आम्हाला फक्त राजकीय नेतृत्व अभिप्रेत नाही, तर सर्वच क्षेत्रांतील नेतृत्वाचा विचार येथे करावयाचा आहे,'' संचालक.

''कुठल्याही शालेय शिक्षणातून नेते तयार होणार नाहीत. अनेक situations कारणीभूत असतात. And who made you?'' पंतप्रधान

''तुमचं म्हणणं बरोबर आहे. There are number of teachers and situations. पण क्रमिक शिक्षणाबरोबरच अशा situations इथे तयार करून त्यातून नेतृत्व घडणीचे शिक्षण मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे.'' संचालकांनी त्यांचे विविध अनुभव आणि प्रबोधिनीच्या कार्याची व्यापकताच जणू सार स्वरूपात पंतप्रधानांसमोर मांडली.

पुढे प्रदर्शन पाहताना मानसशास्त्र संशोधिकेच्या प्रमुख डॉ. उषाताई खिरे यांना डॉ. जे. पी. गिलफोर्ड या प्रख्यात अमेरिकन मानसशास्त्रज्ञाने पाठविलेले पत्र पंतप्रधानांनी एकाग्रतेने वाचले. मानस संशोधिकेत तेव्हा बुद्धीच्या १२० पैलूंवर काम सुरू होतं; ते नंतर गिल्फोर्ड मॉडेल म्हणून प्रसिद्ध झालं. नंतर प्रा. अर्जुनवाडकरांनी संत्रिकेची माहिती दिली. सौर कालगणनेनुसार केलेली कालदर्शिका दाखवून मग

सु व र्ण म हो.. **१९८६**.. त्सवी वा ट चा ल
राखीव जागा प्रश्नी गुजराथ दौरा,
पडसरे येथे कार्यकर्त्यांची प्रदीर्घ बैठक



उज्ज्वल माझा दिवस उद्याचा सर्वांसाठी असो ।
एक एक जोडीत जीवना जनसंघटना दिसो ।।
**शुभेच्छा ! – सायली साटम, पुणे**

संस्कारांच्या नव्याने ग्रथित केलेल्या पोथ्या त्यांना दाखवल्या. प्रदर्शनात त्यानंतर आयुर्वेद संशोधिका, रसमयी महिला उद्योग, विद्युतधारक उत्पादने तसंच ग्रामविकसन विभाग, युवक विभाग, युवती विभाग इ. विषयींची निवेदनेही पंतप्रधानांनी ऐकली.

त्यांनतर पंतप्रधान सभास्थानी येताच सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. पाहुणे व्यासपीठावर आल्यावर समोर उभ्या असलेल्या शिस्तबद्ध आणि गणवेशधारी मुलामुलींनी हात जोडून प्रणाम केला. पाहुणे खुर्च्यांवर स्थानापन्न होत आहेत न आहेत तोच इकडे वाद्यांना सूर स्फुरले आणि चिमुरड्या २७० गायकांनी पिवळ्याधमक झेंडू, शेवंतीची आसमंतात उधळण करत गीत गायला सुरुवात केली - ''हे आनंदी गाणे...'' गीताचे शब्द समजून घेण्यासाठी गीत ऐकताना पंतप्रधानांनी कुतूहलाने समोरील गीताची कलापूर्ण प्रत वाचायला सुरुवात केली. चार मिनिटांचे हे सादरीकरण त्यांनी अतिशय एकाग्रतेने पाहिले.

...आता प्रकाशझोत व्यासपीठावर होता. मा. आप्पा प्रास्ताविक करण्यासाठी उभे राहिले. ''मा. पंतप्रधानांचे प्रबोधिनीत मी मन:पूर्वक स्वागत करतो. या अल्पकार्यास भेट देऊन त्यांनी आपल्याला उपकृत केलेले आहे. ज्या राष्ट्रीय शिक्षणाच्या मूल्यांसाठी राष्ट्रीय विद्यापीठांची १९२० च्या सुमारास स्थापना झाली, तीच मूल्ये पायाभूत धरून आम्ही प्रबोधिनीत विविध कार्ये करीत आहोत. स्वामी विवेकानंदांच्या विचारात या कार्याची मूळ स्फूर्ती आहे. 'अध्यात्माच्या बाबतीत सनातन्यातले सनातनी व शास्त्राच्या बाबतीत आधुनिकातले आधुनिक आपण असावे,' या स्वामीजींच्या विचाराला अनुसरून येथे प्रयोग होत आहेत. या प्रेरणा घेऊन, स्वार्थाचा विचार न करता स्वत:चा व देशाचा विकास करणारे कार्यकर्ते इथे घडावेत अशी इच्छा आहे.'' मा. आप्पांनी नि:संदिग्ध पण आर्त शब्दात प्रबोधिनीची भूमिका स्पष्ट केली.

सर्व उपस्थितांचे लक्ष आता पंतप्रधानांच्या भाषणाकडे होते. ''श्री. आप्पासाहेब पेंडसे, सर्व विद्यार्थी मित्रांनो आणि बंधुभगिनींनो, इथल्या कामाचे उद्दिष्ट जाणून घेताना मला अतिशय आनंद होत आहे. ज्या शिक्षणाने शिक्षण घेणाऱ्याला निराश वाटणार नाही तेच खरे शिक्षण! परंतु आपल्या देशात सध्या शिक्षणाने व्यक्तीचा आत्मविश्वास कमी होतो आहे आणि निराशा वाढते आहे. मला अशी आशा आहे की प्रबोधिनीचे हे कार्य लवकरच अधिक विस्तार पावेल. सध्याच्या शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल आणण्यासाठी अशा कार्याचा निश्चितच उपयोग होईल... आत्ता तुम्ही जे गीत म्हटले ते सुंदर तर आहेच पण गाणारी मुले ही अतिशय मनापासून आणि प्रसन्नतेने गात होती, असे खूप कमी ठिकाणी पाहावयास मिळते. इथल्या शिक्षण पद्धतीचे हेच वैशिष्ट्य आहे, असे मला वाटते आणि त्याचा खूप चांगला परिणाम दिसतो आहे. मी ईश्वराकडे प्रार्थना करतो की, आपले काम वाढण्यास व अजून उत्तम होण्यास आपल्याला शक्ती मिळो...''

प्रबोधिनीच्या कार्याबद्दलचा गौरव आणि विश्वास त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला. सर्वच जण भारावलेले होते. कार्याध्यक्ष वसंतराव वैद्यांनी आभार प्रदर्शन केले आणि वंदे मातरम होऊन कार्यक्रम संपला. कार्यक्रमानंतर धो-धो पाऊस पडू लागला. मा. आप्पा आणि मा. मोरारजीभाई यांच्या विचारांना पावसाने जणू काही दुजोराच दिला. नियोजित वेळ होताच पंतप्रधान मार्गस्थ झाले. भारावलेल्या सर्व मनांमध्ये सूर घोळत होते... *''मायभूमीच्या वाऱ्यासंगे झेपावत जाईल आपुले, हे आनंदी गाणे... हे आनंदी गाणे...''*


(ज्ञान प्रबोधिनी खंड २ मधील लेखाचा संक्षिप्त भाग)

**– सुभाषराव देशपांडे**
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
(प्रबोधशाळेच्या १९६७ च्या तुकडीचे विद्यार्थी, कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी)

सु व र्ण म हो.. **१९८७**.. वा ट चा ल
गुरखा प्रश्न व सती प्रश्नावर प. बंगाल व राजस्थानमध्ये युवतींचे अभ्यास दौरे, दुष्काळ निवारण प्रकल्पास प्रारंभ

बुद्धिमंत हो पूर्ण समर्पित, विद्या हो व्रतदायी ।
लाचारीचा अंश नसावा समाजसेवेपायी ।।
शुभेच्छा ! – श्री. श्रीकांत जोशी, पुणे





# कथा वादळवाऱ्याची

**अविनाश धर्माधिकारी**

*१७ नोव्हेंबर १९७७ च्या सुमारास अंदमानच्या भागात कुठेतरी कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला... वादळाने भराभर देह फुगवला आणि पाणी धावत सुटलं... तमिळनाडूत थोडा तणाव माजवून मग ताशी १४० मैल वेगानं रोंरावत हे पाणी आंध्र मधल्या दिवी तालुक्यात शिरलं; बरोबर ५० मैल लांब १८ फूट उंच लाट घेऊन.!! प्रचंड हाहाकार, मृत्यूचं थैमान...*

*या वादळाच्या वेळी ज्ञान प्रबोधिनीनं केलेल्या मदतकार्याचा हा वेध...*

१९ नोव्हेंबर १९७७ चा दिवस... आम्ही प्रबोधिनीचे कार्यकर्ते विस्तार शिबिरांसाठी १९, २०, २१ नोव्हें. हे तीन दिवस रत्नागिरीला होतो. त्यावेळी तिथलं वातावरण वादळी होतं. शिबिराच्या गडबडीत वृत्तपत्रात ओझरती बातमी वाचली होती - 'आंध्रप्रदेशमध्ये वादळ'... पण त्यावेळी तिकडे झालेल्या उत्पाताची कल्पनाच नव्हती. शिबिर संपवून पुण्याला आलो आणि बातम्या धडकायला लागल्या. वृत्तपत्रांची पानं भरभरून तिथल्या हाहाकाराचे फोटो आणि बातम्या येत होत्या. ते सगळं पाहून जाणवलं की, आपल्याला तिकडे जायला हवं... मग माझं बी. कॉम्.चं शेवटचं वर्ष का असेना ! मीच काय, माझ्याबरोबर अगदी दहावीचे विद्यार्थी सुद्धा तयार झाले.

'गिरीश बापट' (मा. गिरीशराव, विद्यमान संचालक) त्यावेळी एम.एस्सी. करत होता. तो मा. 'आप्पां'ना जाऊन भेटला, ''आपण काय करूया? मी जाऊ का प्रत्यक्ष?''

आप्पांनी सांगितलं, ''तुम्हीच ठरवा, योजना करा.''

'गिरीश' निघाला. आम्ही त्याला कामाचा पहाड म्हणायचो! भोसरीला कारखाने चालवणारे 'श्रीकांत भाटे' यांना जाता जाता हाक दिली. दोघंही वळकटी बांधून सुटले. कसे गेले ते त्यांनाच माहीत; पण दोन दिवसांनी तार आली.

''Men, money, material required
as much as possible, send immediately''

आठवले सरांनी पुण्यात मदतकार्य उभं केलं. कपडे, पैसा, धडाधड ढीग जमायला लागले. 'आम्हाला आंध्रमध्ये जायचंय', म्हणणारी मंडळी भेटू लागली. आप्पांनी 'मोहन गुजराथी'ला बोलावून घेतलं, ''आंध्रला लवकरात लवकर निघा, या तुकडीचे तुम्ही प्रमुख'' बस्सं... दोनच वाक्यं... 'मोहन' कामाला लागला. संध्याकाळी ४ वाजता चक्कर टाकायला सहज प्रबोधिनीत गेलो तेव्हा त्यांनी विचारलं, ''आव्या निघतोस का?'' मी म्हटले, ''हो.. कधी?,'' ''आता सिकंदराबाद एक्स्प्रेसने.'' हादरलोच ! चार वाजले होते आणि त्यांनी सांगितलं, 'पावणे पाचच्या गाडीनं नीघ.'

सु व र्ण म हो.. १९८७.. वा ट चा ल
निगडी येथे मातृमंदिर उद्घाटन व क्रीडास्पर्धांना प्रारंभ,
युवकांचे कन्याकुमारी येथे साधना शिबिर



या देशातील हे नारीनर सन्मानाने जगावेत जर।
आपसातले विसरू भांडण अनंत शतकांचे।।
शुभेच्छा ! – श्री. किशोर पंडित, चेंबूर


''सिकंदराबादला जा, तिथून कृष्णा एक्स्प्रेसने विजयवाड्याला, तिथून एस.टी.ने अवनी गड्ड्याला आणि तिथे कुठेतरी चौकशी कर गिरीश बापट कुठे आहे म्हणून. त्याच्याकडून सगळी माहिती गोळा कर. आम्ही गट जमवून उद्या निघतो. आल्याबरोबर कामाला सुरुवात करता येईल अशी आखणी कर.''

मी 'बरं' म्हणालो आणि प्रमोदबरोबर निघालो. जाताना दोन मिनिटं वडिलांना भेटलो. भडकतील असं वाटलं; पण खूष होऊन त्यांनी हातावर दहा रु. ठेवले. हे सगळं १ डिसेंबर १९७७ ला घडलं आणि आम्ही दोघं दोन तारखेला संध्याकाळी अवनीगड्ड्याला पोहोचलो.

आपल्या समोर काय वाढून ठेवलेलं असणार याची कल्पना होती, तरीही सगळं समोर बघणं जरा जडच गेलं... कृष्णा नदीचा त्रिभुज प्रदेश असलेला दिवी तालुका आणि अवनीगड्डा हे तालुक्याचं ठिकाण... झाडं कोसळून पडलेली, जनावरांची प्रेतं अडकून फुगलेली, उलटून पडलेली मालगाडी, उखडलेले रस्ते, तुटलेल्या तारा... शहारे येण्याइतका विध्वंस! अवनीगड्ड्यात कळलं की गिरीश बापट नावाचा महाराष्ट्रीय मुलगा कोडूरला आहे. गिरीशचं काम तिथल्यांच्या चर्चेचा, कौतुकाचा विषय झालेला! तिकडे जाऊन त्याला भेटलो. त्याने रा. स्व. संघाबरोबर काम सुरू केलं होतं. त्यांची 'शवसेना' तयार झाली होती. मृतदेहांचा खच हलवणं, हेच पहिलं काम करायला हवं होतं. अंत्यविधी करता येणं अशक्यच! दिवसभर प्रेतं खड्ड्यात पुरल्यानंतर रात्री सगळ्यांनी एकत्र म्हणायचं, ''वासांसि जीर्णानि यथा विहाय..'' तेवढाच एक मनाला दिलासा.

दुसऱ्या दिवशी पुण्याहून ३५ जणांची तुकडी आली. चुस्त, तयार, पाठीवर रॅक-सॅक्स टाकून कुठल्याही तयारीने आलेले. कुठे राहायचे? माहीत नाही. किती दिवस राहायचे? ठाऊक नाही. जेवणाचे काय? मिळेल कुठेतरी. अगदी दहावीची छोटी पोरेसुद्धा क्लासेस, 'प्रॅक्टिकल्स' सगळे बाजूला ठेऊन हे 'प्रॅक्टिकल' करायला आली होती.

सु व र्ण म हो.. १९८८.. वा ट चा ल
प्रज्ञा मानसतर्फे I Q Controversy वर राष्ट्रीय परिसंवाद, बिहार भूकंप मदतकार्य, राष्ट्रवाद अभ्यास मंडळास प्रारंभ



**मदत कार्याच्यावेळी बांबूची घरे पुन्हा बांधताना...**

शिवाय महाविद्यालयीन प्रबोधिनीचे कार्यकर्ते. कामाचे संकेत, पद्धती परिचित. कोडूरला एका जमीनदाराने त्याच्या घरातील दोन खोल्या राहायला दिल्या. तिथेच आम्ही कार्यालय थाटलं. रात्री जेवणानंतर आम्हा काही जणांची 'इमर्जन्सी मीटींग' झाली. त्यात असं ठरलं की, 'प्रेतांची विल्हेवाट लावायचं काम आता कमी आहे. त्यामुळे आपण पाच गट करून पाच गावांमध्ये कामासाठी जाऊया.' ही गावं मुद्दाम जरा लांबची निवडली, कारण मदतकेंद्राजवळच्या गावात खूप मदत पोहोचते आणि आतली गावं मदतीशिवाय राहतात.

गावं ठरवून गटाप्रमाणे रोज तिकडे जायला लागलो. वाटेत या वादळाचं आणखीनच भयानक स्वरूप, हादरवून टाकणारा विध्वंस समोर येत होता. सगळं ओलांडत आम्ही गावात येऊन पोहोचलो. प्रेतं पाहताना काही वाटलं नाही, कर्तव्यभावनेनं सगळं केलं; पण गावातली 'हाडांचा सांगाडा' झालेली माणसं बघून मात्र दाटून येत होतं. काम करताना लक्षात आलं की, यांचं नेहमीचं जीवन सुरू व्हायला हवं असेल तर- भांडीकुंडी, कपडे आणि बांबू ही लगेचची आवश्यकता आहे; पण वस्तूंनी भरलेला ट्रक आणि मागे-पुढे लाचार लोक, अशी वाटप पद्धती नको असंही वाटलं. त्याचीही शिस्तबद्ध पद्धत शोधून काढली. त्या त्या गावांमध्ये गटांनी कूपन लिहून द्यायचं आणि त्याप्रमाणे कोडूरच्या प्रबोधिनीच्या कार्यालयात येऊन लोकांनी वस्तू न्यायच्या, अशी एक वाटप पद्धती

दुर्बलतेला दूर सारूनी अन्यायाशी झुंज हवी ।
चिंतन-शिक्षण-प्रबोधनातून वाट सापडे नित्य नवी ।।
शुभेच्छा ! – हायड्रोलिंक्स, पुणे

बसवली. हे सगळं करताना लोकांशी बोलणं, त्यांना दिलासा देणं सुरू होतं. त्यावेळची कामाची धुंदी काही औरच होती. धुंदी चढविणाऱ्या इतर गोष्टी बाहेरून आत येतात; 'प्रेरणा' एवढी एकच गोष्ट अशी आहे की जी आतून उसळते, धुंद करते. सकाळी सात वाजता खाऊन निघायचे. ८-१० किलोमीटर्स चालत जायचे. अनवाणीच. कारण चिखल. आदल्या दिवशी उद्याच्या कामाची योजना झालेली असायची. त्याप्रमाणे कुणाच्या हातात फावडे, कुणाकडे कुदळ तर कुणी हातात कंदील सावरत चाललेला. एकजण थोडेसे खाद्यपदार्थ बरोबर घेऊन...

याच दरम्यान एक घटना कानावर आली. स्वतंत्रपुरम् खेड्यातली... वादळाच्या दिवशी सुरक्षितता म्हणून लोकांनी मंदिरात आश्रय घेतला होता. लांबून राक्षसी लाट येताना दिसल्यावर हरिजन कुटुंबं मदतीसाठी मंदिराच्या दारावर धडका मारू लागली; पण त्यांचा आक्रोश लोकांना ऐकू गेला नसावा. लाट आली आणि पंचाहत्तर हरिजनांचा निर्विकार घास घेऊन पुढे सरकली.

नंतर असं कळलं की, हरिजनांना कुठेच मदत मिळत नाहीये. मग गावातलं काम बंद करून आम्ही आमचा मोर्चा हरिजनवाड्यांकडे वळवला. हरिजन वाड्यांमधली सगळी पडलेली घरं पुन्हा बांधलेली दिसत होती. बहुधा आपल्याला बाहेरून मदत मिळणार नाही, हे त्यांना माहीत असावं. 'काय काय काम करायचं आहे', असं विचारल्यावर त्यांनी सांगितलं, ''पडकी शाळा आणि मंदिर बांधून द्या. आमची मुलं घरी बसून आहेत, हे पाहावत नाही.''

कामाला सुरुवात केली. एकदा हरिजनवाड्यात मंदिरात जाऊन रात्री साग्रसंगीत भजन केलं. जसं भांडायचं असं ठरवल्यावर काही कारण लागत नाही, तसं 'आम्ही एक आहोत' असं म्हणायलाही काही कारणं असावीच लागतात असं नाही; हे या काळात पावलोपावली जाणवत होतं.

वादळ होऊन चार आठवडे उलटले होते. हळूहळू आंध्र उभा राहत होता. आता आम्ही दुपारी मदतीसाठी वस्तीवर गेलो, तर तेथे शांतता असायची कारण सगळे जण शेतावर कामाला गेलेले असायचे. जे आहे ते पीक काढण्यासाठी... घरी बसून तरी काय करणार?

आता परतायचं ठरलं. एकदम काळजात काहीतरी हललं; उमगलं की या माणसांशी, या मातीशी आतून कुठेतरी सांधा जोडलेला आहे. आम्हाला दुवा देण्याशिवाय दुसरं काहीही त्यांच्याकडे शिल्लक नव्हतं; पण इतका विध्वंस होऊनही माणूसपण मात्र शिल्लक होतं. काही जणांनी भाबडेपणानं विचारलं, ''फिर कब आओगे?''

आम्हीही हसून सांगितलं ''आप जब बुलाऐंगे!'' फक्त यावेळी पाठवला तसा निरोप पाठवू नका...

आंध्रतील वादळग्रस्तांना केलेल्या मदतीनंतर एक विचार मनाला सतत छळत होता. आता आपण केली ही क्षणिक मलमपट्टी. गरिबी तर इथे पाचवीलाच पुजलेली. पुढे काय? मनात पक्का विचार केला 'आता आलो ते पंधरा दिवसात परत जायला पण पुन्हा येऊ ते इथली माती बदलण्यासाठी, लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी!'

मृत्यूने ! घातलेले थैमान आमच्या बरोबर आलेल्या या शालेय आणि महाविद्यालयीन तरुणांनी जवळून पाहिले होते. त्यातून धैर्य तर अंगी बाणलेच; पण मुख्यत: जीवनाच्या धकाधकीतील अनेक कटू अनुभव पचवायलाही ते शिकले.

कोडूर सोडून गाडी निघाली. पळता पळता गाडीनं एक शेत दाखवलं. केळीचं बन होतं. पाने पाण्यात भिजून पिवळी पडली होती. खुंटही पिवळे पडले होते. काळीशार माती वाळलेली होती आणि तरीही सगळ्या केळीच्या खुंटांमधून एक नवीन हिरवा अंकुर वर डोकावत होता.. ...जणू आंध्रने जागी केलेली जाणीवच थरथरत होती..

(ज्ञान प्रबोधिनी खंड २ मधील लेखाचा संक्षिप्त भाग)

**– अविनाश धर्माधिकारी**
१५५७ सदाशिव पेठ,
नवी पेठ विठ्ठल मंदिराजवळ, पुणे – ३०

(१९७५ च्या प्रशालेच्या अकरावीच्या तुकडीचे विद्यार्थी,
माजी आय. ए. एस. अधिकारी,
'चाणक्य मंडळ' संस्थेचे संस्थापक)

सु व र्ण म हो.. **१९८८**.. वा ट चा ल
ज्ञान प्रबोधिनी खंड ३ प्रकाशित, पुणे येथे वास्तुपूर्ती व कलशारोपण, पौरोहित्य प्रशिक्षण वर्गास प्रारंभ



जिथे घोर अन्याय थैमान घाली तिथे धावुनी जा तुम्ही निर्भय ।
पटे सत्य तेथे तुम्ही ठाण मांडा, युवाशक्ति आहे जगी दुर्जय।।
**शुभेच्छा ! – श्री. जयंतराव आठल्ये, पुणे**

# कहाणी एका संशोधनाच्या साधनेची

**वा. सुजला वाटवे**

*बुद्धीचे बहुरंगी स्वरूप लक्षात घेऊन प्रज्ञा मानस संशोधिकेने बुद्धिमापन कसोट्या करण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प १९८० साली हाती घेतला. संशोधनाला आधार म्हणून डॉ. गिल्फोर्ड या अमेरिकन मानसज्ञाने सुचविलेले बुद्धीचे मापदंड स्वीकारले होते.*

*या कसोट्या करण्यासाठी महाराष्ट्रातील महानगरांत, शहरांत व ग्रामीण भागात अशा जवळजवळ पंचवीस हजार मुलांवर काम केले होते. अशा तऱ्हेने प्रज्ञा मानस संशोधिकेने १९८० ते १९९२ अशी बारा वर्षे माननीय डॉ. उषाताई खिरे यांच्या मार्गदर्शनाखाली अव्याहत संशोधन करून १२० पैलूंसाठी १२० कसोट्या तयार करण्याचे काम पूर्ण केले. या कसोट्या शालेय गुणवत्तेवर आधारित नसल्यामुळे त्यांच्या साहाय्याने समाजातील विविध स्तरातील बुद्धिमान मुले शोधता येणार आहेत. केवळ कसोट्यांची निर्मिती एवढ्या पुरतेच हे कार्य मर्यादित नाही, तर या संशोधनातून बुद्धीच्या व्यापक संकल्पनेला गवसणी घालणारी साधने मिळाली व त्यामुळे बुद्धीचे विविध पैलू स्पष्ट झाले आहेत. त्यामध्ये सामाजिक प्रज्ञेचा विशेषत्वाने उल्लेख करावासा वाटतो. त्या आधारे प्रचलित अभ्यासक्रमाचे मूल्यमापन करून आवश्यक ते बदल करता येणे शक्य आहे. या सर्व कसोट्यांच्या माहिती देणाऱ्या पुस्तिकेचा प्रकाशन समारंभ व प्रकल्पाचा सांगता समारंभ दि. १ ऑगस्ट १९९२ या दिवशी श्री. हस्तिमलजी फिरोदिया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.*


जागतिक स्तरावर उत्तम दर्जाचं झालेलं काम म्हणून 'प्रज्ञा मानस कसोटीमाला' या बुद्धिमापन कसोट्यांचा उल्लेख करण कसं साध्य झालं याची खरंतर ही कहाणी आहे.

बुद्धी म्हणजे काय? ती एकजिनसी आहे की बहुविध अंगांची आहे? तिचं मोजमाप कसं करायचं? आणि ते कोणत्याही ठिकाणी राहणाऱ्या, कोणत्याही संस्कृतीमधल्या व्यक्तींचं केलं तर योग्य पद्धतीनं बुद्धी मोजणारं कसं ठरेल? या जागतिक प्रश्नांवर उत्तरं मिळविण्यासाठी अनेक मानसशास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ वर्षानुवर्षं झटत आहेत. अशा प्रश्नाला एक समर्थ उत्तर देण्याचा महान प्रयत्न म्हणून प्रज्ञा मानस कसोटीमालेचं उदाहरण देता येईल. विद्यावाचस्पती उषाताई खिरे यांच्या अभ्यासपूर्ण, तळमळीने केलेल्या सर्जनशील कामामध्ये तितक्याच समर्पणाने काम करणारे सहकारी सामील झाल्याने हे काम 'मोठं' ठरलं. प्रज्ञावंत अशा सर्जनशीलतेचे 'धडे' देणारे विद्यावाचस्पती अशोक निरफराके; जिद्दीने, चिकाटीने आणि अचूक कामाचा आग्रह धरणाऱ्या कै. मेघमाला राजगुरू हे त्यातले खंदे मानसतज्ज्ञ. प्रत्यक्ष कार्यवाही करणारे अनेक मानसतज्ज्ञ, उच्च शिक्षित ध्यास घेऊन काम करणारे असल्यानेच हे आव्हान समर्थपणे पेललं गेलं.

**सुरुवात-** मुलांना शिकताना जेव्हा अडचणी निर्माण व्हायच्या तेव्हा त्यांच्या बुद्धीचे मोजमाप करण्याचं काम सौ. उषाताई आठवले, मा. आप्पांच्या बरोबरीने करत असायच्या. पण यासाठी त्यावेळी उपलब्ध असलेल्या जागतिक प्रमाणित केलेल्या कसोट्या वापरूनही काही अपुरेपणा त्यांना जाणवायचा. या विचारातून बुद्धीचे वेगवेगळे पैलू असले पाहिजेत आणि त्यांचं स्वतंत्र मोजमाप करता यायला हवं असा संशोधनायोग्य प्रश्न जाणवायला लागला. बुद्धिमत्तेचे स्वरूप सांगणारी अनेक प्रारूपे (models) विचारात घेत असताना सर जे. पी. गिल्फोर्ड यांची प्रज्ञा आकृती ही सर्वात जास्त

सुवर्णमहोत्सवी वाटचाल .. १९८९ ..
बालविकास मंदिर सोलापूरचे दायित्व प्रबोधिनीकडे,
युवती तिळगुळ विक्री प्रारंभ

आर्तांना हृदयासि धरावे, श्रान्तांसाठी छाया व्हावे।
मात्र खलांच्या सत्तेपुढती, जुळोत ना कधि हात।।
शुभेच्छा ! – संतोष साटम, पुणे




बुद्धीचे पैलू सांगणारे पुस्तक

उपयुक्त ठरेल असं लक्षात आलं आणि काम सुरू झालं.

**संकल्पना विस्तार** - खरोखरच गिल्फोर्ड यांनी तशी नव्यानेच मांडलेली आणि पूर्वीपासूनच्या बुद्धिप्रारूपांपेक्षा काही वेगळा विचार सांगणारी ही संकल्पना होती. कोणतीही व्यक्ती आपल्या भोवतालच्या विविध प्रकारच्या गोष्टींबद्दल, माहितीबद्दल कोणत्या प्रकारे विचार करत असते आणि त्या संस्करणाने काय रूपांतरण किंवा उपयोजन करते, याचे मोजमाप करणं यामुळे शक्य होणार होतं. अशा वेळी सगळ्या बाजूंनी विचार व्हावा लागतो. त्यावर वादविवाद, चर्चा होऊन नेमकी संकल्पना ठरावी लागते. तशा बैठकी, विचारमंथन सुरू झालं. रोज काय चर्चा करायची, त्या चर्चांचे शेवटी सार काढायचं, निर्णय घ्यायचे आणि रोज त्या विषयात काही भर टाकायची, अशी प्रक्रिया सुरू झाली. ह्या संशोधन प्रकल्पाचा शास्त्रशुद्ध प्रस्ताव वा. उषाताई खिरे यांनी लिहिला. त्यासाठी NCERT या शासकीय संस्थेने परवानगी व अनुदान दिले आणि चालू असलेले काम अधिक वेगाने पुढे गेले.

**जबाबदारीचे वाटप** - अशावेळी उपलब्ध असलेले अभ्यास साहित्य वाचावं लागतं. ते स्वतः समजावून घेऊन त्याचं सार काढावं लागतं. ते इतरांसमोर नीट मांडून स्पष्टही करायचं असतं. गिल्फोर्ड यांचे प्रारूप तीन मितींचे. एका मितीनुसार व्यक्तीची विचारप्रक्रिया, दुसऱ्या मितीनुसार त्यातला आशय आणि तिसरी निष्पत्ती किंवा निर्मिती. यामधल्या सगळ्या उपप्रकारांची एकत्र गुंफण असल्याने 'बुद्धिवैभव' या वा. उषा खिरे यांच्या पुस्तकात वर्णन केलेले १२० पैलू एवढ्यांचा अभ्यास करायचा होता.

मग प्रत्येकाने आपापल्या वाट्याचा अभ्यासविषय समजावून घ्यायचा, इतरांसमोर तो मांडायचा. सगळ्यांनी त्यावर प्रश्न विचारून चर्चा करून निश्चित करायचा. प्रत्येकाच्याच 'बुद्धीच्या पैलूं'ना आव्हान देणारा हा महत्त्वाचा भाग. सगळ्यांनीच आपापलं 'शिवधनुष्य' पेललं. त्यामुळे ही संकल्पना परिपूर्ण होण्यास मदत झाली.

**कसोटीची परिपूर्ती** - आता बुद्धिमत्तेच्या प्रत्येक पैलूवर प्रश्नलिखाण ! एका पैलूच्या वर्णनावरून प्रत्यक्षात तो कसा मोजता येईल यासाठी विधान (item) तयार करणं हे जिकिरीचं काम. संकल्पना जेवढी स्पष्ट असेल तेवढी ही विधानं तयार करणं भरभर व्हायचं. पण प्रत्येक पैलूसाठी मोठ्या संख्येने असं 'विधान लिखाण' व्हायला पुष्कळच वेळ लागायचा. प्रत्येक विधानाला सगळ्यांच्या चिकित्सक विचारांच्या चाळणीतून उतरावं लागत होतं. अशी ९० पैलूंची विधानं एका टप्प्यात सुमारे ५ वर्षं तयार होत होती. त्याचं संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी ती इतर मानसतज्ज्ञांना देणं, मुलांवर त्याचे प्रयोग करून पाहाणं आणि मगच एकेक प्रश्नावली नक्की करत जाणं, हे पूर्ण झालं. अशाच प्रकाराने उरलेले ३० पैलू आणि त्यांच्यावरच्या प्रश्नावल्या पूर्ण झाल्या.

असा सगळ्यांचा एकत्र विचार विनिमय होणं, त्यावर चर्चा, टीका, वादविवाद होणं यातून सगळेच मनानं अधिकाधिक जवळ आले. त्या कामाशी तर

सुवर्णमहोत्सवी वाटचाल ..१९८९..
पाणलोट क्षेत्र विकास कार्यास प्रारंभ,
बिहार भूकंप मदतकार्य



सेवेतच सार्थक गवसावे, जीवशिवाचे मैत्र जुळावे ।
विश्वच अवघे सिंचित व्हावे, स्नेहामृत सेकात।।
शुभेच्छा ! – सेवा इंजिनिअर्स, पुणे

सगळे इतके जोडले गेले की प्रत्येक ठिकाणी काहीतरी 'विधान' मनात तयार व्हायचं आणि कागदावर यायचं! असा 'चाळाच' लागला होता. सगळ्या संख्याशास्त्रीय टप्प्यांमधून जात अखेर १२० पैलूंवरची प्रज्ञामान कसोटीमाला टप्प्याटप्प्याने तयार झाली.
मानसतज्ज्ञांच्या बरोबरीने बिनीच्या संख्याशास्त्रज्ञांची आणि त्यावेळी उपलब्ध असलेल्या विद्यापीठातल्या संगणकाची मदत घेऊन हे काम पूर्ण झालं.

**प्रमाणीकरण-** ह्या कामात विधानावली नक्की झाली की तिचं टंकलेखन, मुद्रणचुका लक्षात घेऊन पुन्हा टंकलेखन असं सातत्यानं चालू होतं. त्यावेळी आजच्यासारखे संगणक मदतीला हजर नव्हते. साध्या यंत्रावर हे टंकलेखन व्हायचं आणि छोटी चूक झाली तरी पुन्हा सगळं करावं लागायचं. अशावेळी थकून भागून वैतागण्याचे प्रसंगही अनेक आलेच. पण प्रत्येकजण दुसऱ्याच्या मनाची, थकव्याची काळजी घेत असायचा. कोणी घरून खाऊ घेऊन यायचं तर कोणी फळांची व्यवस्था करायचं. एखादी व्यक्ती जास्त वेळ बसलेली दिसली तर लगेच ते लक्षात घेऊन चहा-पाण्याची व्यवस्था व्हायची. प्रत्येकाच्या तब्येतीची काळजी करण्याची कै. आप्पांची मायेची पाखर सगळ्यांवर असायची.

टंकलेखन, मुद्रण होऊन त्याच्या हजारो पुस्तिका तयार झाल्या. उत्तरं लिहिण्यासाठी उत्तरपत्रिका तयार झाल्या.

**क्षेत्रकार्य -** ह्या पुस्तिका शेकडो विद्यार्थ्यांनी सोडवल्यानंतरच त्या सर्वांच्या बुद्धिमापनासाठी तयार होणार. तेव्हा अनेक शाळांच्या अधिकाऱ्यांना भेटणं, त्यांना या कामाचं स्वरूप समजावून सांगणं, योग्य शब्दांमध्ये आशयपूर्ण पत्र लिहिणं आणि शाळांच्या वेळांमध्ये काही तासांच्या परवानगीने या कसोट्या मुलांना सोडवायला देणं; हे एक मोठ्ठं 'कार्य'च होतं. संशोधनाच्या पद्धतीने शहरी आणि ग्रामीण भागातल्या शाळांची / इयत्तांची / तुकड्यांची शास्त्रशुद्ध निवड, कोणत्या क्रमाने या कसोट्या द्यायच्या याचे निर्णय; असे कितीतरी बारकावे पाहून वेळेचं नियोजन केलेलं असायचं. पहिल्यांदा चुकणारे वेळांचे अंदाज हळूहळू अधिकाधिक अचूक होत गेले. प्रत्येक कसोटीच्या वेळा निश्चित झाल्या. सुमारे २५००० मुला-मुलींवरचे हे काम पूर्ण करताना अनेक गोष्टींचा नियोजनपूर्ण विचार करावा लागला होता. पुस्तिकांचे आकार, त्यांची वजने, त्यासाठी खास शिवून घेतलेल्या, बंद बांधता येतील अशा ताडपत्रीच्या पिशव्या, पावसापासून रक्षण म्हणून प्लॅस्टीक, छत्र्या यांची व्यवस्था, गाड्या, एस. टी. आरक्षणं अशा कितीतरी गोष्टी निभावताना होणारी कसरत क्षेत्रकार्य करताना सगळ्यांनीच अनुभवली आणि पेलली.

**परिणती** - आता २५ वर्षांनंतर प्रकाशित स्वरूपात या सगळ्या कसोट्या शिक्षक आणि मानसतज्ज्ञांसाठी उपलब्ध झाल्या आहेत. त्या १२० कसोट्यांमधले संच मुलांना शैक्षणिक विषयांमधल्या अडचणी सोडवण्यासाठी, दहावी नंतरचे शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन करण्यासाठी तसेच अनेक संशोधनांमध्ये वापरता येत आहेत. व्यवहारात येणाऱ्या शालेय आणि मनुष्यवर्तन संदर्भातल्या मार्गदर्शनांसाठी त्या चाचण्यांचे वेगवेगळे संच तयार केले जात आहेत. यातल्या भाषेखेरीजच्या चाचण्या आज महाराष्ट्राच्या बाहेर पोचल्या आहेत. काही महाविद्यालये आणि बी.एड. शिक्षणशास्त्राच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाल्या आहेत. अमेरिकेत अशा प्रकारच्या कसोट्या बुद्धिविकासासाठी वापरल्या जात आहेत.

या सगळ्यामागे अनेक जणांचे शारीरिक आणि बौद्धिक कष्ट खर्ची पडले. आणि एकत्र विचाराने, समूहाने-गटाने काम झाले म्हणूनच हे यश मिळालेले आहे.

**- डॉ. सुजला वाटवे**
३४/६ गुळवणी महाराज पथ, एरंडवणा, पुणे - ४
(विभाग प्रमुख - प्रज्ञा मानस संशोधिका)

सु व र्ण म हो. **१९९०**ची वा ट चा ल
शाळाशाळांमध्ये युवतींद्वारा व्यक्तिमत्त्व विकसन तासिका प्रारंभ, 'प्रचीती' या युवक-युवतींच्या उपक्रमांना प्रारंभ

वितरता वितरता वितरावे, जनमनी विपुल ज्ञान करावे ।
जनप्रचोदित असे घडवावे, जन सुसंघटनार्थ विणावे ।।
**शुभेच्छा! - प्राची मिलिंद बर्वे, ठाणे**

# सारं बदललं !

**सुवर्णा गोखले**

*ग्राम विकसन विभागाच्या वतीने जून १९९५ पासून पुणे जिल्ह्यातील शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यात बचत गटांचे काम सुरू झाले. सध्या साधारण ३०० बचत गटांतून दरमहा ५.५० लाख रुपयांची बचत जमा होते, तर या गटांना गेल्या तीन वर्षांत दिलेले कर्ज १.५० कोटी रुपये आहे. हे सर्व गट स्थानिक महिलांनी पुढाकार घेऊन चालवावेत, यासाठी आपण प्रशिक्षण देतो. गावातील अगदी गरजू (महिन्याला केवळ रु. ५० इतकीच बचत करू शकतात अशा) महिलांपर्यंत आपण या उपक्रमातून पोहोचलो. २-५ हजारांच्या कर्जामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या घरांना सावरताना त्यातील 'ती' कर्ती होईल, असं काम आपण गावागावात केलं. त्यांच्यापैकीच एक भीमा. ती बदलली अन् सारंच कसं बदललं याची गोष्ट तिच्याच शब्दात...*

भीमा माझं नाव. पण घरातली मोठी म्हणून सारे मला तायडीच म्हणायचे. पाच पोरांमधली मी मोठी. माझं लग्न कधी लावून देतो, असं माझ्या बापाला झालं नि अजाणत्या वयात माझा संसार सुरू झाला. काही कळत नव्हतं. अठरा वर्षांची होईपर्यंत माझ्या ओटीत दोन पोरी होत्या; पण वंशाला दिवा नाही म्हणून माझा छळ सुरू झाला. त्यानंतर मीना जन्मली. तिच्या पाठीवर पुन्हा दिवस राहिले. घरात अठराविश्व दारिद्र्य. दिसभर राबलं तर कुठं रातच्याला तोंडात घास पडायचा. त्यात अजून एक तोंड वाढणार; मी ह्यांच्या मागेच लागले की, मी ऑपरेशन करून घेते. त्यांचं म्हणणं मुलगा झाला तरच करायचं! काय करणार, त्यात ही चौथी सरिता झाली नि माझं नशीबच फिरलं जणू! माझ्या छळाला काही सीमाच उरली नाही. दारू पिऊन यायचं नि रोज बदडायचं. त्यानं माझी फार खराब हालत झाली. घरी आईला सांगत होते; पण ती तरी काय करणार? शेवटी ठरवलं नि चारी पोरींना घेऊन आले माहेराला. आईच्या घरापाशीच झोपडी टाकली. उगाच तिच्या जिवाला घोर नको म्हणून स्वत: बाजूला राहिले. मोठ्या पोरीला शाळेतनं काढून घर बघायला घरी ठेवलं. रोजंदारीवर कायबाय कामं करून पुन्हा संसार सुरू केला; पण कोणी जवळ येऊ देईना. पोरींनासुद्धा 'दारुड्या बापाच्या पोरी' म्हणून हिणवू लागले. सारी सोंगं आणता येतात पण पैशाचं सोंग काही आणता येत नाही. जेमतेम पोटाला तुकडा मिळायचा. दिवस फारच वाईट होते.

गावात प्रबोधिनीचे बचत गट सुरू झाल्याची गोष्ट ऐकली. ९५-९६ साल असेल! तेव्हा 'बचत गट' शब्दसुद्धा माहीत नव्हता. बघायला गेले तेव्हा कळलं की, दर महिन्याला प्रत्येकीने २५ रु. जमा करायचे, अशा आळीतल्या २० जणींनी एकत्र यायचे नि जमणारे पैसे जिची गरज जास्त तिनं व्याजावर घ्यायचे.

कर्ज मिळेल, या आशेनं गट लावला. पहिल्याच दिवशी वाटलं गटात जमा झालेले पाचशे रुपये कर्ज म्हणून लगेच घ्यावे. पण कोण काय म्हणेल म्हणून काही बोलले नाही. दोन महिने असेच पैसे जमा केले. संस्थेच्या ताई सारा हिशेब सांगायच्या. जवळच्या गावात काय चाललंय, हेही समजायचं. त्यांच्या दोन-तीन ताई मिळून गटाचे हिशेब ठेवायच्या. पैकी कोणी पण गटाला यायच्या. त्या स्कूटरवरनं यायच्या. एकदा तर त्यांनी मला त्यांच्या स्कूटरवर पण बसवलं. केवढं कापरं भरलं होतं मला. पण संस्थेची लोकं हट्टीच! चौथ्या महिन्यात माझ्याकडं गटात भरायला २५ रु. नव्हते. मी गटात गेले नाही तर ताई घरी आल्या, म्हणाल्या, ''तिथं सर्वांसमोर येऊन सांग पुढच्या महिन्यात भरीन,'' आणि त्यांनी मला तसंच करायला लावलं. तिथे माझी मैत्रीण राधा म्हणाली, ''मी देते

सु व र्ण म हो त्स वी वा ट चा ल

.. १९९० ..

सोलापूर येथे सलगर वस्तीत विद्याव्रत संस्कार



इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती।
प्रगल्भतेचे पंख देऊनी, ने ज्योतिर्जगतात ॥

शुभेच्छा ! – श्री. मिलिंद चिंदरकर, बांद्रा

तुझे २५ रु, तुला जमलं की मला दे.'' काय आधार वाटला मला! एरवी मी तिला पैसे कधी मागितले नसते; पण या गटामुळे ना, माझ्या मैत्रिणीतल्या खऱ्या मैत्रिणी कोण ते मला कळायला लागलं. मी राबते नि कमवून खाते हे सारिकाला, माझ्या मैत्रिणीला माहीत होतं. गटातून मी ५०० रु. कर्ज काढलं, पोरींना कपडे घ्यायला. ते पाहून सारिकानं तिच्या शेतातल्या विहिरीच्या कामाला मला लावून घेतलं नि त्यामुळे उरावरचा कर्जाचा बोजा हलका झाला बघा!

आमच्या गावातली गटाची सहल निघाली पंढरपूरला, मी कुठली जायला? पण ऐन वेळी छबूताईची पोर अकाळी बाळंत झाली नि कोण निघायचं तिच्या जागेवर? म्हणून ताईंनी मलाच धरून नेली पंढरपूरला. विठोबाचं दर्शन अगदी डोळे भरून झालं. तेव्हाच कमरेवर हात ठेवणारी रुक्मिणी मला म्हणाली, 'काही तरी कर आता.' असं दारिद्र्यात जगणं काय कुणाला गोड वाटतं व्हय? ना डोक्याला तेल मिळत होतं की अंगावर कोरी कापडं. आपलं असंच चालू होतं. गटातून बाया कणाकणानं पैसे उचलत होत्या. आधी कुणाला हिशेबातलं काय पण कळायचं नाही; पण प्रबोधिनीच्या प्रशिक्षणानं सारं समजायला लागलं. न वाचता कुठं सही करायची नाही हे समजलं. सावकाराचं उरफाटं गणित समजलं. (उगाच नाही तो गळा कापत सुरुवातीला भारी व्याज घेतो.) सगळं समजलं. आतून मी तर कधी बँकही पाहिली नव्हती; पण एकदा गटाचे पैसे भरायला ताईसंग गेले तेव्हा सारं पाहिलं. किती कागदं होती तिथं! माझी साळा झालीच नाही, नाहीतर मी पण अशा बँकेत काम केलं असतं, असं मला एकदा स्वप्न पडलं. तेव्हापासनं मी प्रबोधिनीच्या ताईंमागे लागले, 'मला काम द्या', 'मला काम द्या;' पण त्या तरी काय करणार? कारण माझी साळा काहीसुद्धा नव्हती. तेव्हा सरकारची योजना आली नि संस्थेनं मला भीमथडीच्या पुण्यातल्या



**बचत गटातील महिला नवरात्रातील पारंपरिक खेळ सादर करताना**

प्रदर्शनात जेवणाचा स्टॉल मिळवून दिला.

भाडं काही नव्हतं. नुसतं लोकांना जेवण बनवून दयायचं नि पैसे घ्यायचे. आमच्या गटानं घेतलं अंगावर हे काम. माझ्या सारखीलाही जमणारं होतं. मग काय पाच दिस आईला सांगितलं पुण्याला जाते म्हणून. थोरल्या पोरीवर धाकट्यांना सोडलं नि मुक्कामीच गेले स्टॉलवर. सकाळी ५ ला काम सुरू करायला लागायचं ते रात्री १२ पोतर माणसं प्रदर्शन बघायला येतच असायचे. कमरेचे तुकडे पडायची परिस्थिती व्हायची; पण दिवसाला पाचशे जण तरी जेवायचे! कुणी भजी घ्यायचे, कुणी नुस्तं ताक प्यायचे. पण बघा ५ दिवसात ९०,०००/ रु. चा धंदा झाला. प्रबोधिनीच्या ताईंनी सारा हिशेब केला. खर्च जाऊन आम्हा चौघींना पाच पाच हजार नफा आला. नुसत्या पाच दिवसात जिवाचं सोनं झाल्यासारखं वाटलं.

मग प्रबोधिनीच्या मदतीनं गटाकडून हॉटेलच्या व्यवसायासाठी कर्ज घेतलं नि नवऱ्याच्या गावात स्टँडपाशी हॉटेल टाकलं! त्यानंतर मग पुन्हा सन्मानानं घरात आले. आता दोघं एकत्र राहतो. चांगलं चालतंय बघा. मी कमवती झाले. पोरींची लग्नं लावली. आता रोजावर बायांना ठेवून त्यांच्याकडून काम करून घेते नि मी गल्ल्यावर पैसे घ्यायला असते. दहा बारा वर्षांत सारं बदललं. गटातून वेळेत कर्ज मिळालं म्हणून धाकट्या दोघींना तर खूप शिकवलं. त्यातली एक तर


सुवर्ण महो.. १९९१ ..त्सवी वाटचाल
ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे प्रारंभ,
शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर प्रारंभ

ध्येयसूर्य ना कधीहि मावळो, की अफाट नभ वरून कोसळो ।
कंटकातुनी वा फुलांतुनी, मार्ग शोधुनी आक्रमू ।।
शुभेच्छा! शैलजा देशपांडे, पुणे

पुण्यात असते. ती नोकरी करते. तिच्या पोराला आणलंय माझ्याकडं. थोडा मोठा झाला की देईन पाठवून. तोवर मला पण सोबत. पोरीचा पाय मोकळा केला. आपण आपल्या पोरीला आधार नाही द्यायचा तर कोण देणार? माझ्या आईनं मला आधार दिला तसा मी माझ्या पोरींना देणार! प्रबोधिनीत आले म्हणून मला हिम्मत आली. चार बुकं शिकलेल्यांपेक्षा मी अनुभवातून शहाणी झाले. ज्या बँकेत ताई सोबत गेले होते गटाचे पैसे भरायला, त्याच बँकेचं हॉटेलला कर्ज घेतलं. गटामुळे बँकेत जायची सवय झाली, ओळख झाली, त्यामुळे जमलं. पूर्वी मी कुणाचा तरी आधार शोधत होते; गटानं मला तो दिला त्यामुळेच मी सावरले!

गावातल्या मनीषाला एक दिवस काही सुचेना. तिला माझाच आधार वाटत होता. ती आली माझ्याकडं. मग मीच तिला संस्थेत घेऊन गेले. अडीनडीला संस्थाच आपली वाटते. संस्थेतून बरं वाईट जसं सांगितलं जातं तसं बाकी कुठं कळत नाही. ती सावकाराच्या व्यवहारात फसलेली. सावकारानं जमिनीचा तुकडाच नावावर करायचा तगादा लावला; म्हणून तर तिच्यावर आभाळ कोसळलं. मग संस्थेच्या ताईंनी सावकाराचा हिशेब, त्याचे व्याजदर सारं सांगितलं. गटाची तातडीची बैठक बोलावली. मनीषाबद्दल सर्वांनी गटात बोलणं केलं नि बँकेचं कर्ज प्रकरण करून तिला कमी व्याजानं फेडता येईल अशा हप्त्याचं कर्ज मिळवून दिलं. त्यामुळे तिची जमीन पण वाचली नि पोटाची सोय झाली. सारी कागदपत्रं चोख परत करायला संस्थेनं मदत केली. आता तिलापण जगायचा हुरूप आला. आता तीपण कुठली बैठक चुकवत न्हाई आणि प्रबोधिनीचाच सांगावा साऱ्यांना सांगते -

‘एकीनं एक-एक निर्भीड साऱ्या बना गं
मर्दानी नार मी भिनार न्हाई कुणा गं !’

गावातलं प्रबोधिनीचं काम आता मीच बघते. हॉटेल टाकल्यापासून गावातही पाच गट केलेत. बायांना घरोघरी जाऊन गटाचा फायदा सांगितला.



**बचत गटातील महिला विक्रीसाठी फराळ तयार करताना**

संस्था आपल्यासाठी सारं करते, हे सांगितलं. परवाच आमच्या गावचा डोहरा(झऱ्याचं पाणी साठवण्याची जागा) खोल केला. आम्ही गटातल्या बायांनी श्रमदानानं डबर काढलं. त्यानं आमचाच प्रश्न सुटला. गटात आल्यापासून समाधान वाटतं. काहीतरी करायला मिळाल्याचा आनंद वाटतो. बचत गट काय गावोगाव असतात; पण प्रबोधिनीच्या शिक्षणामुळे, कार्यक्रमांमुळे जे ‘मिळतं’ ती मजा इतर गटात नाही, हे मी अनुभवातून नक्की सांगते!

*भीमाच्या बरोबरच अशा शेकडो स्त्रिया एकत्र आल्या आणि बचत गटाचे ‘व्यवहार’ सांभाळू लागल्या. स्वत:च्या पायावर कुणाच्याही मदतीशिवाय भक्कमपणे उभं राहू लागल्या. ‘स्थानिक लोकसहभाग’ हा प्रबोधिनीच्या धोरणाचा आग्रहच यामागे आहे, असे वाटते.*

**– सुवर्णा गोखले**
सी–१५, अर्चनानगर, एरंडवणे, पुणे 411038

(१९८४ च्या दहावीच्या तुकडीची विद्यार्थिनी, सध्या ज्ञान प्रबोधिनी ग्राम विकसन विभागात बचतगट संघटक म्हणून कार्यरत)


सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९९१ ..
गांधी वस्ती विकास प्रकल्प प्रारंभ, जागतिक बुद्धिवंतांच्या परिषदेत हॉलंड येथे सहभाग



सुखात किंवा विपदाकाली, अविचल राहो शान्ति आतली ।
प्रसन्नतेचे दैवी स्मित रे, नित विलसो ओठात ।।
**शुभेच्छा ! – संतुल, पुणे**

# भारतभर प्रबोधिनी

**महाराष्ट्राशिवाय अन्य राज्यात प्रबोधिनी...**




### मदत कार्य

* १९६८ - सूरत येथे पुरानंतर मदतकार्य
* १९७७ - डिसेंबर : वादळानंतर आंध्रप्रदेशमध्ये मदतकार्य
* १९७९ - मोरवी पूर मदतकार्य,
* १९८८ - सप्टेंबर : बिहार भूकंप मदतकार्य
* १९९९ - नोव्हेंबर : ओरिसा येथे वादळानंतर मदतकार्य
* २००१ - जानेवारी : गुजरात भूकंप मदतकार्य

### काही निवडक अभ्यास दौरे

* १९६५ - जून : तमिळनाडू येथे हिंदीविरोधी आंदोलनाचा अभ्यास, सप्टेंबर: जम्मू काश्मीर येथे युद्धक्षेत्रावर
* १९६७ - पूर्वांचल अभ्यास दौरा
* १९८० - तमिळनाडूतील मीनाक्षीपुरम् येथे धर्मांतर प्रश्नी अभ्यास दौरा
* १९८६ - राखीव जागा प्रश्नी गुजराथ दौरा
* १९८७ - ऑक्टोबर : राजस्थान येथे 'सती' प्रथेवरील अभ्यासासाठी व जनजागृतीसाठी आणि गुरखा प्रश्नी पश्चिम बंगाल येथे युवतींचा दौरा
* १९९० - जुलै : युवक कार्यकर्ते कारगिल येथे
* १९९१ - उत्तरप्रदेश येथे निवडणूक अभ्यासासाठी दौरा
* २००४ - काश्मीर अभ्यास दौरा

### मैत्री अभियान सद्‌भावना यात्रा

* १९८२ व १९८४ पंजाब येथे युवक व युवती सद्‌भाव यात्रा
* २००५ - ईशान्यभारत मैत्री अभियान
* २००८ - काश्मीर युवकांचा महाराष्ट्र मैत्री दौरा

**सुवर्ण महो..१९९१.. वाटचाल**

निगडी प्रशालेत अग्रणी योजनेस प्रारंभ, गांडूळ खत प्रकल्प प्रारंभ, नेत्र तंत्रज्ञ प्रशिक्षण वर्गास प्रारंभ

अन्तरात जी वसे हीनता, मोह असूया आणि अहन्ता ।
दृढ वज्राने त्यांच्यावरती, करि निर्मम आघात ॥
**शुभेच्छा ! – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

# जाणून मंत्र घेऊ द्रष्ट्या ऋषिवरांचा

(ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याचा तात्त्विक आधार असणाऱ्या चार महापुरुषांच्या जीवनकार्याचा थोडक्यात परिचय)

**यशवंतराव लेले**

ज्ञान प्रबोधिनी भवनात आपण आलात की आपल्याला एकसारख्या आकाराची चार तैलचित्रे पाहण्यास मिळतील. इतिहासाच्या तुमच्या पुस्तकात कुठेना कुठे ही चित्रे तुम्ही पाहिलेली असणार. यातील अगदी पहिले चित्र समर्थ रामदासांचे आहे. आपल्या संतमालिकेतील एक आगळावेगळा असा हा संत ! शिक्षक बनून शिष्याचे अक्षर सुंदर घटवून घेणारा, त्यासाठीचे तंत्र सांगणारा असा हा संत ! शिवाय या पाठांतराचे महत्त्व सांगण्याचे काम करणारेही रामदासच! 'उदंड असावे पाठांतर !' एवढे सांगून थांबणारे समर्थ नाहीत. पुढे लगेच ते म्हणतात, 'कंठी धरावे अर्थांतर'. शब्दांपेक्षा त्याच्या अर्थाचे महत्त्व समर्थ अधोरेखित करतात.

'आपल्या झोळीत कागद, दौती आणि बोरू असे लेखन साहित्य बाळगणारा संत' असा उल्लेख संतकवी मोरोपंत यांनी केला आहे, तो लोकशिक्षक समर्थांचा!

*'ऐका सदैवपणाचे लक्षण। रिकामा जाऊ नेदी क्षण।।'*

क्षणभरही वेळ वाया न घालवणारा माणूस खरा भाग्यवान! यासाठी नेहमी सावध राहायला सांगून समर्थ बजावतात, *'अखंड सावधान रे। प्रयोग प्रयत्न मान रे।'* दक्षचित्त होऊन जो प्रयत्नशील राहतो तो यशस्वी होतो. समर्थांचे शब्द आहेत, *'करील प्रयत्न जीतुका। तयास लाभ तितुका।'* **प्रयोग, प्रयत्न आणि प्रचीती** ही आहे समर्थांची त्रिसूत्री! प्रत्यक्ष करून पाहणे, न कंटाळता प्रयत्न चालू ठेवणे आणि सफल होणे, म्हणजेच अनुभव घेणे अर्थात प्रचीती घेणे. समर्थांचे बोलणे, लिहिणे हे अनुभवांचे बोल आहेत. म्हणूनच त्यांना मोल आहे!

एखादं गणित सुटेनासं होतं तेव्हा आपण हताश होतो. अशा वेळी समर्थ सांगतात, *'यत्न तो देव जाणावा।'* प्रयत्न हाच परमेश्वर मानून आपण गणितात पुनश्च डोकं घालतो, वेळ देतो. आणि काय आश्चर्य! 'अहो गणित सुटलं!!' आपण आपल्याशीच आनंदाने उद्गारतो. चेहरा प्रसन्न झालेला असतो. निराशेची जागा आता आत्मविश्वासाने घेतलेली असते ! असे पदोपदी आपल्याला प्रोत्साहित करणारे समर्थ हे आपले गुरू बनले, तर ते स्वाभाविकच आहे. ते महाराष्ट्राचे सद्गुरू आहेत!

पारतंत्र्याच्या प्रगाढ अंधारात समर्थ होण्याचा, सशक्त होण्याचा आणि संघटितपणे उत्तम गुणांची कास धरण्याचा उपदेश देणारे समर्थ हे *'प्रपंची पाहिजे सुवर्ण'* म्हणून वैभवाचा मार्ग दाखवणारे, म्हणून वेगळे संत ठरले आहेत. रामाचे श्रेष्ठ भक्त असे रामदास स्वत: भजन करत असणारच, पण त्यांची भजनाची कल्पना, *'भेटो कोणी एक नर। धेड महार चांभार।। राखावे तयाचे अंतर। या नाव भजन ।।'* अशी वेगळीच आहे! 'श्रेष्ठ-कनिष्ठ न मानता सर्वांचं हृदय जाणून त्याला प्रसन्न ठेवणे म्हणजेच भजन' असं ते

सुवर्णमहोत्सवी वाटचाल .. १९९२ ..
छात्र प्रबोधन प्रारंभ, शैक्षणिक उपक्रम संशोधिका प्रारंभ, हातपंप दुरुस्ती व प्रशिक्षण प्रकल्प सुरू



जनांचा प्रवाहो इथे चाललेला, सदा संस्कृतीच्या मुळापासुनी।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या, अम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।।
शुभेच्छा ! – स्पृहा कुलकर्णी, पुणे

स्पष्ट सांगतात! मराठवाड्यातील जांब गावात इ. स.१६०८ मध्ये जन्मलेला नारायण सूर्याजी ठोसर वयाच्या बाराव्या वर्षी 'सावधान' हा शब्द ऐकून खरंच सावध झाला! गोदातीरी नाशिकजवळ १२ वर्षे खूप कष्ट घेऊन, उपासना करून, स्वाध्याय करून, तो बाहेर पडला. सारी देशस्थिती पाहात भारताची परिक्रमा करून त्याने समाजाची दुरवस्था, परचक्र, अन्याय, अत्याचार यातून बाहेर पडण्यासाठी महाराष्ट्रात येऊन समाजप्रबोधन, संघटन,



समर्थ रामदास

बलोपासना यांची कास धरली. छत्रपतींच्या स्वराज्य स्थापनेसाठी उपयुक्त समाजसंघटनेचे, बलोपासनेचे, काम करत करत रामदासांनी 'दासबोध' या ग्रंथाची रचना केली. सज्जनगडावर इ. स. १६८२ मध्ये त्यांनी समाधी घेतली.

***

रामदास स्वामींनंतरचे जे चित्र आहे ते आहे **स्वामी दयानंदांचे!** सौराष्ट्रातील टंकारा गावी इ.स.१८२४ मध्ये मूळशंकरचा जन्म झाला. तल्लख बुद्धीचा असल्याने वयाच्या १५ व्या वर्षीच यजुर्वेदाचा अभ्यास त्याने पूर्ण केला. घरात आपल्या लग्नाची तयारी चालू असल्याचे दिसताच 'सावध' होऊन मूळशंकरने पलायन केले. अनेक गुरू केले. अखेर मथुरेतील विरजानंदांपाशी येऊन त्याने तीन वेदांचा अभ्यास केला. माधुकरी मागून स्वत:चे व अंध गुरुजींचे पोट भरणारा मूळशंकर आता दयानंद झाला होता. गुरुंना गुरुदक्षिणा काय द्यावी अशा चिंतेत शेवटी ओंजळभर लवंगा घेऊन गुरूपाशी गेल्यावर दयानंदास गुरुजी म्हणाले, 'तुझे सारे जीवनच मला गुरुदक्षिणा म्हणून दे.' साष्टांग नमस्कार घालून गुरूंपुढे नतमस्तक झालेल्या शिष्याला गुरुजींनी आज्ञा केली, 'वेदातील ज्ञानाचा प्रसार कर.' असे हे दयानंद प्रबोधकांचे आदर्श आहेत. आपले पुरे आयुष्य वेदांचा म्हणजेच सत्यज्ञानाचा प्रसार करण्यात दयानंदांनी घालवले. 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ त्यासाठी त्यांनी लिहिला.

मूर्तीपूजेऐवजी सदाचारास महत्त्व देणाऱ्या दयानंदांनी जातीपातींचे भेद नाकारले, आर्य समाजाची १८७५ मध्ये त्यांनी स्थापना केली. होमहवन केल्याने पर्यावरण कसे शुद्ध होते, ते त्यांनी दाखवले. हिंदूंना मूर्तिपूजेपासून परावृत्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हवनाचे महत्त्व सर सय्यद अहमदांसारख्या मुस्लिम नेत्यालाही मान्य करावे लागले! रेव्हरंड ग्रे, टी. जे. स्कॉट अशा ख्रिश्चन मिशनऱ्यांप्रमाणे मौलाना अब्दुल रहमान मुरादांसारख्या धर्मगुरूंनाही वेदविचार पटवून देण्यात दयानंद यशस्वी झाले. दयानंद हिंदुस्थानच्या पुनर्जागरणकार्यातील एक धुरंधर होते.

वर्षानुवर्षे, शतकानुशतके हिंदूंना बाटवून मुसलमान करण्यात येई, ख्रिस्ती बनवण्यात येई; पण दयानंदांनी तर अनेकानेक विधर्मियांना हिंदू धर्माची, आर्य धर्माची दीक्षा देण्यास प्रारंभ केला. धर्मांतर करू पाहणाऱ्या अनेक हिंदूंना त्यांनी थोपवले व हिंदू धर्माची सेवा केली. इस्लामी धर्मगुरू मुहंमद उमर यांना हिंदू करून घेतले! त्यांनीच पुढे आयुष्यभर हिंदू धर्माचा प्रचार, प्रसार केला. त्यासाठी 'तेहकीकाते धर्म' (धर्मशोध) हे पुस्तक त्यांनी लिहिले! तुम्ही जाणता की, १९४७ मध्ये देशाची फाळणी होऊन जो भाग पाकिस्तानात गेला त्यात अर्धा पंजाबही गेला. अर्ध्या पंजाबाप्रमाणे साऱ्या राजस्थानमध्येही मुस्लिम लोकसंख्या वाढली असती, तर राजस्थान पाकिस्तानचा भाग झाला असता, असे गांधीवादी लेखक कै. श्रीपाद जोशी यांनी लिहून ठेवले आहे. पण चीना, मेहरात या दलित जमातींचे हिंदुकरण करण्याचे कार्य दयानंदांच्या प्रेरणेने झाले आणि राजस्थान वाचला! स्वतंत्र भारताने लोकशाहीचा स्वीकार केला; पण तत्पूर्वी सुमारे ५० वर्षे दयानंदांनी आर्य

सुवर्णमहोत्सवी वाटचाल ..१९९२..
बुद्धिविषयक १२० प्रज्ञामान कसोट्यांचे काम पूर्ण,
स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्र प्रारंभ

नीलात नित्य जडवू कर्तृत्ववान तारे ।
प्रतिभेस जागत्याही नच ठाउकी किनारे ।।

समाजासाठी लोकशाही पद्धती स्वीकारली होती. 'हिंदी राष्ट्रभाषा व्हावी', हे सर्वप्रथम त्यांनीच सांगितले आहे. मुलींच्याही मुंजी करून त्यांना वेदाध्ययनाचा अधिकार बहाल करणारे दयानंद हे पहिलेच नेते! शेतकऱ्यांना राजांचा राजा मानण्याची दृष्टी त्यांच्यापाशी होती. दीनपणाने जगण्यापेक्षा स्वाभिमानाने, ताठ मानेने जगण्याची शिकवण देणाऱ्या दयानंदांनी 'अदीना: स्याम शरद: शतम्' (आम्ही स्वाभिमानपूर्वक १०० वर्षे जगू) हा मंत्र दिला! कोणत्याही पाश्चात्य पुस्तकाच्या आधारे नव्हे तर वेदांच्या आधारे दयानंदांनी या आधुनिक विचारांचे प्रतिपादन केले आहे, हे आपण ध्यानी ठेवूया. एक आक्रमक, निर्भय समताधिष्ठित असे स्वरूप हिंदू धर्मास प्राप्त व्हावे यासाठी दयानंदांनी आपले आयुष्य वेचले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे की, दयानंद हे अस्पृश्यांचे अतीव कळकळीचे कैवारी होते. असे हे प्रबोधकांचे दीपस्तंभ इ. स. १८८३ मध्ये निवर्तले.



**स्वामी दयानंद**

***

**नरेंद्र विश्वनाथ दत्त** इ.स.१८६३ च्या संक्रांतीस जन्मला. इंग्रजी शिक्षण घेऊन बी. ए. झालेला हा मुलगा युवावस्थेत ब्राह्मो समाजात जाऊन मूर्तिपूजा न मानणारा, आधुनिक विचारांचा बनला होता. त्याचे अतिशय गोड भक्तिगीत ऐकून भावावस्थेत गेलेल्या रामकृष्णांना त्याने ओढ लावली. तो दक्षिणेश्वरी काम करणाऱ्या निरक्षर अशा या पुजाऱ्याकडे जाऊ लागला. वडिलांच्या अकाली निधनाने पोरका बनलेला नरेंद्र कौटुंबिक आपत्तीने व्याकुळ होऊन कालीच्या मूर्तीसमोर गेला. भौतिक गोष्टींच्या मागणी ऐवजी काली आईपाशी 'विवेक आणि वैराग्य' मागून तो परतला. अशिक्षित अशा त्या पुजाऱ्यास सुशिक्षित तरुण नरेंद्राने आपल्या गुरुपदी बसवले कारण देव पाहिल्याचं होकारार्थी उत्तर देणारा तो एकमेव माणूस त्यांना भेटला होता!

इ. स.१८९१ चे सुमारास आपल्या गुरुबंधूंसह संन्यास दीक्षा घेतलेले स्वामी विवेकानंद घर सोडून भारताची परिक्रमा करण्यास बाहेर पडले. मोठमोठे संस्थानिक, झोपडीत राहाणारे गोरगरीब, स्पृश्य, अस्पृश्य अशा लोकांपर्यंत, जाऊन त्यांची परिस्थिती पाहून, त्यांच्यासह राहून या संन्याशाने समाजस्थितीचे ज्ञान करून घेतले.

फिरता फिरता ते मुंबईत आले. लोकमान्य टिळकांसह पुण्यास येऊन त्यांच्या घरी राहिले. मग महाबळेश्वरात काही काळ त्यांचे वास्तव्य होते. कोल्हापूर, बेळगाव, म्हैसूर असा प्रवास करत, मिळेल ते खात, न मिळाल्यास उपास काढत शेवटी ते कन्याकुमारीला पोचले. ज्या खडकावर बसून कुमारीने म्हणजे पार्वतीने शंकरासाठी तप केले, त्या ठिकाणी तीन दिवस ध्यानस्थ राहून स्वामींनी आपल्या गुरूंचे ध्यानावस्थेतच मार्गदर्शन घेतले. 'पश्चिमे'ला आपल्या वेदान्त विचाराची ओळख करून देण्यास जायचे ठरले. इ. स. १८९३ सप्टेंबरमध्ये शिकागो सर्वधर्मपरिषदेत हजर राहण्यासाठी सर्व अडीअडचणी पार करून अनाहूतपणे हा तेजस्वी तरुण पोचला. मग ते गाजलेलं भाषण! आणि ख्रिश्चन धर्माचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने योजलेल्या साऱ्या परिषदेत हिंदू धर्माचा व स्वामी विवेकांदांचा गाजावाजा होत राहिला. साऱ्या अमेरिकेत विवेकानंदरूपी जणू एक झंझावातच निर्माण झाला!

मिशनरी लोक भारताच्या दारिद्र्याचे, रानटीपणाचे, अज्ञानाचे असे काही वर्णन करत की, अमेरिकी लोकांना वाटे यांचा उद्धार करण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे. त्यातून चर्चला देणग्या मिळत आणि त्या द्रव्याचा उपयोग भारतीयांच्या ख्रिस्तीकरणार्थ केला जात असे. अशा स्थितीत विवेकानंद नामक वादळाने भारताची वास्तव

सु व र्ण म हो.. **१९९३**.. त्स वा ट चा ल

साखरशाळा प्रारंभ, ग्रामीण प्रज्ञा विकास प्रकल्प प्रारंभ, जिजामाता सहविचार केंद्र प्रारंभ



जी जीवनपुष्पे सतेज नव रक्ताची, स्थापावा त्यांनी धर्म आत्म अर्पूनी।
त्यानेच अर्चना होत राष्ट्रदेवाची॥

स्थिती, हिंदू धर्माचे उदात्त वेदान्त तत्त्वज्ञान अशा गोष्टी लोकांना सांगितल्यामुळे चर्चला मिळणाऱ्या देणग्यात प्रचंड घट झाली! एवढे उदात्त तत्त्वज्ञान असणाऱ्या देशात आपण धर्मप्रचारक पाठवणे हे वेडेपणाचे आहे, असे लोकांना वाटू लागले!

स्वामीजी इंग्लंडमध्ये गेले. तेथे त्यांनी व्याख्याने दिली. अमेरिकेप्रमाणे इंग्लंडमध्येही त्यांना अनुयायी मिळाले. वेदान्त सोसायट्यांची स्थापना झाली. भारतात या विश्वविजयी संन्याशाचे देवदुर्लभ स्वागत झाले. रामकृष्ण मिशनची स्थापना इ. स. १८९७ मध्ये झाली. 'मार्गारेट नोबल' ही आयरिश युवती भारतात आली. 'भगिनी निवेदिता' बनून तिने कोलकत्यात शाळा सुरू केली. इ. स. १८९९ मध्ये तिच्याबरोबर स्वामी पुनश्च अमेरिका-युरोपचा दौरा करून आले. इ. स. १९०२ मध्ये वयाच्या केवळ ३९ व्या वर्षी स्वामीजींनी इहलोकाचा निरोप घेतला; पण निवेदितांनी त्यांचे उत्तराधिकारी या नात्याने युवक दलांचे नेतृत्व स्वीकारले. देशात राष्ट्रीयतेचे जागरण करण्यासाठी लेखणी व वाणी त्यांनी झिजवली.



स्वामी विवेकानंद

विजेत्या देशाने ख्रिस्ती धर्म प्रचारार्थ भारतात मिशनरी पाठवणे आणि एका गुलाम राष्ट्रातील संन्याशाने इंग्लंड, अमेरिकेसारख्या स्वतंत्र प्रगत देशात हिंदू तत्त्वज्ञान प्रचारार्थ तेथील स्त्री-पुरुषांना तयार करणे, यात केवढा तरी फरक आहे. हे काम स्वामीजींनी केले म्हणून त्यांना विश्वविजयी योद्धा संन्यासी मानण्यात येते, हे योग्यच आहे.

***

अ‍ॅक्रॉइड बालपणापासून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत व ख्रिस्ती मिशनऱ्यांसमवेत राहिला. इंग्रजांच्या प्रशासकीय सेवेसाठी आवश्यक परीक्षा देण्यासाठी इंग्लंडमधे भावासह राहून त्याने इंग्रजी, लॅटीन अशा विषयातही प्रावीण्य मिळवले. तेथेच 'कमळ व खड्ग' या गुप्त संघटनेची, भारताच्या स्वातंत्र्यासाठी शपथ घेऊन तो भारतात इ. स. १८९३ मध्ये परत आला. इंग्रजांच्या सेवेत रुजू न होता तो बडोद्याच्या महाराजांच्या पदरी प्रशासक म्हणून रुजू झाला. सशस्त्र क्रांतीच्या विचारांनी प्रेरित झालेल्या या युवकाने वंगभंग चळवळीचा मोका साधून बंगालमध्ये पाय ठेवला. श्री सखाराम गणेश देउसकर, भगिनी निवेदिता अशांच्या बरोबरीने सशस्त्र क्रांतीसाठी युवकांना संघटित करण्याचे काम **श्री अरविंदानी** सुरू केले. त्यांचे मूळ नाव अरविंद घोष! मातृभाषा बंगालीही त्यांना नव्याने शिकावी लागली. मराठी, संस्कृत यांसारख्या देशी भाषा, त्यांमधील वेदादी वाङ्मय या साऱ्या गोष्टींचा अभ्यास त्यांनी बडोद्यात असतानाच सुरू केलेला होता.


मातृभूमीपासून, मातृभाषेपासून भारतीय संस्कृतीपासून दूरवर जाऊन ग्रीक-लॅटीन संस्कृतीत वाढलेला हा अरविंद बघता बघता हिंदू संस्कृतीचा खंदा पुरस्कर्ता बनला. भारतीय स्वातंत्र्यार्थ त्याने हाती खड्ग घेतले. ते खड्ग अदृश्य होते; पण त्याहून धारदार होती त्यांची लेखणी!

'अनुशीलन समिती' या क्रांतिकारक मंडळाचा समन्वय साधणाऱ्या केंद्रीय समितीचे महत्त्वाचे घटक होते अरविंद! लोकमान्यांच्या चतु:सूत्रीनुसार सुरू झालेल्या कोलकत्यातील राष्ट्रीय विद्यापीठाचे प्रमुख पद अरविंदांनी स्वीकारले होते. सुरत काँग्रेसमध्ये लोकमान्यांचा अरविंदांशी परिचय झाला. अरविंद जहाल गटाचे म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढच्याच वर्षी अलिपूर बाँब खटल्यात अरविंदांना वर्षभराची शिक्षा झाली. भाऊ बारींद्र हाही क्रांतिकारक युवकांत अग्रणी होता.

भारताचा सनातन धर्म म्हणजेच या देशाचे राष्ट्रीयत्व असल्याचे अरविंदांचे म्हणणे होते. त्यांचे जहाल लेखन 'वंदे मातरम्' पत्रातून प्रकाशित होत होते. त्यांच्या गुप्त क्रांतिकारक हालचालीही चालूच होत्या. सरकारी

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९९३ ..
ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था स्थापना,
किल्लारी भूकंप मदतकार्य

गुप्तचरांपर्यंत काही कुणकुण पोचली. ही गोष्ट भगिनी निवेदितांना कळली. अरविंदांना पुनश्च अटक होणार, असे दिसताच निवेदितांनी रातोरात सारी व्यवस्था करून अरविंदांना चंदननगर या फ्रेंचांच्या बेटावर पोहोचवले. त्यामुळे अरविंदांची अटक टळली. पण एका वर्षाच्या कारावासात झालेल्या कृष्णदर्शनाने अरविंद हे अध्यात्म क्षेत्रात बुडून गेले. पुढे पाँडेचेरीमध्ये त्यांनी आश्रम स्थापून योगाचा स्वाध्याय व प्रचार याच्यातच सारे आयुष्य वेचले. त्यांनी केलेले विपुल लेखन हे इंग्रजी भाषेत आहे. १५ ऑगस्ट १८७२ मध्ये जन्मलेल्या अरविंदांनी जगभरातील नाना देशातील साधकांना पूर्ण योगाचे मार्गदर्शन करण्यात आपले आयुष्य व्यतीत केले. फ्रेंच कन्या मीरा रिचर्ड यांनी अरविंदाश्रमाचे सारे दायित्व स्वीकारून योगी अरविंदांना साधनेसाठी सवड उपलब्ध करून दिली. इ. स. १९५० मध्ये त्यांनी पाँडेचेरीतच समाधी घेतली.



**योगी अरविंद**

***

हे दीपस्तंभ प्रबोधिनीने का बरं निवडले असतील? समर्थ रामदास स्वामींनी वेणाबाईंना मिरजेच्या मठाचे अधिपत्य देऊन त्यांना कीर्तन करण्याचा अधिकारही दिला. दयानंदांनी हंसा ठकुराणी या महिलेला मुलींना दीक्षा देण्यासाठी शिकवून तयार केले. स्त्रियांना वेदाधिकार मिळवून दिला. स्वामी विवेकानंदांनी 'मार्गारेट नोबेल' सारख्या विदेशी युवतीला स्वधर्मात घेऊन 'निवेदिता' म्हणून आपले उत्तराधिकारी बनवले. योगी अरविंदांचे उत्तराधिकारी पदही एका फ्रेंच महिलेने-मीराबाईंनी उत्कृष्टपणे पार पाडले.

'मराठा तितुका मेळवावा', असा उद्‌घोष करत रामदासांनी संघटनेची कास धरली. आर्य समाज स्थापन करून दयानंदांनी तर्कशुद्ध, विज्ञाननिष्ठ अशा हिंदूंचे संघटन करण्यासाठी आयुष्य वेचले. विवेकानंदांनी विदेशातील संघटित उपक्रम पाहून भारतातही असे कार्य व्हावे म्हणून 'रामकृष्ण संघ' स्थापन केला. योगी अरविंदांच्या पाँडेचरी आश्रमात योग शिकण्यासाठी साऱ्या जगातून स्त्री-पुरुष येत असतात. त्यामुळे योगाच्या आधारे एक भारतीय संस्कृतीचे संघटित रूप विश्वात विखुरलेले दिसते.

हिंदु संस्कृतीच्या भरभक्कम पायावर ज्यांनी संघटन उभे केले असे हे चौघेही 'धर्म संस्थापनेचे नर' आहेत. 'हिंदू जीवनदृष्टी' ठेऊनच त्यांनी त्यांचे कार्य केले. 'जनी जनार्दन' हा भाव बाळगून त्यांनी जातीपाती, स्त्री-पुरुष असे भेद न करता सर्वांना समतेने वागवण्याचे महत्त्व जाणले. 'उत्तमतेचा' महिमा रामदासांनी उत्तम पुरुष लक्षणे सांगून व *'उत्कट भव्य तितुके घ्यावे। मिळमिळीत अवघेची त्यागावे ।। '* असे वेचक शब्द वापरून सांगितला आहे; तर दयानंदांनी तर्कशास्त्राधिष्ठित शास्त्रचर्चा करून सर्व धर्मपंथांमधील ग्राह्याग्राह्यतेचे विश्लेषण केले. त्यातून योगशास्त्रही सुटले नाही. स्वामी विवेकानंद हे पाश्चात्य विज्ञानाचे स्वागत करून त्यांना अद्वैत तत्त्वज्ञानाचे मार्गदर्शन करणारे संन्यासी होते. विज्ञानावर स्वत: लेखन केलेले स्वामी आपल्याला माहीतच नसतात. हीच 'विज्ञानदृष्टी' ठेऊन योगशास्त्राला पूर्ण योगाचे स्वरूप देणारे योगी अरविंद, हेही आपले एक दीपस्तंभ आहेत. अशाप्रकारे प्रबोधिनीच्या 'तत्त्वसप्तकाची' उभारणी ज्यांच्या जीवनाधारे झाली आहे, असे हे चौघे उत्तम पुरुष आहेत.

**– यशवंतराव लेले**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३०
(युवक प्रशालेचे पहिले प्राचार्य, संत्रिका विभागाचे मार्गदर्शक)

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९९३ ..
शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासवर्ग प्रारंभ,
शिवगंगा महिला उद्योग प्रारंभ

# रसरसत्या चैतन्याचे झरे इथे खेळती

**शालेय शिक्षण देणाऱ्या प्रबोधिनीच्या एकूण ५ शाळा... शहरी भागात पुणे, निगडी, सोलापूर येथे, तर ग्रामीण भागात साळुंब्रे व हराळी येथे आहेत. या शाळेमध्ये सध्या शिकत असलेल्या विद्यार्थी – विद्यार्थिनींचे अनुभव पुढे आहेत. प्रत्येक शाळा आपापली वैशिष्ट्ये जपत प्रबोधिनीची शिक्षणप्रणाली समृद्ध करत आहे. इथे विविधांगी उपक्रमांची रेलचेल असते. त्यात मनापासून सहभागी होत असतानाच 'आम्ही पुस्तकेही शिकतो आणि दहावीच्या परीक्षेत, जाता जाता उत्तम यशही मिळवतो,' असे सांगणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनुभव तुम्ही पुढे वाचाल. वर्षारंभ–वर्षान्त उपासना, विद्याव्रत संस्कार, प्रकल्प पद्धतीतून शिक्षण, स्वयंअध्ययनावर भर, नेतृत्वाची संधी देणारे वातावरण (सहली–शिबिरे), भोवतालच्या परिस्थितीचे दर्शन घडवणारे अनुभव, आव्हानात्मक परिस्थितीला समोर जाणे ही काही वैशिष्ट्ये सर्वत्र आढळली तरी त्या–त्या काळानुसार व त्या–त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार त्यात होत जाणारे बदल, प्रयोगशीलता व स्वातंत्र्य हे प्रबोधिनीच्या शिक्षणाचे वेगळेपण तुम्हाला प्रबोधिनीच्या सर्वच शाळांमध्ये आढळेल. त्या–त्या ठिकाणच्या एकेका विशेष उपक्रमाबद्दल या विद्यार्थ्यांकडूनच समजून घेऊया...**

---

## शाळा... एक वेगळंच रसायन

**चि. प्रणव कुलकर्णी, चि. मयूर वाघ**

आमची शाळा म्हणजे ज्ञान प्रबोधिनीची पुणे येथील प्रशाला. मंदिरासारख्या दिसणाऱ्या या शाळेत बरंच काही वेगळं आहे, हे पाचवीतल्या पहिल्या दिवसापासूनच जाणवायला लागलं; जेव्हा शाळेत गणवेशाऐवजी आपल्या आवडीचे कपडे घालून आलो तेव्हाच ! पाचवीतल्या कुठल्याही मुलाला आनंद वाटेल अशीच गोष्ट होती ही!! दल हे आमच्या वर्गाला सर्वात प्रिय! इतके प्रिय की, सकाळी काही कार्यक्रमांमुळे शाळेत येऊ न शकलेला विद्यार्थीसुद्धा संध्याकाळी दलावर उपस्थित असतो. दररोज दलावर खेळ, व्यायाम इ. तर होतेच; परंतु प्रात्यक्षिके, गणेशोत्सवात अथर्वशीर्ष पठण व बर्ची नृत्य, पथकश: सामने हे सर्व अनुभव अविस्मरणीय आहेत.

> सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. **१९९४** ..
> प्रबोधिनीचा २० वर्षांचा पहिला भवितव्य लेख प्रसिद्ध,
> प्रचीती विकासवेध शिबिर

१२० जण व्यवस्थित, शिस्तबद्ध बोथाट्या फिरवताना जाम भारी वाटतं!

इ. सातवीत प्रशाला स्वत:ची अशी एक शिष्यवृत्ती परीक्षा घेते. CBSE ला जोडलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र सरकार शिष्यवृत्ती नाकारत असल्याने प्रशालेने ही शिष्यवृत्ती सुरू केली. परंतु या शिष्यवृत्तीचे वैशिष्ट्य असे की, ही परीक्षा कुठल्या पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमावर आधारित नसते. वर्षभर वेगवेगळ्या अध्यापकांनी १४-१५ जीवनावश्यक कौशल्ये आम्हाला शिकवली. यातीलच काही कौशल्ये म्हणजे मुलाखत कौशल्य, वाचन कौशल्य, स्वयंपाक कौशल्य, वक्तृत्व इ. याबरोबरच आम्हाला वर्षभरात ५० पुस्तकांची टिपणे काढायची होती. या शिष्यवृत्तीमुळे आम्ही नक्कीच काही प्रमाणात तरी स्वावलंबी झालो आहोत.

फटाके विक्री हा प्रबोधिनीचा एक महत्त्वाचा उपक्रम

**अभिव्यक्ती सादरीकरण**

आहे. यातून विद्यार्थ्यांमधील विक्री कौशल्य (Marketing skill) वाढवले जाते. विक्रीच्या आधीच प्रत्येक जण स्वत:चे विक्री उद्दिष्ट ठरवतो. पथकांचेही उद्दिष्ट ठरवले जाते. विक्रीच्या काळात अतिशय चुरशीचे वातावरण असते. कोण सर्वात जास्त विक्री करतो, याची जणू काही स्पर्धाच लागलेली असते. आपण ठरवलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नियमितता, सातत्य व चिकाटी हे आवश्यक गुण आम्ही या निमित्ताने लक्षात ठेवले.

जास्त विक्री होण्यासाठी आम्ही स्वत: नवीन तंत्रे अवगत करू लागलो. ग्राहकाला फक्त फटाक्यांची नावे व किंमती न सांगता, तो फटाका नक्की कसा फुटतो, त्यामधून कुठल्या रंगाचा व किती मोठा वर्षाव होतो, हा फटाका कसा चांगला आहे असे पटवून द्यायला लागलो. यामुळे fancy items ची विक्री वाढू लागली. तसेच आम्ही व्यक्तीच्या पोषाखावरून साधारण ही व्यक्ती किती फटाके घेईल याचे तर्क-वितर्क करून, अंदाज मांडून त्यानुसार फटाके दाखवायला लागलो. याबरोबर आम्ही गिऱ्हाइकांची संख्या वाढवण्यासाठीही बरेच प्रयत्न केले. खरेदीसाठी लोक भर दुपारच्या उन्हात न येता संध्याकाळी व रात्री जास्त यायचे, हे जाणून आम्ही त्यावेळेस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून विक्री करू लागलो. तसेच जास्त गर्दी असल्यास एकाच वेळी २-३ जणांनाही फटाके दाखवू लागलो.

प्रबोधिनीत स्नेहसंमेलन (Gathering) नावाची संकल्पना नाही. त्याऐवजी असते अभिव्यक्ती सादरीकरण. 'अभिव्यक्ती' या शब्दाचा अर्थच 'स्वत:ला अभिव्यक्त (express) करणे' असा आहे. प्रत्येकाने पेटी, तबला, गायन, नृत्य, नाट्य, शिल्पकला, चित्रकला व प्रतिभाशाली लेखन यांपैकी एक माध्यम अभिव्यक्तीसाठी निवडायचे असते आणि त्याचे सादरीकरण करायचे असते. खरे तर अभिव्यक्ती या संकल्पनेला सातवीपासूनच सुरुवात झाली; पण गेल्या वर्षी नववीत असताना जास्त गांभीर्याने याचा सराव व सादरीकरण झाले.

नववीत पूर्ण वर्षभर आम्ही सर्वजण आठवड्यातून एक तास आमच्या अभिव्यक्तीचा सराव करायचो. पेटी, तबला, गायन व नृत्य याशिवाय इतर अभिव्यक्तींचे एकत्र सादरीकरण करायचे असल्यामुळे सादरीकरणासाठी सर्वसमावेशक विषय निवडणे गरजेचे होते. अखेर विषय ठरला व कार्यक्रमाला नाव देण्यात आले 'संस्कृतीच्या खुणा.' वर्षभर सर्व अभिव्यक्ती गटांचा वेगवेगळा सराव होत असतो. कार्यक्रमाला एक स्वरूप देण्यासाठी व शोभा आणण्यासाठी एकत्र सराव होणे आवश्यक होते. म्हणून एप्रिल महिन्यात सुट्टी असूनही पहिले दोन आठवडे दररोज २ तास आम्ही सर्वजण एकत्र जमून सराव करीत होतो. खरंतर सुट्टीत दररोज शाळेत जायचे या विचारांनीच कंटाळा येत होता. परंतु जेव्हा प्रत्यक्ष सराव व त्यात

सुवर्णमहोत्सवी वाटचाल .. **१९९५** ..
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रारंभ, किशोरी विकास प्रकल्पास प्रारंभ, शिरवळ येथे नेत्र रुग्णालयास प्रारंभ

सुधारणा सुरू झाल्या तेव्हा मजा येऊ लागली. मार्गदर्शकांची कमीतकमी मदत घेत आम्ही ठरवलेले सर्व नीट बसवले. एक भारुड मात्र आम्हाला पुरेशा सरावाअभावी काढून टाकावे लागले. प्रशालेत चारच पेट्या चांगल्या स्थितीत होत्या. सर्वांना वाजवता यावे म्हणून ३-४ जणांनी स्वतःच्या घरच्या पेट्या दोन आठवडे शाळेत आणून ठेवल्या. नृत्य व नाट्य अभिव्यक्तीतील मुलांनी आपापली वेषभूषा ठरवून त्यानुसार सर्व कपडे इकडून तिकडून जमवून स्वतः आणले.

अखेर सादरीकरणाचा दिवस उजाडला. हा कार्यक्रम म्हणजे एक नाटकच होते. प्रतिभाशाली लेखनातील मुलांनी या नाटकाची संहिता लिहून नाट्याच्या गटाला दिली होती. या नाटकात चार मुले गडावर सहलीसाठी गेलेली असताना एका आजोबांच्या घरी राहतात व ते आजोबा त्यांना गाण्याचे, नृत्याचे विविध प्रकार (उदा. भारूड, भूपाळी, फटका इ.) ऐकवतात व त्याविषयी माहिती सांगतात अशी 'थीम' होती. पेटी, तबला, नृत्य व गायनाचा गट म्हणजे त्या आजोबांचा आर्केस्ट्राच होता. चित्रकलेतील मुले कार्यक्रम चालू असताना शेजारी त्या प्रसंगाचे चित्र रेखाटत होती व शिल्पकलेतील काही मुले sand art द्वारे या कार्यक्रमाची शोभा अजूनच वाढवत होती.

कार्यक्रम खूपच छान पार पडला. कार्यक्रमानंतर मा. प्राचार्य म्हणाले, ''गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदाच्या कार्यक्रमाचा दर्जा खूपच उंचावला आहे. अशीच प्रगती जर चालू राहिली तर पुढच्या काही वर्षांनी आपल्याला बालगंधर्व रंगमंदिरात मोठा कार्यक्रम करावा लागेल.'' हा कार्यक्रम सादर केल्यावरही परत एकदा एकीमध्ये किती बळ असते याचा प्रत्यय आला व खालील पद्याच्या ओळी आठवल्या -

*'निर्भयता बळ आस्था यांचे, एकी हे दैवत समजावे ।*
*जे जे वंचित त्यांच्यासाठी, संघटना हे सूत्र बनावे ॥'*

**- चि. प्रणव कुलकर्णी, चि. मयूर वाघ** (इ. दहावी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

# तंबू शिबिर - एक साहस उपक्रम

**कु. अपूर्वा कारंडे**

मी ज्ञान प्रबोधिनीच्या सोलापूर प्रशालेतली विद्यार्थिनी. ज्ञान प्रबोधिनी विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवते. विद्याव्रत संस्कार, समाजदर्शन प्रकल्प, अग्रणी योजना, कला - प्रकल्प शिबिरे, गिरिभ्रमण सहली, सहाध्याय दिन, प्रकल्प भेटी, वाचकवीर योजना इ. अशा काही आगळ्यावेगळ्या उपक्रमांप्रमाणेच दीर्घकाळ ठसा उमटवणारा एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे 'साहस शिबिर'. *'मन वज्र हवे अन् मनगट ते पोलाद'* हे विवेकानंदांचे वचन हेच या शिबिराचे उद्दिष्ट आहे. कितीही आघात झाले तरी मनाची खंबीरता ढळू नये व कितीही अवघड जोखीम स्वीकारण्यास सज्ज असे पोलादी मनगट तयार व्हावे, अशी या शिबिराची रचना आहे. हे शिबिर नववीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी घेण्यात येते. शिबिराची जागा असते ग्रामीण भागातल्या विस्तीर्ण माळावर! येथे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना सारख्याच प्रकारचे शिक्षण दिले जाते. त्यात कोणताही भेदभाव नसतो.

गेल्यावर्षी आम्हा नववीतील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी दि. २९-१२-२०११ ते २-१-२०१२ या कालावधीत सिंघण वस्ती, कुमठे येथे तंबू शिबिराचे आयोजन केले होते. मनात फार उत्सुकता होती; भीतीसुद्धा होती. सूचनांप्रमाणे सर्व सामानाची आवराआवर करून, आम्ही सायकल घेऊन प्रबोधिनीत आलो. आम्ही पहिल्यांदाच सायकलवर दहा कि.मी. अंतर पार करणार होतो. इथूनच आमच्या साहसाचा प्रारंभ झाला. मनात

सु व र्ण म हो .. १९९५ .. त्स वा ट चा ल
हराळी येथील शाळेला प्रारंभ,
ग्रामीण महिला बचत गटाच्या कामांना सुरुवात



**साहस! असेही**

काहीतरी करून दाखवण्याची खुमखुमी होती, त्यामुळे दहा कि.मी. चा प्रवास आम्ही आनंदाने पूर्ण केला. पहिला दिवस गावपाहाणी, ओळख यातच गेला. पण लक्षात राहिले ते गार्गीताई काळे यांचे प्रबोधनात्मक भारूड! समर्थांच्या *'आधी प्रपंच करावा नेटका'* या वचनाचा भावार्थ त्यांनी या भारुडातून मांडला होता.

दुसऱ्या दिवशी आम्हाला आमचे दररोजचे नियोजन व वेळापत्रक देण्यात आले. पहाटे ५.१५ वाजता उठणे, प्रातर्विधी, चेतना व्यायाम, उपासना, सकस आहार, साहस प्रशिक्षण, दल, फलाहार व नंतर विविध व्याख्यानांची-मनोरंजनाची सत्रे, जेवण, त्यानंतर स्वस्तिनिशा असे दररोजचे नियोजन होते.

साहस प्रशिक्षणात रॅपलिंग, रिव्हर क्रॉसिंग, बोथाटी, अश्वारोहण, साप पकडणे, दोन झाडांना बांधलेल्या उंच दोरीवरून उलटे लटकणे, नेमबाजी असे विविध आव्हानात्मक प्रकार होते. या सर्वांना वेळेची बंधने होती. परंतु शेवटच्या दिवशी भरपूर वेळ मनसोक्त अश्वारोहण केले. हे विविध प्रकार कठीण असले तरी निर्भय बनवणारे होते. साप म्हटल्यावर आधी भीती वाटली; पण सापाला कसे पकडायचे याचे तंत्र समजून घेतल्यावर हळूहळू त्याला हाताळणे सोपे जाते, हेही कळले. रिव्हर क्रॉसिंग व रॅपलिंगच्या वेळी विहिरीची खोली पाहून छातीत धडकी भरत असे. परंतु आत्मविश्वासाने आम्ही त्या सर्व प्रकारातील आव्हाने झेलली.

आम्ही सकाळी चेतना व्यायामानंतर उपासना करायचो. पहाटे उपासनेअगोदर आकाशाकडे सहज लक्ष जायचे तेव्हा सर्वत्र थोडा अंधारच असायचा. परंतु उपासना झाल्यावर डोळे उघडून आकाशाकडे पाहिल्यावर सूर्याचा विविधरंगी प्रकाश क्षितिजावर दिसायचा. झाडांमधून रंगांचा खेळ अतिशय सुंदर वाटायचा. पक्ष्यांचा मंजूळ किलबिलाट सुरू असायचा. असे दृश्य पाहताना,

*'पलिकडच्या त्या झाडावरती, कुणी सकाळी आला पक्षी।*
*खोदित बसला आकाशावर चार रंगांची एकच नक्षी ।।'*

या कवितेच्या ओळी मनात तरळून जायच्या,

शिबिरात विविध व्याख्याने व्हायची. या व्याख्यानांमध्ये मान्यवरांनी रामदास, दयानंद, विवेकानंद, अरविंद या प्रबोधिनीच्या पथकाधिपतींची चरित्रे कथन केली. या पथकाधिपतींमध्ये स्वविचारांवरील निष्ठा, देशप्रेम व ध्येयासक्ती समान असल्याचे आम्हाला जाणवले. यांशिवाय श्री. विजय स्वामी यांनी त्यांच्या अनुभवकथनातून अरुणाचल प्रदेशचे चित्र रेखाटले. कीर्तनकार अविकाका गोडबोले यांच्या कीर्तनातून आम्ही भक्तिरसाचा अनुभव घेतला. त्याचबरोबर या सर्व मान्यवरांसोबत प्रश्नोत्तरांच्या बौद्धिक चर्चा रंगल्या. आम्ही आमच्या सहकाऱ्यांसोबत 'विद्याव्रतस्मरण', 'राष्ट्रार्चन' या विषयांवरही गटचर्चा केल्या.

आमचे शिबिर हे ऐन हेमंत ऋतूत होतं. त्यामुळे सुरुवातीचे एक-दोन दिवस खूप थंडी वाजली. परंतु अशी थंडी अनुभवण्याची मजाही काही औरच होती! रात्रीच्या गर्द काळोखात चंद्र-चांदण्यांचा शुभ्र प्रकाश शिंपीत असताना आम्ही थंडीत कुडकुडत होतो, म्हणून वाटायचे,

*'थंडी गुलाबी उमलून आली या हेमंतात ।*
*चंद्र बिलोरी शिंपित होता रजताने रात ।।'*

प्रबोधिनी म्हणजे शिस्त आलीच. ती तर असायलाच हवी. सर्व वेळेवरच व्हावयास हवे, पहिल्या शिट्टीला गटश: चार रांगा करायच्या; याशिवाय गावबांधणीत फक्कीच्या साहाय्याने जी रस्त्याची आखणी केली होती त्या रस्त्यांवरूनच चालायचे, मध्येच घुसायचे नाही; दोन

सुवर्णमहोत्सवी वाटचाल ..१९९५..
बालकामगार प्रकल्प सोलापूर प्रारंभ, सोलापूर साक्षरता अभियानात मोलाचे कार्य, 'प्र'शिक्षक द्वैमासिक प्रारंभ



हा कोण ? जात कुठली ? खोडून छाप सारे ।
स्नेहार्द्र साद घालू साऱ्याच बांधवांना ।।

तंबूंच्या मधून न जाता पूर्ण वळसा घालूनच जायचे, नाहीतर दूरवर असलेल्या निलगिरीच्या झाडाला स्पर्श करून यायचे असे काही नियम आणि त्यासाठी ठरलेली शिक्षा होतीच. कोण कितीवेळा निलगिरीला शिवतोय आम्ही लक्ष ठेवून असायचो.

तंबू शिबिरात आम्हा मुलींचे चार गट होते. राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई, जिजामाता अशी गटांची नावे होती. तेथेच आम्ही राहत होतो. दररोज तंबूची स्वच्छता आम्ही करत होतो. कारण तेथे 'आकाशाचे पांघरूण व जमिनीचे अंथरूण' यांशिवाय तोच एक निवारा होता.

शिबिरात काही मजेशीर प्रसंगही घडले. 'आयत्यावेळची नाटके' या सत्रामध्ये प्रत्येक गटाला नाटकासाठी विषय दिले गेले. १० मिनिटांत तयारी करून नाटक सादर करण्याचा आम्ही चांगला प्रयत्न केला. शिवाजी महाराजांचे बालपण, सावित्रीबाईंच्या जीवनातील प्रसंग, स्त्री-भ्रूणहत्या असे सामाजिक व ऐतिहासिक विषय देण्यात आले होते. प्रत्यक्ष नाटकाच्या सादरीकरणाच्या वेळी आम्ही त्याचा पुरेपूर आनंद घेतला.

पदार्थ तयार करण्याच्या स्पर्धेत आम्हाला 'मसालेभात व वांग्याची भाजी' हे पदार्थ देण्यात आले. तेव्हा चुलीवर स्वयंपाक करण्याचा अनुभव घेतला. यामध्ये आमच्या 'सावित्रीबाई' गटाला प्रथम क्रमांक मिळाला. तसेच खजिनाशोध स्पर्धेत सर्वात कमी वेळेत म्हणजेच २५ मिनिटांत सर्वांत प्रथम आम्ही खजिना शोधला. तेथे झालेल्या क्रीडा सामन्यांमध्येही आम्हाला यश मिळाले.

येथे रक्षण करण्याची म्हणजेच गस्त घालण्याची तसेच पाणीव्यवस्थेची जबाबदारी दरदिवशी गटशः विभागून दिली होती. जेवण वाढण्याचे कामही क्रमशः विभागले होते. या व अशा अनेक कामांत आम्हाला सोबतच्या ताई-दादांनी, शिक्षिका, मावशी यांनी भरपूर मार्गदर्शन व मदतही केली.

असे विविध प्रकारच्या साहसाचे, लक्षात राहणारे व आत्मविश्वास वाढवणारे अनुभव पाठीशी घेऊन, निघण्याची तयारी व सायकलची दुरुस्ती करून दि. २-१-२०१२ रोजी दु. ४.१५ वाजता आम्ही परतीच्या प्रवासास सुरुवात केली. जाता जाता खूप काही मिळाल्याचे, खूप काही शिकल्याचे समाधान पाठीशी होते. मनात उमटत होते-

*'तो प्रवास सुंदर होता, आधार गतीला धरती ।*
*तेजोमय नक्षत्रांचे आश्वासन माथ्यावरती ।।'*

**– कु. अपूर्वा कारंडे,** (इ. दहावी)
ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर

## विक्रमी कृती करू चला दिगंत हालवू

**चि. ऋषिकेश काळे**

जुन्या मित्रांच्या आठवणी मनात ठेवून साशंक मनाने मी गुरुकुलात आलो. वेगवेगळ्या उपक्रमांची दिनचर्या आणि या दिनचर्येचे नियोजन यामुळे दररोजचा दिवस कसा जाई हे कळत नसे. पूर्वीच्या शाळेप्रमाणे एकामागोमाग एक विषयांचे फक्त तास इथे कधीच झाले नाहीत. गुरुकुलातील प्रत्येक उपक्रम माझ्या अनुभवांच्या शिदोरीत नित्य नवी भर घालत होता.

गुरुकुलातील सूर्यनमस्कार, उपासना, मौनाभ्यास, स्वयंअध्ययन हे मला नवीनच असलेले उपक्रम सुरुवातीस जड गेले. गुरुकुलातील मोठ्या दादांकडून मी राखी विक्री, सुकामेवा विक्री, मातृभूमी परिचय शिबिर, प्रकल्प, सायकल सहल इ. वार्षिक उपक्रमांविषयी ऐकत गेलो. गुरुकुलातील कोशांची रचना समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो.

गुरुकुलात मी सर्वप्रथम अनुभवलेला वार्षिक उपक्रम

सुवर्णमहोत्सवी वाटचाल ..१९९६..
डोंबिवली केंद्र सुरुवात, पवनामाई उत्सवास सुरुवात,
संयोजक प्रशिक्षण शिबिरांना प्रारंभ,



सायकल सहल

म्हणजे पावसाळी सहल. पावसाळी सहलीत धबधब्यांत मनसोक्त भिजण्याचा आनंद मिळाला. त्याचबरोबर मनोबल व सहनशक्ती वाढण्यास मदत झाली. राखी विक्री व सुकामेवा विक्री हे आमचे अतिशय आवडते उपक्रम. मुलांच्या विक्री कौशल्यात वाढ व्हावी व त्यांचा बाह्यसंपर्क वाढावा यासाठी या उपक्रमांची योजना केलेली आहे. आणखी एका उपक्रमाची वाट आम्ही वर्षाच्या सुरुवातीपासून पाहत असतो. तो उपक्रम म्हणजे मातृभूमी परिचय शिबिर. या उपक्रमाची योजना प्रत्येक इयत्तेसाठी वेगळी केली आहे. या उपक्रमातून अनुभवण्यास खूप काही मिळते. आतापर्यंत मी अलिबाग, निफाड, वर्धा, अंदमान या ठिकाणी शिबिराला गेलो, तेथील लोकांशी संवाद साधला. यातून आपल्या विशाल मातृभूमीचे एक वेगळे स्वरूप माझ्या लक्षात आले. निरनिराळे धर्म, पंथ, भाषा या सर्वांतून बनलेला भारत आम्हाला अनुभवण्यास मिळाला.

इ. सहावी पासून सायकल सहलीची जिज्ञासा मनात घर करून बसली होती. या सायकल सहलीत सहभागी होण्याची पहिली संधी मला मिळाली ती इयत्ता सातवीत. पुणे-अलिबाग-पुणे, पुणे-सातारा-पुणे अशा साधारण ३०० किमी च्या सायकल सहली करून माझा विश्वास अधिकाधिक उंचावू लागला. यापेक्षा अधिक अंतर पार करण्यासाठी मी आसुसलो. जणू काही देवाने माझी प्रार्थना ऐकली व इयत्ता नववीत ७५० किमी सायकल सहलीत सहभागी होण्याचा योग आला. उज्जैन ते पुणे अशी सायकल यात्रा होती. स्वत:ची सायकल असल्यामुळे दुसऱ्याची सायकल मिळवण्याचे कष्ट मला पडले नाहीत.

*विक्रमी कृती करू चला दिगंत हालवू,*
*तेज मायभूमीचे उभ्या जगास दाखवू !*

प्रबोधिनीमध्ये हे पद्य आम्ही कितीतरी वेळा ऐकलं - गायलं. पण त्या ओळींचा अर्थ समजला तो या सायकल सहलीतून. आमच्या शाळेत फक्त पद्य गायनच नाही, तर त्यातील अर्थानुसार वागायलाही शिकवतात, हे तेव्हा मला समजलं. या उक्तीला अनुसरून ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी केंद्रातील गुरुकुल विभागाची उज्जैन (मध्यप्रदेश) ते पुणे ही विक्रमी सायकल भ्रमण मोहीम पार पडली. उज्जैन ते पुणे असा ७५० कि.मी. आमचा सायकल प्रवास २२ ते ३१ डिसेंबर २०११ या दिवसांमध्ये होणार होता. या मोहिमेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून सुमारे ९१ सायकलस्वार सहभागी झाले होते. आमचा प्रवास उज्जैन, इंदौर, धामनाद, शिरपूर, मालेगाव, राहता, अहमदनगर, राळेगणसिद्धी, पिंपरी-चिंचवड असा होणार होता. 'क्रीडा भारती' ही संस्था या मोहिमेची आयोजक होती.

पहिल्याच दिवशी सायकलवर ६० कि.मी.चे अंतर पार करतानाही सर्वांनाच थोडे कष्ट पडले. मग मात्र दिवसाला १२० कि.मी.चे अंतरही आम्ही पार करू शकलो. अधिक उत्साहाने सायकल चालवू लागलो.

शाळेमुळे पहिल्या सायकल सहलींचा अनुभव असल्यामुळे आम्ही सर्व सायकलपटूंमध्ये अग्रेसर होतो. कोणी पुढे जात असल्यास ही सहल 'सहल' न राहता स्पर्धा होत असे. पहिल्याच दिवशी आम्ही आमच्या गटापासून पुढे असल्यामुळे रस्ता चुकलो व आमच्या दुपारच्या विश्रांतीच्या ठिकाणापासून खूप पुढे गेलो.

महाराष्ट्रापासून दूर असलो तरी 'सारे भारतीय माझे बांधव आहेत' या वाक्याची आम्हाला प्रचीती आली. गावोगावी झालेल्या उत्स्फूर्त स्वागताने, सहलीत झालेल्या गाठीभेटींनी, आणि कितीतरी प्रकारच्या अनुभवांनी, ही सहल माझ्या कायमच लक्षात राहील.

सु व र्ण म हो.. १९९७.. ी वा ट चा ल

'संवादिनी' प्रारंभ, समतोल द्वैमासिक प्रारंभ,
'रूप पालटू शिक्षणाचे' शिबिरांना सुरुवात



सुपुत्र बनलो आज आईचे तोडुन फसवी नाती ।
स्वर्गसुखाची हसतच देऊ तिजसाठी आहुती ।।

या सहलीतून माझा बाह्यसंपर्क वाढला, परिस्थितीशी मिळते जुळते घेणे मी या सहलीतून शिकलो. ध्येयनिश्चिती करणे आणि ते ध्येय तडीस नेण्यासाठी सर्व प्रयत्न करणे, हे देखील मी या मोहिमेतून शिकलो. या सायकल सहलीतून मला काय मिळालं असा विचार करताना मला जाणवलं की आमच्या शाळेने पुस्तकाच्या बाहेर बघायला शिकवलं. कदाचित पुस्तक आणि पेपरमध्ये वाचून जे मला कळलं नसतं ते जग आम्हाला वाचायला शिकवलं. आणि त्यासोबत शाळेने पराक्रम करायची खूप चांगली सवय आम्हाला लहान वयातच लावली ! अशाप्रकारे ही मोहीम आम्हा विद्यार्थ्यांच्या विकसनासाठी महत्त्वपूर्ण ठरली !

**चि. ऋषिकेश काळे** (इ. दहावी)
गुरुकुल, ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, पुणे - ४४

---

# पवनामाई उत्सव

**कु. प्रतीक्षा खेंगरे, कु. प्रियांका राक्षे, कु. प्राजक्ता पवार, कु. ऋतुजा विघाटे**

मावळवासीयांना व मावळातील शेतकऱ्यांना पाणी देऊन सुखवणारी, नेहमी शेतीची हिरवळ टिकवून ठेवणारी, त्याचप्रमाणे तहानलेल्यांची तहान भागवणारी, शांत व नेहमी खळखळ आवाज करत वाहणारी आमची पवनामाई ! डोंगरदऱ्यांतून वाहत आलेली एक छोटीशी पावनधारा पुढे आमच्या मावळात पुण्यगंगा ठरली. आसपासच्या परिसरातील खेडी पवनेच्या काठी स्थिरावलेली आहेत. पवनानदीच्या पाण्यावर येथे बाराही महिने शेती केली जाते.

परंतु नदीच्या काठावर जेवढे कुक्कुटपालन करणारे व्यावसायिक आहेत ते सगळे मेलेल्या कोंबड्या, सांडपाणी जसेच्या तसे पाण्यात सोडून देत असत. पेपरमिल व इतर कारखान्यांचे संस्करण न केलेले पाणी मळीसहित नदीत सोडून दिले जात असे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोगराई पसरे. बरेच लोक आजारी पडत असत. याला निर्बंध घालणे आवश्यक होते. पवनामाई नेहमी स्वच्छ राहावी म्हणून आमच्या ग्रामप्रबोधिनी विद्यालयामार्फत (साळुंब्रे) प्रयत्नांना सुरुवात झाली आणि आज हाच प्रयत्न 'पवनामाई उत्सव' म्हणून घराघरांत पोचवण्यात शाळेला यश आले आहे.

*'पवनामाई माझी माता, मीच तिचा रक्षणकर्ता'* या घोषणेने पवनामाई उत्सवाची सुरुवात १९९४ मध्ये झाली.

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९९७ ..
'गुरुकुल' शैक्षणिक प्रकल्प प्रारंभ,
प्रबोधिनी परिचय सहलींची सुरुवात



पवना नदीत दिवे सोडताना

अभ्यासक्रमाचे शिक्षण घेताना आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांविषयीसुद्धा आपण जागरूक आणि संवेदनशील असायला हवे, हे यानिमित्ताने आम्ही शिकत आहोत.

पाणी शुद्धीकरणासाठी पवनामाईचा उत्सव सुरू करण्यात आला. पवनानदी ही केवळ नदी नसून आपले दैवत आहे. ही भावना लोकांच्या मनात निर्माण केली गेली. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषदेच्या शाळा यांच्या सहकार्याने *'पर्यावरण राखा-पाणी प्रदूषण टाळा'* अशी घोषवाक्ये घरा-घरातून पोहोचवली. जिथे पवनानदी वाहते, त्या प्रत्येक गावात पवनामाईच्या उत्सवाला सुरुवात झाली. त्यामुळे पर्यावरण

आणि पाणी प्रदूषणाचे धडे लोकांना अनौपचारिकरित्या दिले जाऊ लागले.

ज्या ज्या ठिकाणी पवनामाई उत्सव साजरा होतो त्या ठिकाणी विद्यार्थ्यांचा पुरेपूर सहभाग असतो. यावर्षीही आम्ही या उत्सवासाठी जय्यत तयारी केली होती. आम्ही विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन पत्रके वाटली. ग्रामस्थांना पवनामाईचे व पाण्याचे मोल समजावून सांगितले. ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांना भेटलो. पवनामाईच्या प्रदूषणाविषयीची आम्ही घोषवाक्ये तयार केली. काळे कॉलनी, शिवली, शिवणे, बौर, आढले, ऊर्से, युगाव, बेबड ओहळ, साळुंब्रे, गहुंजे, गोडुंब्रे या गावातील ग्रामस्थ तसेच मोरया गोसावी घाट, आसपासच्या शाळांमधील विद्यार्थी, पालक यांना सहभागी करून घेतले.

पवनामाईच्या पाण्याचे कलश पालखीत ठेवून उत्सवादरम्यान त्याची मिरवणूक काढतात. नदीच्या काठावर जाऊन हळदी-कुंकू वाहून जमलेले सर्व ग्रामस्थ, महिला आरती म्हणतात. कणकेचे दिवे नदी पात्रात सोडून खणा-नारळाने ओटी भरून, नदीचे पाणी शुद्ध राखण्याची प्रतिज्ञा घेतात. अशा रीतीने पवनामाई उत्सव एक समाजप्रबोधनाचे व्यासपीठ बनले आहे. पवनामाईची स्वच्छता राखणे, काळजी घेणे प्रत्येकाचेच कर्तव्य आहे, हे हळूहळू कळू लागले आहे.

उत्सवादरम्यान एक समाधान मनाला स्पर्शून जाते. 'एक वेळ आपण पैसा उसना घेऊ शकतो; पण पाणी उसने घेऊच शकत नाही, हे कळते. पाणी आतापासूनच स्वच्छ ठेवले नाही तर त्याचे परिणाम वाईट होतील, ही जाणीव अजूनच स्पष्ट व्हायला उत्सवामुळे मदत होते.

पवनामाईच्या पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी जलदिंडी सुरू झाली. जलदिंडी म्हणजे नदीचा अभ्यास बोटीने प्रवास करून करायचा. पुढे पुढे जाऊन ही जलदिंडी लोकांना पाण्याचे महत्त्व पटवून देते.

मावळ तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा आणि वेगवेगळे गट आता एकत्र येऊन पवनामाई उत्सव साजरा करतात. या सगळ्यांच्या सहभागाने या उत्सवाला मोठे जनसागराचे स्वरूप लाभत आहे. या उत्सवाचा आम्हाला खूप अभिमान आहे आणि शाळेनंतरही आम्ही यात नक्की सहभागी होत राहू. आम्ही शाळेत शेती, तंत्रज्ञान, पशुपालन इत्यादी विषयांमध्ये वेगवेगळे प्रकल्प करतो. खेळ, बर्चीनृत्य, पोवाडा गायन यांबरोबरच अभ्यासिका, प्रयोगशाळा यांचाही आम्हाला खूप उपयोग होतो. पुस्तकांचा अभ्यास करून गुण मिळाले तरी अशा उपक्रमांमुळे होणाऱ्या संस्कारांनी वेगळंच काही शिकल्याचा आनंद मिळतो. आम्ही हा आनंद सध्या घेत आहोत.

**– कु. प्रतीक्षा खेंगरे, कु. प्रियांका राक्षे,**
**कु. प्राजक्ता पवार, कु. ऋतुजा विघाटे**
इ. नववी, ग्राम प्रबोधिनी - साळुंब्रे

---

## मला भावलेले अभियान

**चि. प्रतीक शरगार**

आमची शाळा म्हणजे ज्ञान प्रबोधिनीची हराळी येथील प्रशाला. ही शाळा नसून शिखर आणि कळस असलेलं मंदिर आहे, असं पहिल्यांदा वाटलं. मंदिरासारख्या दिसणाऱ्या या शाळेत बरंच काही वेगळं आहे, हे सहावीतल्या पहिल्या दिवसापासूनच जाणवायला लागलं.

शाळेतील प्रात्यक्षिके, गणेशोत्सव, वेगवेगळे सामने हे सर्व अनुभव अविस्मरणीय आहेत. अनेक मुलं, मुली साहस शिबिरात आगीतून उड्या मारताना जाम भारी वाटतं!

दरवर्षीप्रमाणे इ. सातवीत शाळेने अभियान करण्याचा निर्णय घेतला. त्याची सुरुवात दिवाळी नंतरच्या साहस शिबिरापासून झाली. एखाद्या

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९९८ ..
'क्रीडाकुल' प्रारंभ, बोरिवली केंद्र सुरुवात,
I-am अभिक्षमता मापन सीडीचे प्रकाशन



प्रबोधनाचे गीत आज हे मुक्त स्वरांनी गाऊ ।
पिढ्यापिढ्यांची दृढ चाकोरी ओलांडुनिया जाऊ ॥

महापुरुषाची माहिती, महती साऱ्या गावाला कळावी हा या अभियानामागचा मुख्य हेतू असतो. एखाद्या संताच्या, आदर्श व्यक्तीच्या जीवनचरित्रावर आधारित नाटुकले रचले जाते आणि ते गावागावांमधून या अभियानाअंतर्गत सादर केले जाते.

त्यावर्षी मा. लताताईंनी 'तुकडोजी महाराजांचे जीवनचरित्र' यावर अभियान बसविण्यास सांगितले होते. त्यात मला पाटलाच्या सोबतीचे पात्र मिळाले होते.

तुकडोजी महाराजांच्या लहानपणापासून नाटुकल्याची सुरुवात होती. घरातील वस्तू दान केल्यामुळे वडील तुकडोजींना व त्यांच्या आईला घरातून बाहेर काढतात. तेव्हा ते आजोळी जातात. तेथे तुकडोजी महाराजांना गुरू भेटतात. तेथून त्यांना शिक्षण मिळण्यास प्रारंभ होतो. गुरूंच्या निधनानंतर ते स्वत: कार्यभाग सांभाळतात. देशभर प्रचार करतात. त्यात अनेकवेळा ते तुरुंगातही जाऊन येतात. त्यातच गांधीजींची भेट होते. त्यातून त्यांना गांधीजींच्या साधेपणाविषयी माहिती कळते. तुकडोजी स्वत: त्यावेळी रेशमी कपड्यात होते. त्याप्रसंगापासून तेसुद्धा खादीचा स्वीकार करतात. अशा वेगवेगळ्या प्रसंगांतून, अभंगातून त्यांचे जीवनचरित्र उलगडत जाते.

शेवटी ते गावच्या पाटलाबरोबर मिळून गाव व्यसनमुक्त करतात आणि शेवटी समारोप होतो. रंगीत तालमीमुळे मला थोडासा इतरांपेक्षा जास्त अनुभव मिळाला होता. त्यात वेशभूषेसाठी झालेली पळापळ अजूनही मला आठवते. तेव्हा मला समजले की, कोणतीही गोष्ट वेळेत आणि नियोजनपूर्वक करावी.

अखेर ५ फेब्रुवारीला सादरीकरणाचा दिवस उजाडला. हा कार्यक्रम म्हणजे एक नाटकच होते. त्यादिवशी शिस्तीने आपापल्या गटाने ठरलेल्या गावी जाऊन सादरीकरण केले. कार्यक्रमाचा आनंद घेऊन आम्ही परतलो.

त्याच दिवशी माझा वाढदिवस होता. सर्वांची



**समाजदर्शन अभियान**


गडबड सकाळपासूनच चालू होती. प्रत्येकजण आपापल्या धुंदीत होता. मला त्या दिवशी वाढदिवसाच्या आनंदाबरोबरच एक वेगळा अनुभव मिळाला. लहानपणापासून कधीच असल्या प्रकारचा अनुभव मला मिळाला नव्हता. त्या दिवशी मी अभियानातून नेतृत्व करणे, वेगवेगळ्या भूमिका निभावणे यांसारख्या अनेक गोष्टी शिकलो.

प्रबोधिनीत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव दिला जातो, असे म्हटले जाते. त्यादिवशी खरोखरच विद्यार्थ्यांच्या विविधगुणदर्शनाचा कार्यक्रम झाला. योग्य नियोजन आणि शिस्तबद्ध कार्यक्रम, पूर्वतयारी, सराव या बळावर आम्ही कार्य सिद्धीस नेऊ शकलो याचे समाधान वाटते.

शाळेच्या परिसरात असलेली ५० एकराची फळशेती ही आमची खरी श्रीमंती. कधीकधी फळे तोडायला, ती निवडून खोक्यात भरायला, त्यापासून वेगवेगळे पदार्थ तयार करण्यासही आम्ही मदत करतो; त्यातूनही खूप शिकायला मिळतं. वेगवेगळ्या गावातल्या गणपतींसमोर बर्ची नृत्य करताना तर खूपच मजा येते. अनेकजण आमचं कौतुक करतात, तेव्हा खूप छान वाटतं. अशा अजून खूप गोष्टी आमच्या शाळेत होतात ज्या इतर कुठल्याही शाळेत होत नाहीत. म्हणूनच या शाळेचा मला खूप अभिमान वाटतो.

- **चि. प्रतीक शशिकांत शरगार** (इ. दहावी)
ज्ञान प्रबोधिनी, हराळी
डाक तोरंबा, ता.लोहार, जि. उस्मानाबाद

सुवर्ण महोत्सवी वाटचाल ..१९९८..
ग्रामीण महिलांची दिल्ली सहल,
महाराष्ट्रात १० ठिकाणी उपक्रम केंद्रे सुरू



## जगण्याचे आंदण हे

ज्ञानाचे, विद्येचे, प्रज्ञेचे मंदिर हे
कार्याचे, शौर्याचे, धैर्याचे अंबर हे
सत्याचा शिव-सुंदर धर्माचा केतू हा
श्रद्धेचा, निष्ठेचा, आस्थेचा सेतू हा
बोधन हे, रंजन हे, ज्ञानाचे अंजन हे
संशोधन, संपादन, संवेदन-वर्धन हे
मस्तीचा, शिस्तीचा, स्वास्थ्याचा खेळ खास
दृष्टीचा, सृष्टीचा, कष्टांचा मेळ खास
प्रेयाला, श्रेयाला, ध्येयाला पैस मिळे
व्यक्तीचे, शक्तीचे, युक्तीशी सूत जुळे
देशाचे, भाषेचे, वेषाचे अभिमानी
तर्कनिष्ठ, बुद्धिनिष्ठ, कर्मनिष्ठ सेनानी
जनतेचे, समुहाचे प्रश्न पहा लक्ष लक्ष
तन-मन-धन अर्पण्यास सज्ज अम्ही दक्ष दक्ष
प्रश्नाचे मूल काय, न्यून काय, पेच पडे
पर्यायी पथ कुठला, अन् विकल्प ठेवु पुढे
हे अशक्य, हे असाध्य, कठिण असे शब्द त्याज्य
जिद्दीने सिद्ध-साध्य, अन् उत्तर होय सज्ज
ही केवळ नच शाळा जगण्याचे आंदण हे
माणूसपण जागवण्या अग्रेसर प्रांगण हे...

**- आश्लेषा महाजन**
मंजिरी, २३०, चित्ररेखा सोसायटी,
सहकारनगर - १, पुणे 411009

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. १९९८ ..
दिल्ली येथील बुद्धिमत्तेसंबंधीच्या
आंतरराष्ट्रीय परिसंवादात महत्त्वपूर्ण सहभाग



अन्न, प्राण अन् मन - विज्ञाने, आनंदाने नटलेले ।
शुद्ध असावे पंचकोष हे, निर्मळात जे वसलेले ।।



# प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया

**प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रबोधिनीच्या शाळेमध्येच यायला हवं, अशी गरज नाही इतका शाळांव्यतिरिक्तच्या उपक्रमांचा–प्रकल्पांचा आपला पसारा वाढत आहे. युवक–युवती विभागांची दले, गणेशोत्सव, विक्री उपक्रम, बाल विकास व क्षमता संवर्धन शिबिरे, छात्र प्रबोधन–मासिक–स्पर्धा–सहली, किशोरी विकास व ग्रामीण प्रज्ञा विकास उपक्रम, शिबिरे, कार्यशाळा, विकासिका, उपासना केंद्रे, विद्याव्रत संस्कार, विविध प्रकारची व्याख्याने अशा प्रासंगिक व नियमित चालणाऱ्या कितीतरी उपक्रमांमधून प्रबोधिनीच्या शिक्षणाची कितीतरी दालनं तुमच्यासाठी खुली आहेत. अशा वेगवेगळ्या दालनांमधून आत आलेल्या अन् नंतर प्रबोधिनीच्या कार्यात मिसळून गेलेल्या काही युवक–युवतींची वाटचाल प्रातिनिधिक रूपाने तुम्ही पुढे वाचाल. त्यातून तुम्हालाही प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेत सहभागी होण्याची प्रेरणा मिळेल असा विश्वास वाटतो.**

---

## सगळ्यांना आपलंसं करणारी प्रबोधिनी

**मृणाल जोशी**

अनेक वर्षं मला गणेशोत्सवात ढोल वाजवण्याची इच्छा होती; पण काही ना काही कारणांनी दर वर्षी ते राहत होतं. पण २०११ मध्ये मी ठरवून चौकशीला सुरुवात केली. 'ज्ञान प्रबोधिनी'च्या पथकाचं नाव खूप ऐकलं होतं. इतरही ढोलपथकं असताना मला इथेच यावंसं वाटलं, त्याचं कारण म्हणजे ज्ञान प्रबोधिनी म्हटल्यावर गुणवत्ता लगेचच डोळ्यासमोर येते. शिवाय मुलींचं सगळ्यात पहिलं आणि जुनं पथक हेच. जसं ऐकलं होतं तसंच अगदी पहिल्या दिवसापासूनच आमच्या प्रमुखांनी दर्जात्मक सराव करून घेण्यावर भर दिला. त्यामुळे सुरुवातीपासूनच शिस्तबद्ध व गुणवत्तापूर्ण वाजवायची व सराव करायची सवय लागली.

सुवर्ण महोत्सवी वाटचाल ..१९९९..
ओरिसा वादळ मदतकार्य, अंबाजोगाई केंद्रास प्रारंभ,
बुरूड समाजात सामुदायिक विवाह संस्कार

गणेशोत्सवाच्या निमित्ताने माझी प्रबोधिनीशी ओळख झाली; पण ही फक्त तोंडओळख होती. खरी ओळख हळूहळू होत गेली. सुरुवातीला मला ढोल वाजवायला जमेल का अशी शंका होती; पण सगळ्याच प्रमुखांनी माझी अगदी व्यवस्थित तयारी करून घेतली. त्यादरम्यान प्रबोधिनी समजत गेली. अगदी सुरुवातीला अनेक जणींची मी तक्रार ऐकत होते; की प्रबोधिनीत फारच शिस्तीने सगळं करावं लागतं, शिस्तीनेच वाजवावं लागतं; मग मजा कशी येणार वगैरे. पण खरं तर मला हीच शिस्त प्रबोधिनीच्या नावाची आणि गुणवत्तेची खरी ओळख आहे, असं वाटतं. मला ही शिस्त कधीच जास्त किंवा लादलेली अशी वाटली नाही. उलट या शिस्तीमुळेच आमचा सगळा गट 'भारी' झाला आणि चांगलं वाजवू शकला. ढोल पथकाची योग्य ती गुणवत्ता राखू शकला.

गणेशोत्सव अगदी शेवटच्या टप्प्यावर असताना आता



**युवती विभागाचा वाद्यवृंद**

गणेशोत्सव संपल्यावर पुढे काय असा प्रश्न मनात आला. अनेक वर्षं एक चांगली शाळा व त्याचबरोबर एक उत्तम संस्था म्हणून ज्ञान प्रबोधिनीचं नाव ऐकतच होते. गणेशोत्सवाच्या निमित्ताने इथे आल्यानंतर इथल्या अनेक उपक्रमांबद्दल माहिती मिळाली. चांगली शाळा चालवण्यापलीकडे इतरही अनेक चांगले विचार जसे राष्ट्रसेवा, समाजसेवा इथे मनात रुजवले जातात. अशा प्रबोधिनीत काहीतरी काम करायला मला नक्कीच आवडेल व त्यातून खूप काही शिकायला मिळेल, असं प्रकर्षानं वाटू लागलं.

'मला प्रबोधिनीत काहीतरी करायचंय' ही इच्छा मी प्रबोधिनीच्या युवती विभागात रोज येणाऱ्या मैत्रिणींना बोलून दाखवली. अर्थात माझ्या इच्छेचं स्वागतच झालं. माणसं जोडणं हे प्रबोधिनीचं वैशिष्ट्यच आहे. लगेचच माझ्यावर महाविद्यालयीन गटाचे क्रीडादल सुरू करायची आणि वस्तीमध्ये मुलींना बर्च्या शिकवून गट तयार करायची जबाबदारी सोपवली गेली. ज्या बर्च्या मला जमणार नाहीत असं वाटत होतं, त्याच मी शिकवल्या आणि वडारवाडी या वस्तीमधल्या मुलींच्या बर्च्यांची मिरवणूकही झाली. ही कुठल्याही वस्तीतली पहिलीच मिरवणूक होती. यामुळे माझा आत्मविश्वास खूप वाढला आणि मीही बर्च्या करू शकते, एवढंच नाही तर शिकवूही शकते हे लक्षात आलं. हा एक वेगळाच अनुभव होता. यानंतर मी वस्त्यांमध्ये इतर कामही केलं. याचप्रमाणे तिळगूळ विक्री उपक्रम, क्रीडा शिबिर यांमध्ये मी सहभागी झाले. तसंच पद्यगायन या कार्यक्रमाची प्रमुख होण्याची संधीही मला मिळाली.

ज्ञान प्रबोधिनीत पद्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रबोधिनीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त पद्य गायनाचा जाहीर असा मोठा हा पहिलाच कार्यक्रम होणार होता. कार्यक्रमाची प्रमुख म्हणून मला जबाबदारी देऊन सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवला, ही नक्कीच माझा आत्मविश्वास वाढवणारी गोष्ट होती. प्रबोधिनीची माहिती असलेल्या, प्रशालेत शिकलेल्या आणि माझ्याहून जास्त पद्य गाता येणाऱ्या अनेक जणी विभागात होत्या. तरीसुद्धा विश्वासाने ही जबाबदारी मला दिली गेली. पद्य ठरवण्यापासून गटाला एकत्र करणे, सराव करून घेणे, कार्यक्रमाच्या इतर व्यवस्था पाहणे, हे नक्कीच आव्हानात्मक होते. भरपूर जणांना या कार्यक्रमाचं निमंत्रण दिलं होतं. यातले अनेक सदस्य तर मला माहीतही नव्हते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रबोधिनीचा संपर्क किती लोकांशी आहे, हे जाणवलं. या मोठ्या संस्थेचा मी छोटासा का होईना पण एक भाग आहे, हे जाणवलं आणि या विचाराने मोठा दिलासा मिळाला. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या वेळी ती पद्यं गाताना येणारा अनुभव विलक्षण होता. प्रत्येक पद्याने भारावल्यासारखं वाटत होतं आणि भरपूर काम करण्याची प्रेरणाच जणू त्यातून मिळत होती...

*'नव्या युगाचे पाईक आम्ही तारे नवक्षितिजावरचे*
*निजरुधिराची आण वाहूनी रूप पालटू देशाचे'*

...असं म्हणताना वेगळंच स्फुरण चढत होतं. या कार्यक्रमामुळे प्रबोधिनी अजूनच जवळची झाली.

'प्रतिज्ञाग्रहण' हाही माझ्या आयुष्यातला खरोखर महत्त्वाचा टप्पा आहे असं मला वाटतं. प्रबोधिनीत आल्यापासून प्रतिज्ञाग्रहणाबद्दल काही दिवस ऐकत होते. पण ते नक्की काय असतं हे कळलं नव्हतं. समाजसेवा करायची इच्छा प्रत्येकाला असते; पण म्हणजे नक्की

सुवर्णमहोत्सवी वाटचाल .. १९९९ ..
ग्रामीण स्त्री शक्ती प्रबोधन प्रकल्प प्रारंभ, सोलापूर वास्तू कलशारोपण समारंभ, कारगील अभ्यास दौरा



गुरुतेचे आकर्षण भेदून, नीलनभी लीलेने विहरून ।
स्वर्गंगेतील कमळे खुडुनी नटवू भारतभूला ।।

काय करायचं आणि त्याच्याशी बांधील कसं राहायचं, हे प्रतिज्ञाग्रहणातून समजलं. पहिल्या प्रतिज्ञेचा अर्थ कळल्यावर लगेचच ती प्रतिज्ञा घ्यायचा निर्णय मनात पक्का केला. याविषयी संचालकांना पत्र लिहिलं व परवानगी मागितली. त्यांची संमती मिळाल्यावर विचार आणखीनच दृढ झाला. त्यासंदर्भात काही वाचनही झालं. १ एप्रिल २०१२ या दिवशी 'मी आजन्म राष्ट्रसेवा करीन' अशी प्रथम प्रतिज्ञा घेतली. प्रतिज्ञा घेण्याचा व घेतल्यानंतर खरंच आपण समाजाशी बांधील आहोत व आता जबाबदारी आणखीनच वाढली आहे याची जाणीव झाली.

मागच्या वर्षीच्या गणेशोत्सवात प्रबोधिनीशी जोडले गेले आणि वर्षभर मी विविध उपक्रमात सहभागी होत राहिले. वैयक्तिक पातळीवरही मला अनेक अनुभव आले. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे इथे येऊन मी संघटनेत एकत्रितपणे काम करायला शिकले. गट तयार करून त्या गटाकडून उत्तम काम करून घेणं हेही शिकले. जवळजवळ वर्षभरातच प्रबोधिनीने मला खूप काही दिलं, शिकवलं. अजूनही बऱ्याच गोष्टी शिकायच्या आहेत व अनुभवायच्या आहेत. इथे आल्यावर एक गोष्ट खूप प्रकर्षाने जाणवली, प्रबोधिनीत येण्यासाठी आणि प्रबोधिनी आपली वाटण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीच्या शाळेचे विद्यार्थी असणं हा एकच पर्याय नाहीये, इतर अनेक उपक्रमांमधून तुम्ही इथे येऊ शकता. गंमत म्हणजे तुम्हाला कळायच्या आधीच प्रबोधिनीने तुम्हाला आपलंसं केलेलं असतं. मी सुद्धा कधी आणि कशी प्रबोधिनीशी एकरूप झाले हे कळलंच नाही.

**– मृणाल जोशी**
mrunaljoshi8@gmail.com
(युवती विभागातील विविध उपक्रमांत कार्यरत)

# कर्तृत्वाला संधी

**निखिल धारवाडकर**

आठवीत शिकत असताना एके दिवशी वर्गामध्ये सुरवार-झब्बा घातलेले दोन जण आले आणि मुलांसाठीच्या एका अभिनव मासिकाची 'छात्र प्रबोधन'ची माहिती सांगितली. दोन दिवसांत पैसे देऊन नोंदणी करणाऱ्यांना २५१ वर्षांचे कॅलेंडर मिळेल असेही सांगण्यात आले. २५१ वर्षांचे कॅलेंडर असू शकते, हे तेव्हा प्रथमच समजले व ते कसे असेल याचे आकर्षणही वाटू लागले. दुसऱ्या दिवशी घरून येताना मासिकासाठीची चाळीस रु. वर्गणी घेऊन यायचेच विसरलो. आपल्याला आता हे कॅलेंडर मिळणार नाही असे वाटू लागले. मग वर्गातील चार जणांकडून थोडे थोडे करत चाळीस रुपये 'उद्या परत देईन' या बोलीवर घेऊन मासिकासाठी नावनोंदणी केली. आणि मग 'छात्र प्रबोधन' मासिक दर महिन्याला घरी येऊ लागले आणि त्यातील वैविध्यपूर्ण लेखांचे वाचन सुरू झाले. (आणि अर्थातच 'ते' कॅलेंडरही मिळाले!)

त्याच वर्षीच्या एप्रिल महिन्याच्या अंकात उन्हाळी सुट्टीत मुलांसाठीच्या वासंतिक शिबिरांचे आयोजन महाराष्ट्रातील अनेक गावांत करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यामुळे या शिबिरांविषयी उत्सुकता होती. तोपर्यंत मी कधीही कुठल्याही शिबिराला गेलो नव्हतो. त्यामुळे कुतूहलाने या शिबिरासाठी नाव नोंदवले. शिबिरात गेल्यावर साधारण आमच्यापेक्षा दोनच वर्षे मोठे असलेले दादा आमचे उपक्रम घेत होते. बेसबॉल हा खेळ या शिबिरात पहिल्यांदाच खेळायला मिळाला. वेगवेगळ्या खेळांबरोबरच गटकार्य, बौद्धिक कौशल्यांवरची सत्रं, हस्तकौशल्यं वगैरे अनेक गोष्टी होत्या. या शिबिरामुळे प्रबोधिनीची ओळख झाली.

दहावीत असताना नेतृत्व प्रशिक्षण शिबिराला पुण्यात आलो होतो. नंतर लगेच लातूरला शिबिर घ्यायला पाच

सु व र्ण म हो त्स वी वा ट चा ल
..२०००..
ग्रामीण महिला मूलभूत आरोग्य प्रकल्प प्रारंभ



**कामाच्या ठिकाणी पाहणी करताना**

जणं गेलो. तिथे गेल्यावर कळलं की दोनच जणांची नोंदणी झाली आहे. मग लातूरभर फिरून दोन दिवसांत ४५ जणांचा गट शिबिरासाठी आम्ही उभा करू शकलो. त्यानंतर आठ दिवसांचे शिबिर झाले. दादा म्हणून हे शिबिर घेताना मला स्वत:ला सुद्धा खूप शिकायला मिळाले आणि प्रबोधिनीशी जवळीक निर्माण झाली.

या शिबिरातून प्रेरणा घेऊन नंतर सांगलीमध्ये परत जाऊन आम्ही चार जणांनी मुलांसाठी दल सुरू केले आणि सांगलीत सातत्याने काही उपक्रम सुरू झाले. कॉलेजमध्ये स्वत:चा अभ्यास करत शालेय वयोगटातील मुलांसाठी वेगवेगळे उपक्रम आम्ही घेत होतो. उपक्रमांच्या निमित्ताने आम्हा समवयीन मित्रांचा गट नियमित एकत्र भेटत असे. अकरावीत असताना आम्ही सर्वांनी वेगवेगळे संकल्प केले. कुणी परीक्षेत ५% गुण वाढवेन असा, कुणी वर्षभरात पाच हजार पाने अवांतर वाचेन असा तर कुणी नियमित उपासना करेन असा. आम्ही चार-पाच जणांनी मिळून २०,००० कि.मी. सायकलिंग वर्षभरात करण्याचा संकल्प केला. अनेक गावांना सायकलवरून जात असताना शारीरिक क्षमता तपासून त्या वाढवता आल्या. इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असताना आम्ही महाराष्ट्रातील बऱ्याच किल्ल्यांवर ट्रेकिंगसाठी जायचो. ट्रेकिंग करताना ग्रामीण भागाची ओळख झाली व खेड्यांमध्ये असलेली माणसांमधील आपुलकी अनुभवता आली. ग्रामीण भागांतील मुक्कामादरम्यान मिळणाऱ्या ग्रामस्थांच्या निर्व्याज प्रेमाची परतफेड कशानेही होऊ शकणार नाही, याची जाणीव मनात राहिल्यानेच पुढे प्रबोधिनीत पूर्ण वेळ काम करताना ग्रामीण भागात काम करण्याची प्रेरणा मिळाली.

सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केल्यावर प्रबोधिनीतील ग्राम विकसन विभागात पूर्ण वेळ काम करण्याचे ठरवले. घेतलेल्या शिक्षणाचा प्रत्यक्ष वापर करण्याची पहिली संधी मिळाली आणि पुण्यातील वेल्हे तालुक्यात पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाचे काम करण्यासाठी दाखल झालो. खरं तर मी शहरात वाढलेला आणि शिक्षणही शहरात घेतले होते. ग्रामीण भागात दीर्घकाळ राहण्याची ही पहिलीच वेळ होती. पहिले पाच-सहा महिने खेड्यातील राहणीमान, लोकांची मनोवृत्ती, विचार इत्यादी समजून घेण्यात गेले. खेड्यात राहून माझ्यापेक्षा वयाने मोठे असलेल्या लोकांना बरोबर घेऊन काम करणे हे नवीनच आव्हान होते. शेततळी, वेगवेगळ्या पद्धतीचे बंधारे बांधणे, त्यासाठी बंधाऱ्यांचे नियोजन करणे, गावकऱ्यांबरोबर फिरून त्यांच्या मदतीने अशा बंधाऱ्यांसाठी जागा शोधणे, त्या जागेच्या आजूबाजूच्या भागात जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना त्या बंधाऱ्याचा उपयोग समजावून देणे व त्याचा त्यांचे पीक वाढवण्यात कसा उपयोग होईल हे पटवून देणे, प्रत्यक्ष बांधकाम अशी सर्व कामे करताना असंख्य अनुभव आले.

'श्रमदानाशिवाय' काम नाही असे या प्रकल्पाचे उद्‌दिष्ट. त्यामुळे गावकऱ्यांनी श्रमदान करावे यासाठी खूप प्रयत्न करावे लागत. शिवाय बंधाऱ्यांबाबत लोकांमध्ये गैरसमजुती फार. 'चमत्काराशिवाय नमस्कार नाही' अशी एक म्हण आहे. कातवडी गावात असाच एक वळण बंधारा बांधताना गावकऱ्यांचा खूप विरोध झाला. पण पुढच्याच वर्षी पहिल्या पावसाळ्यात त्यांच्या भातशेतीला त्याचा फायदा झाला. शेततळ्यांमुळे पाण्याची पातळीही वाढत होती. नंतर स्वत:हून येऊन इतर ठिकाणीही असे

सुवर्णमहोत्सवी वाटचाल.. २००१..
दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रारंभ, गुजरात भूकंप मदतकार्य, जैवतंत्र संशोधिका निगडी-प्रारंभ,



उसळुनि येता हृदयामधुनी उत्साहाचे झरे ।
पराक्रमाला माथ्यावरचे अथांग नभ अपुरे ।।

बंधारे बांधावेत म्हणून लोक आग्रह करू लागले.

एकाच वेळी शेततळी, बंधारे अशी वेगवेगळी कामे वेगवेगळ्या गावांत चालू असताना सर्व ठिकाणी लक्ष ठेवताना कसरत होत असे. शेततळ्यांसाठी आणलेल्या जेसीबीचे काम रात्रंदिवस चालू असायचे व एखाद्या शेततळ्याचा महत्त्वाचा भाग खांदण्याचे काम कधीकधी रात्री १-२ वाजताही असायचे. दिवसभर झालेल्या दमछाकीनंतरही रात्री डोंगरात २-३ किमी चालून कामाच्या ठिकाणी जावे लागे. दिवसांतले १४-१६ तासही काम करावे लागे. कॉलेजात असताना केलेले ट्रेक्स व सायकल सहलींतून वाढलेल्या शारीरिक क्षमतेचा इथे पुरेपूर उपयोग झाला. शरीराचा कस लागायचा; पण आपण समाजाच्या उपयोगी पडणारं काम करत आहोत, या भावनेमुळे शीण निघून जायचा व दुसऱ्या दिवशी पुन्हा नव्याने कामाला लागायचो.

केवळ करिअरची चिंता न करता इंजिनिअरिंगनंतर दोन वर्ष पूर्ण वेळ प्रबोधिनीत काम करताना निःस्वार्थीपणा, सहनशक्ती (Patience), झोकून देऊन काम करणे या अनेक गोष्टी शिकलो. त्यातूनच प्रेरणा मिळून अधिक शिक्षण घेण्यासाठी आय. आय. टी. कानपूर येथे 'Water Resources Engineering' मध्ये एम. टेक. केले. एम. टेक. नंतर याच क्षेत्रात काम करत असताना प्रबोधिनीत ८-१० वर्षे केलेल्या कामाचा आज खूप उपयोग होतोय, व पुढेही होत राहील हे सतत जाणवत राहाते.

– **निखिल धारवाडकर**
dnikhil.iitk@gmail.com

---

# मलाच माझे रूप उमजता...

**कु. अपूर्वा राणे**

नुकतेच एका निसर्ग उद्यानाला भेट देणे झाले. तिथे मिळालेले सीताशोक (सीतेचा अशोक) या दुर्मिळ व औषधी वृक्षाचे बीज मी माझ्या इमारतीच्या आवारात आजच रुजवून आले. तेव्हा मनात विचार आला, पर्यावरणाशी मला एवढी जवळीक कशी वाटू लागली?

तेव्हा आठवले, नववीत असताना, विकासिकांमध्ये (बोरीवली विस्तार केंद्राचा एक उपक्रम) पर्यावरण या विषयावर एक पूर्ण वर्ष चर्चा, माहितीपट, प्रभातफेरी अशा अनेक उपक्रमांमध्ये मी सहभाग घेतलेला होता. 'निसर्ग आपल्यावर माया करतो आणि याची परतफेड आपण केली पाहिजे.' असे माझे मत त्यामुळेच तयार झाले होते.

ज्ञान प्रबोधिनीच्या संपर्कात मी बोरीवली केंद्राच्या विकासिकांमधून आले. मग केंद्रातील विविध शिबिरांमधून अनेक गोष्टी अनुभवायला मिळाल्या, आणि मिळत आहेत. सर्वांत भावलेली गोष्ट म्हणजे केंद्रावरील व्यक्तींमध्ये जाणवलेली आपुलकी. केंद्रातील काकी मला आईपेक्षाही जवळच्या वाटायच्या आणि वाटतात. (इथे आईची माफी मागते!) त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे मी कधीही न केलेल्या अनेक नवीन गोष्टी करत आले आहे.

मला वाटते, याची सुरुवात मला उपासना व पद्यं सांगायला प्रोत्साहन देण्यापासून झाली. संगीताची जाण नसताना असे सर्वांसमोर गायला सुरुवातीला खूप भीती वाटायची; पण कोणी हसत नाहीये, हे पाहून धीर चेपत गेला! हल्लीच केंद्रावर पार पडलेल्या अभंगगायनात सहभाग घेताना मला खूप समाधान मिळाले. (आध्यात्मिक समाधानापेक्षा, 'मी गायले' याचे जास्त!) या अभंगगायन कार्यक्रमाच्या सरावाला जायला मला

सु व र्ण म हो त्स वा टचाल
.. २००२ ..
स्वामी विवेकानंद स्मृतिशताब्दी अभियान -
५० गावांमध्ये



**बोरिवली येथील विकासिका–साप्ताहिक उपक्रम**

खूप मजा वाटली. कारण, एकमेकींचे सूर ऐकून, एकमेकींना सांभाळून घेताना मी चांगलीच रमले होते. या गटात माझ्यापेक्षा वयाने ज्येष्ठ अशा अनेक काकी होत्या. अशा विविध वयोगटातील व्यक्तींशी जुळवून घेण्याची कला जमल्यावर आता स्वत:वरचा विश्वास अधिक वाढत आहे.

तसेच, नवीन गटात जाऊन, नवीन व्यक्तींशी ओळख करून घेण्यात वेगळीच गंमत असते. 'छात्र प्रबोधन'च्या साहस सहलीला जाऊन याचाही प्रत्यय आला. वेगळ्या गावांतली, वेगळ्या संस्कृतींमधली, वेगळ्या वयाच्या मुलींशी जमवून घेत-घेत गिरिभ्रमणाचे साहस करताना मनाचा, शरीराचा व संवेदनांचा व्यायाम झाला. अशा व्यायामाने थकवा येण्याऐवजी मनावरची मरगळ दूर होते, हे उमजले.

गटात एखादे काम पूर्ण झाल्यावर कसा आनंद होतो व नाही झाल्यावर कशी चिडचिड होते (मग नकळतपणे एकमेकांवर अपयशाचा भार कसा लादला जातो) अशा अनेक गोष्टींचे पहिले प्रात्यक्षिक केंद्रावर काम करताना आले. लहानग्यांची 'ताई' म्हणून काम करताना त्यांना समजून घेण्याची संधी मिळत असते. लहानांना गोष्ट सांगणे ही कसली अवघड (आणि तितकीच महत्त्वाची) कला आहे, याची मला जाणीव होत आहे ! सरावाने हे देखील जमेल !

अशी ही आठवणींची, अनुभवांची साखळी वाढतच राहील. गटकार्य, सहसंवेदनेची वृद्धी, जबाबदाऱ्या स्वीकारून पार पाडणे, निर्णय घेणे व त्यावर ठाम राहणे इ. अनेक संस्कारांचे बीज ज्ञान प्रबोधिनीच्या उपक्रमांमधून रोवले गेले आहे. अगदी या सीताशोकाच्या बीजासारखे! या बीजांचा वृक्ष करण्यासाठी मी अनुकूल वातावरण नक्कीच तयार करत राहीन !

**– अपूर्वा राणे,** बोरिवली
rane.apoorva22@gmail.com

# अनुभव शिक्षणाची शाळा

**आराधना निकम**

मी दहावीत असतानाची गोष्ट. साधारण २००१ मधील. सांगलीमध्ये 'ज्ञान प्रबोधिनी'तर्फे राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा (NTSE) मार्गदर्शन वर्ग चालत. मी पण त्या परीक्षेची तयारी करत होते. त्या वर्गात एकदा पुण्याहून एक 'सर' आमच्याशी गप्पा मारायला आले होते. गप्पा मारण्यापूर्वी त्यांनी आमची ओळख करून घेतली; पण अट अशी होती की प्रत्येकाने स्वत:ची ओळख न सांगता आपल्या शेजारी बसलेल्या मैत्रिणीची/मित्राची ओळख करून द्यायची. गप्पांच्या त्या सत्राची सुरुवात अशा अभिनव पद्धतीने झाली आणि नंतरही त्या सरांनी आमच्याशी मोकळेपणाने गप्पा मारत दहावीच्या अभ्यासाचे मार्गदर्शन केले. ते 'सर' म्हणजे 'छात्र प्रबोधन'चे संपादक महेन्द्रभाई सेठिया होते. प्रबोधिनीशी माझा परिचय हा अशा रीतीने 'छात्र प्रबोधन'च्या निमित्ताने झाला.

सु व र्ण म हो त्स वी वा ट चा ल
**..२००४..**
काश्मिर अभ्यास दौरा



सत्यासमोर असणे हा सूर्यफूल बाणा ।
नचिकेत निर्भयांचा हा हिंदूदेश अमुचा ।।

मग सांगली येथील प्रबोधिनीचे प्रासंगिक उपक्रम, शिबिरे, सहली अशा उपक्रमांमधून प्रबोधिनीची ओळख मला अजून अजून होत गेली. दहावीच्या सुट्टीत मुलींसाठी एक शिबिर घ्यायचं होतं. त्यासाठी विद्यार्थी गोळा करण्यासाठी घरोघर जाऊन, तोंडी सांगून नोंदणी करायची होती. एका अर्थाने 'संवाद कौशल्य' शिकण्याची चांगली संधी आम्हाला यामुळे मिळाली. दिवसभर फिरून तीन-चार एवढीच नोंदणी करून आम्ही शैलेंद्रदादाकडे (सांगलीचे केंद्र प्रमुख -शैलेंद्र केळकर) जमायचो. अगदी वैतागलेले असायचो. दिवसभरातील अनुभव त्रासून सांगायचो आणि अचानक शैलेंद्रदादा विचारायचा, ''कोणत्या घरी चहा विचारला का कुणी?'' मग आम्ही विचार करायचो, 'अरे, आपल्याला असा विचार करायला जमायला हवं होतं.' मग दुसऱ्या दिवशी 'पाणी हवं का?' असं एखाद्या घरी विचारलं तरी आम्ही खूष!

अशा छोट्या छोट्या प्रसंगांमधून प्रबोधिनीच्या कामातलं वेगळेपण कळत गेलं. दिवाळी अंकाची प्रकाशनपूर्व नोंदणी करताना तर जो अंक अजून छापलेल्या स्वरूपात हातातही पडलेला नाही; तो कसा चांगला आहे आणि तो तुम्ही घेतलाच पाहिजे हे सांगताना आमची विक्री कौशल्यं पणाला लागायची.

शिबिरे, सहली आयोजित करताना महाविद्यालयीन वयातच 'संयोजक' होण्याची संधी मिळाली. त्यातून नियोजनातले बारकावे, लवचिकता, ऐन वेळी पर्यायी व्यवस्था काय अशा गोष्टींचे प्रशिक्षण झाले. सहलींच्या निमित्ताने टेम्पो, बस, रेल्वे अशा प्रवासातले वेगवेगळे अनुभव घेता आले. प्रवास हसतखेळत कसा अनुभवायचा, पाण्याची एक बाटली 'ट्रेक' दरम्यान पंधरा-वीस जणांनी कशी पुरवायची, ज्या ठिकाणी मुक्काम करायचा आहे; तेथे उपलब्ध सोयींमध्ये राहून, जेवून पुढे कसं जायचं अशा अनेक गोष्टी या निमित्ताने अनुभवता आल्या. सिंहगडचा ट्रेक



**भामरागड अभ्यास–सहलीत डॉ. राणी बंग यांच्यासमवेत**

करून रात्री दमून भागून कल्याणला पोहोचल्यावर तेथे जेवताना खाल्लेला गरम गरम भात आणि पिठलं याची चव माझ्या जिभेवर अजूनही आहे. दिवाळी अंक वितरण, काश्मीर अभ्यास दौरा. यातील कितीतरी अनुभव खरोखर संस्मरणीय! भामरागडच्या आदिवासी शाळेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लोकगीताचा ठेका अजूनही लक्षात आहे; तितकाच साळुंब्रे येथील ग्रामप्रबोधिनीतील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सादर केलेला खड्या आवाजातील पोवाडा, त्यातला जिवंतपणा मी विसरू शकत नाही.

या सर्व उपक्रमांमधून जसे अनुभवशिक्षण झाले; तसेच ते ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या सहवासातून देखील झाले. या सर्वांच्या काम करण्याच्या पद्धती, आग्रह यांतूनही एखादं काम करताना 'गुणवत्तेमध्ये तडजोड कशी करायची नाही' हे शिकायला मिळाले. मग एखाद्या अंकासाठी लेख निवडणं इथपासून कामाच्या 'वेळापत्रका'ला सांभाळण्यापर्यंत प्राधान्यक्रम ठरवून काम कसं पूर्ण करायचं हे मी प्रबोधिनीमध्ये बघितलं. कामामध्ये कितीही मोठी चूक झाली तरी ती शांतपणे समजून घेणारे ज्येष्ठ कार्यकर्ते मी इथे पाहिले. अचानक एखादी जबाबदारी टाकून त्यातून त्या व्यक्तीला निर्णय घेण्याचं, कामाचं पूर्ण स्वातंत्र्य द्यायचं आणि जबाबदार (Accountable) असा कार्यकर्ता घडवायचा, ही प्रबोधिनीची कार्यपद्धती मलाही घडवणारी ठरली.

'छात्र प्रबोधन' च्या टप्प्यावरून सुरू झालेली प्रबोधिनीतील ही माझी वाटचाल ग्रामीण परिचय

शिबिरं, अभ्यासदौरे, गिरिभ्रमण सहली, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरे, दिवाळी अंकाच्या निमित्ताने केलेले उपक्रम आणि स्पर्धा परीक्षा केंद्रात विद्यार्थी व समन्वयक म्हणून काम करणे अशा अनेक टप्प्यांवर अधिकाधिक डोळस होत गेली. ‘प्रबोधिनी’पण म्हणजे काय हे कळत गेलं. उत्तमतेचा आग्रह, गुणवत्तेचा आग्रह, वेगळ्या विचारांचे-कल्पनांचे स्वागत, सर्जनशीलता, कल्पकता, कुठे ‘कमी’ पडत असेल तेथे आपणहून पुढाकार घेऊन काम करणे, सहभागाची संधी पकडणे, ‘पर्याय’ देणे, एखादी गोष्ट नेमकी का आणि कशासाठी करायची हे जाणून घेणे असे ‘प्रबोधिनी’ पणाचे अनेक पैलू मला कळत नकळत या उपक्रमांमधून, ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या सहवासातून कळत गेले आणि नकळत मी देखील समृद्ध होत गेले.

‘रूप पालटू देशाचे’ या उद्देशाने कार्यरत असणारी अनेक उदाहरणे ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून माझ्या समोर आली. त्यामुळे माझ्या कल्पना-उद्दिष्टांना नेमकेपणा आला. धावणाऱ्यांच्या गर्दीत सामील होण्यापूर्वी विचार करण्याची सवय लागली.

*‘मी न एकटी माझ्यासोबत विहंगमाचे भव्य थवे,’*
हा विश्वास मला ‘प्रबोधिनी’तून मिळाला. प्रबोधिनी ही माझ्या दृष्टीने अनौपचारिक शिक्षणाची, अनुभव शिक्षणाची दुसरी ‘शाळा’ आहे आणि अजूनही मी शाळेची विद्यार्थिनी आहे. आतापर्यंत दृढ झालेलं हे नातं म्हणूनच भविष्यातही मला प्रेरणा देत राहील. स्पर्धा परीक्षा केंद्राच्या विवेक कुलकर्णी सरांनी सांगितलं होतं की,

‘Once a student of Prabodhini
is always a member of Prabodhini’

हे मला तरी नक्की पटलंय. मी ‘प्रबोधिनी’ची आहे, ही आता माझी वेगळी ‘ओळख’ झाली आहे!

**– आराधना निकम**
aradhana.nikam@gmail.com

---

# माझा प्रबोधिनीबरोबरचा प्रवास

**दीपाली गोडसे**

इयत्ता चौथी मध्ये असताना म्हणजे साधारण १९९९ साली काही मैत्रिणींमुळे मला ज्ञान प्रबोधिनीबद्दल समजलं आणि माझी आई एक दिवस मला डोंबिवली केंद्रात चालणाऱ्या विकासिकेत घेऊन गेली. या विकासिका साप्ताहिक होत्या. काही दादा-ताई मिळून या विकासिका घ्यायचे. इथे घेतली जाणारी गाणी, बौद्धिक आणि मैदानी खेळ, वाचन, गटचर्चा हे सगळंच माझ्यासाठी खूप वेगळं आणि नवीन होतं. या विकासिकांबरोबरच मी लहानाची मोठी झाले. एखादी कथा वाचून त्यावर नाटक बसवण्यापासून ते अगदी शिकवणी लावायची की नाही या विषयावर केलेला वादविवाद असो; आम्हाला व्यक्त होण्याचं खूप छान माध्यम मिळालं होतं. एकदा आमचे तीन गट करून आम्हाला प्रकल्प करायला दिले होते. जमेल त्यावेळी एकमेकांच्या घरी भेटून, कामे वाटून घेऊन, आई-बाबांची मदत न घेता आम्ही हे प्रकल्प केले आणि त्याची एक छोटीशी स्पर्धाही झाली. याच दरम्यान मी ‘छात्र प्रबोधन’ या मासिकाची सभासद झाले. दर महिन्याचा अंक हातात आला की आधी त्यातल्या सगळ्या कथा वाचून टाकायच्या असं ठरलेलंच होतं. ज्ञान प्रबोधिनीचं डोंबिवलीत काम करणारा पालकांचाही एक गट होता. माझी आई त्या गटात सहभागी होऊन प्रबोधिनीचं काम करू लागली.

सुवर्णमहोत्सवी वाटचाल .. २००५ ..
ईशान्य भारत अभ्यास व मैत्री अभियान,
जलस्वराज्य प्रकल्प प्रारंभ



पिढ्यापिढ्यांचा नसे वारसा, नसती नमुने वा आधार ।
मनी भूक मोठ्याच यशाची, मनात केवळ हाच विचार ।।

मी नववीत असताना ज्ञान प्रबोधिनी, पुणे इथे 'छात्र प्रबोधन' मासिकाच्या तपपूर्तीच्या निमित्ताने खूप मोठ्या प्रमाणावर कुमार महोत्सव झाला. त्या आधी महाराष्ट्रभरात वेगवेगळ्या शाळांनी 'सृजनाला पंख नवे' या स्पर्धेत सहभाग घेतला होता. माझी शाळाही या स्पर्धेत सहभागी झाली होती. यात आमची शाळा ठाणे जिल्ह्यातून प्रथम आली आणि याच स्पर्धेची पुढची फेरी कुमार महोत्सवात होती. महाराष्ट्रभरातून जवळपास २००० विद्यार्थी-विद्यार्थिनी कुमार महोत्सवाला आले होते. वेगवेगळ्या क्षेत्रातल्या मान्यवरांच्या मुलाखती, भव्य पटांगणावरची क्रीडा प्रात्यक्षिके बघताना मी अक्षरशः भारावून गेले. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवाची सांगता २००० जणांनी हातात पणत्या घेऊन केलेल्या 'मातृमंदिर में चलो' या आरतीने झाली. एक वेगळाच, शब्दात सांगता न येण्यासारखा हा अनुभव होता.

डोंबिवलीत याच दरम्यान मी युवा गटाच्या उपक्रमांमध्ये सहभागी होऊ लागले. बैठकांना जाऊ लागले. एवढे दिवस मी शिबिरार्थी म्हणून जात होते, आता शिबिर घेण्यासाठी जाऊ लागले. यातून लोकांसमोर बोलायची भीड चेपली जाऊ लागली. एखादया उपक्रमाचं नियोजन करायचं म्हणजे नेमकं काय ते समजू लागलं. तोपर्यंत छात्र प्रबोधन, पुण्याची प्रशाला आणि डोंबिवलीतले उपक्रम एवढंच माहीत असलेल्या प्रबोधिनीशी हळूहळू ओळख वाढू लागली. प्रबोधिनीचं काम करणारे वेगवेगळ्या ठिकाणचे कार्यकर्ते डोंबिवलीत यायचे. त्यांच्या युवक-युवतींबरोबर बैठका व्हायच्या. त्यांचे अनुभव ऐकायला मिळायचे. ते ऐकताना आम्ही भारावून जायचो. त्यातून प्रबोधिनीचं काम हळूहळू समजू लागलं. 'छात्र प्रबोधन' प्रमाणेच पुण्याजवळच्या ग्रामीण भागात, हराळीसारख्या भूकंपग्रस्त भागात, तसंच संशोधनाच्या दृष्टीनेही प्रबोधिनीचं काम सुरू आहे, असं समजलं.

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. २००५ ..
एकात्मिक शेती प्रशिक्षण प्रकल्प- साळुंब्रे प्रारंभ,



**कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबिर, डोंबिवली**

डोंबिवलीत आमचे दरवर्षी अभ्यास शिबिर व्हायला सुरुवात झाली. एका शिबिरात प्रबोधिनीचे आदय संचालक कै. आप्पा पेंडसे यांचं चरित्र ऐकलं. त्यातून प्रबोधिनीचा इतिहास, प्रबोधिनीच्या स्थापनेमागची भूमिका समजली. या शिबिरामुळे प्रबोधिनीचे विचार समजून घ्यायला मी सुरुवात केली. यातूनच माझं पदवीपर्यंत शिक्षण झाल्यावर वर्षभर प्रबोधिनीचं पूर्णवेळ काम करण्याचा मी विचार केला. पुण्यातल्या वस्त्यांमध्ये (झोपडपट्ट्यांमध्ये) मी अशा प्रकारच्या कामाचा अनुभव घेतला. वेगवेगळ्या समाजगटांचा, वस्तीतल्या कुटुंबांचा, परिस्थितीचा अभ्यास मला करता आला. तिथल्या किशोरी आणि युवतींमध्ये मिसळून त्यांच्या समस्या आणि त्यांचे गुण समजून घेण्याची संधी मिळाली.

सर्वांगीण विकासाची चळवळ असलेल्या 'छात्र प्रबोधन'बरोबर हा प्रवास सुरू झाला. या प्रवासात घेतलेल्या विविध अनुभवांमुळे माझ्याही व्यक्तिमत्त्वात काहीसा बदल होऊ लागला आहे. प्रबोधिनीबरोबर सुरू केलेला हा प्रवास प्रबोधिनीच्या प्रवासाचा एक भाग होऊन असाच सुरू राहावा, असं मनापासून वाटतं.

**– दीपाली गोडसे,** डोंबिवली
ddgodse@gmail.com






परिस्थितीच्या अन्यायाचा पूर्ण उमलणे हा प्रतिकार ।
कशास डंका, कृतीच बोले, मी माझ्यासम घडविन चार ।।

# मी बी घडलो तुम्ही बी घडा ना !

**केदार वाघमारे**

मी सहावीत असताना अंबाजोगाईत आमच्या कॉलनीतील काही मुले रोज बाहेर कुठेतरी जाताना पाहायचो. ते रात्री परत आल्यानंतर आम्हाला तेथील गंमती-जंमती सांगायचे. ते सर्व ऐकून मनामध्ये सारखा विचार यायचा की, आपणही एकदा तेथे जावे व पाहावे की, काय नेमके वेगळे असे खेळ तेथे घेतले जातात? या उत्सुकतेपोटी एकेदिवशी संध्याकाळी ५ वाजता मनामध्ये असंख्य प्रश्न घेऊन मी त्या ठिकाणी पोहोचलो. तेथे गेल्यानंतर तेथे जमलेली मुले पाहून अचंबित झालो. तेथील प्रार्थना, खेळ, मज्जा, गंमती-जमती या सर्वांनेच मला वेगळं असं काहीतरी सापडल्यासारखं वाटलं आणि त्या मुलांमध्ये मी मिसळून गेलो. तिथे आम्हाला प्रथमच फुटबॉल काय असतो ते पाहायला मिळालं. ते ठिकाण होतं ज्ञान प्रबोधिनीचं दल. त्यादिवशी मी मनसोक्त खेळलो. कॉलनीमध्ये खेळत असताना एकटेपणा वाटायचा; पण इथे तसं नव्हतं. इथं अनेक मुलं होती, वेगवेगळ्या स्वभावाची होती. हे सगळं माझ्यासाठी नवीन होते. हे सर्व करायला खूप मज्जा व एक नवीन प्रकारचा आनंद मिळत होता. मग हळूहळू नित्याचेच झाले. रोज सगळ्यांनी जमायचे, मनसोक्त खेळायचे आणि उपासना करायची. खेळ खेळताना मज्जा यायची पण उपासना मात्र समजायची नाही. हळूहळू उपासना पाठ झाली होती. पण ती कळत नव्हती. आज उपासना करताना त्याचा अर्थ बऱ्यापैकी समजतो. उपासनेनंतर आम्ही प्रसाददादा बरोबर गप्पा मारायचो. प्रसाददादा आम्हाला अनेक गंमती-जंमती सांगायचा. एकूणच तो काळ फार मज्जेचा होता.

उपासना, दल या बरोबरच प्रसाददादा व किशोरदादा आमच्यासाठी दर रविवारी मुक्त अभ्यासगट चालवायचे. तसं माझं अभ्यासाशी फार जुळायचं नाही; पण तरीही या मुक्त अभ्यासगटाला मी आनंदाने यायचो. त्यामुळे न कळत अभ्यासाची गोडी लागली. यामधूनच ज्ञान प्रबोधिनी व माझं नातं इतकं घट्ट होत गेलं की, एक दिवस जरी मी प्रबोधिनीत गेलो नाही तरी मला करमायचे नाही. हळूहळू दल हे माझ्या आयुष्यात महत्त्वाचं होत गेलं. त्यावेळी मला दलप्रमुख होण्याची संधी देखील मिळाली. त्यातून नेतृत्व करण्याची आवड निर्माण झाली. दल ही माझ्यासाठी महत्त्वाची गोष्ट होती. दलामुळेच मला खेळाची विशेष आवड निर्माण झाली. ॲथलेटिक्समध्ये २० कि.मी. 'वॉकिंग' या प्रकारात पुढे मी जिल्हा पातळी, राज्यपातळी, राष्ट्रीयपातळीवर देखील सहभाग नोंदवला. दलाने या गोष्टीची सुरुवात झाली होती. याचे पूर्ण श्रेय दलाला जाते.



दलावरील खेळ

खेळाबरोबरच मी प्रबोधिनीत विक्री कौशल्य शिकलो. अगदी सुरुवातीला छात्रप्रबोधन मधून येणाऱ्या राख्यांच्या साहित्यातून राख्या तयार करताना

सुवर्णमहोत्सवी वाटचाल ..२००६..
मातृभूमी पूजन कार्यक्रमांना प्रारंभ,
हरियाना -भट्टा शाळा मार्गदर्शन

मज्जा यायची. त्या घरोघरी जाऊन विक्री करताना अनेक अनुभव मिळायचे. कुठे आनंदाने स्वागत व्हायचे तर कुठे झिडकारून देणारी माणसं भेटायची. दोन्ही प्रकारचा अनुभव घेताना मज्जा यायची. राख्यापासून सुरु झालेला माझा विक्री उपक्रम पुढे विवेकानंदांचे फोटो, पुस्तके, फटाके, दिवाळीचे साहित्य, शालेय साहित्य इत्यादी पर्यंत येऊन पोहोचला. आजही या विक्री उपक्रमाशी मी जोडलेलो आहे. आज विक्री उपक्रमात, ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्राने तयार केलेले विक्री साहित्य विकताना जास्त आनंद होतो. या विक्री कौशल्याने आत्मविश्वास, निर्भयता, निर्णय क्षमता या तीन गोष्टींमध्ये निश्चितच वाढ झाली.

माझ्या आयुष्याला कलाटणी दिलेला प्रसंग तुम्हाला सांगायला आवडेल. विक्री उपक्रमात काम करताना मी अभ्यासही बरा करायचो. दहावीच्या वर्षी देखील मी विक्री उपक्रमात सहभाग घेतलेला होता. पण कुठे तरी अभ्यासाच्या बाबतीत मी कमी पडत होतो. त्यावर्षी मी माझ्या परीने खूप प्रयत्न केले होते. पण तरीही दुर्दैवाने मी दहावीच्या परीक्षेमध्ये नापास झालो. या अपयशाने मी खूप दु:खी झालो. त्यावेळी माझ्या आई बाबांबरोबरच माझ्यापाठीशी खंबीरपणे प्रबोधिनी व प्रबोधिनीचे कार्यकर्ते उभे राहिले. समाजामधून मिळणाऱ्या वागणुकीमुळे मी खचून न जाता उभा राहू शकलो. प्रसाददादा, वैद्यकाका, राधेशदादा या व अशा अनेक कार्यकर्त्यांकडून मला प्रेरणा मिळाली आणि प्रयत्नांनी त्या अपयशातून वर आलो. ऑक्टोबरच्या परीक्षेत पास झालो आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे या माझ्या जिवाभावाच्या दोस्तांमुळे बारावीच्या परीक्षेमध्ये ८१.१७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालो.

प्रबोधिनीने 'युवा लक्ष्य' नावाचा एक कार्यक्रम घेतला होता. त्या कार्यक्रमामध्ये युवकांना एकत्र करण्यासाठी प्रत्येकाने एका महाविद्यालयात जाऊन मुलांना माहिती सांगायची होती. मी त्या कार्यक्रमाच्या आधी कधीच व्यासपीठावर जाऊन माहिती सांगितली नव्हती. हा माझा पहिलाच प्रसंग होता. मी व्यासपीठावर गेलो आणि माहिती सांगू शकलो, त्यावेळी माझे मलाच आश्चर्य वाटले. उपासना केंद्रावर म्हटल्या जाणाऱ्या विवेकानंदांच्या विचारांमुळे मी व्यासपीठावर उभा राहू शकलो, बोलू शकलो. त्यानंतर कित्येकदा स्पर्धांमधूनच नाही तर वेगवेगळ्या विषयांसंदर्भात शाळेत जाऊन बोलताना कधी कचरलो नाही. मुख्याध्यापकांशी, प्राचार्यांशी एखाद्या गोष्टीबद्दल परवानगी मागताना घाबरलो नाही.

मी पदवीचे शिक्षण घेताना देखील मला या गुणांचा मोठा फायदा झाला. महाविद्यालयाचे दोन वर्ष विद्यार्थी कल्याण मंडळ (student council) चा सदस्य होण्याचा मान मला केवळ प्रबोधिनीत माझं जे नेतृत्व विकसित झालं त्यामुळेच मिळाला. पदवी परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन मी सध्या बी.एड. करत आहे.

प्रबोधिनीत सादर होत असलेल्या गणेशोत्सवामध्ये हिरीरीने भाग घ्यायचो त्यामध्ये असलेल्या बरची नृत्यात मला खूप आनंद वाटायचा. नंतर नंतर ढोल वाजवायला शिकलो. ध्वज नाचवायला शिकलो. हे सर्व शिकत असताना गणेशोत्सवातल्या विविध उपक्रमांचे आणि गणेशोत्सवाचेही प्रमुख पद अनुभवायला मिळाले.

गणेशोत्सवाने मला नेतृत्व, आत्मविश्वास, धाडस या सर्व गोष्टी दिल्या. म्हणूनच ज्ञान प्रबोधिनीच्या पद्यातील खालील ओळी मला नेहमीच खुणावतात,

''प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया
समर्थ मायभूमीला जगी करावया''

**केदार वाघमारे**
युवक सचिव, अंबाजोगाई
'छात्र प्रबोधन' मराठवाडा विभाग संपर्क प्रमुख

सुवर्ण महोत्सवी वाटचाल .. २००६ ..
छात्र प्रबोधन ५०,००० दिवाळी अंकांच्या विक्रीचा टप्पा ओलांडला, नागरी वस्ती उपक्रमांना प्रारंभ



अदम्य अपुल्या आकांक्षांचे गीत आजला गाऊ ।
जिथे जायचे ठरले तेथे जाऊच जाऊ ।।

**मुलींमध्ये धाडस, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, उत्तमता व कल्पकता वाढावी यासाठी ज्ञान प्रबोधिनीच्या ग्रामविकसनतर्फे किशोरी विकास प्रकल्प गेली अनेक वर्षे राबवला जातो. १९९१-९२ मध्ये अनौपचारिक स्वरूपात चालू झालेल्या या प्रकल्पाचा २००९ नंतरचा विस्तार प्रामुख्याने शिवगंगा, गुंजवणी खोऱ्यांत झाला. गाव पातळीवर मुलींसाठी उपक्रम करत करत आता गेल्या दोन वर्षांपासून माध्यमिक विद्यालयांतून महिन्यातून एक दिवस दीड तास अशा स्वरूपात या प्रकल्पांतर्गत तासिका घेण्यास सुरुवात झाली आहे. नेतृत्व विकास, आरोग्य आणि व्यक्तिमत्त्व विकास यावर या तासिकांमध्ये भर असतो. प्रज्ञा मानस विभागातर्फे प्रकाशित होणारे साहित्य, छात्र प्रबोधन मासिक व इतर प्रकाशित साहित्याचा वापर या तासिकांसाठी केला जातो. या किशोरी विकास प्रकल्पात सहभागी झालेल्या वेगवेगळ्या गावातील काही विद्यार्थिनींची प्रातिनिधिक मनोगते... त्यांच्याच शब्दात...**

# किशोरी विकास उपक्रम



**किशोरी विकास उपक्रमांतर्गत सायकल वाटप**

''मी मोठी झाल्यावर माझ्यापेक्षा लहान मुलींना ज्ञान प्रबोधिनीबद्दल शिकवायला मला आवडेल; कारण या शिबिराला येऊन मी खूप गोष्टी पहिल्यांदाच केल्या. कधी नव्हे ते तोरणा किल्ल्यावर गेले... तंबूमध्ये राहिले... सकाळी उठून उपासना केली... शिबिरात पाहिलेल्या विज्ञान प्रयोगांमुळे जे प्रयोग येत नव्हते ते समजले..''

- **अश्विनी शिवाजी जाधव,** मालवली

**

''आमच्या गावात ज्ञान प्रबोधिनीने घेतलेल्या शिबिरात माझ्या मैत्रिणी होत्याच, तरीसुद्धा नवीन खूप ओळखी झाल्या... आम्ही सगळ्यांनी एकत्र दंगा केला, स्वयंपाक केला, कविता म्हटल्या...नाटकसुद्धा सादर केलं... या शिबिरामुळे आणि सर्व तायांमुळे जगण्याची एक नवी उमेद मिळाली.''

- **सुमैया महंमद शेख**

**

''किशोरी विकास शिबिरातील ताईंनी स्त्रीकडे सहनशीलता असावी असं सांगितलं. जिद्द, चिकाटी हे असलं की सारं काही सोपं होतं हे सुद्धा या शिबिरामुळे कळलं... या शिबिराच्या निमित्तानी मी असा संकल्प केला की वयाच्या किमान बाविसाव्या वर्षापर्यंत मी फक्त शिक्षण घेईन आणि आत्मविश्वासाने स्वत:च्या पायावर उभी राहीन.''

**-भाग्यश्री अरुण वालगुडे**

**

''या शिबिरामुळे स्त्री कोणत्याही कामात मागे नाही, याची जाणीव झाली. विशेष म्हणजे हे कळले की सर्व काही आपल्या जवळच असते. परंतु आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. शिबिरात शिकलेले लहान लहान प्रयोग पूर्ण माहिती घेऊन माझ्या शाळेतल्या मुलामुलींना नक्की करून दाखवेन. पुढे जाऊन उच्च शिक्षण घेऊन मलासुद्धा असं काम करायला आवडेल...''**-पूजा दत्तात्रय जाधव,** कांजळे

**

किशोरी विकास प्रकल्प आज गावागावांत विस्तारतो आहे. बचत गटातून महिलांना समृद्ध करता करता किशोर वयातच या मुलींची चांगली जडण-घडण व्हावी, त्यांना आयुष्य जगण्याची नवी उमेद, नवी ध्येयं मिळावीत यासाठी कार्यकर्ते झटत आहेत... आणि याच प्रकल्पातली कुणी ना कुणी मोठी होऊन अशाप्रकारे इतर किशोरींपर्यंत पोहोचेल असा मनात विश्वास आहे...

सु व र्ण म हो..**२००७**.. वा ट चा ल
वेल्हे येथे युवा ज्योती प्रकल्प प्रारंभ
महाराष्ट्रात ५० गावांमध्ये शिबिरे

# भविष्यवेधी प्रबोधिनी

**– वाच. गिरीश बापट**

ज्ञान प्रबोधिनी ही देशाच्या विकासाबरोबर विकसित होत जाणारी संघटना आहे. देशाचे अस्तित्व कायमस्वरूपी राहील, हा जसा आपला विश्वास असतो; तसेच ज्ञान प्रबोधिनीचे अस्तित्वही सतत वाढणारे आणि कायमस्वरूपी राहील, अशी आपली अपेक्षा आहे. पुढील दहा वर्षांच्या शेवटी म्हणजेच इ. स. २०२२ साली भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव असेल. त्यावेळी भारताची कशी प्रगती झाली याचे अनेक आराखडे मांडले जातील. भारताच्या प्रगतीत प्रबोधिनीचा महत्त्वाचा, गुणवत्तापूर्ण वाटा आहे, असे लोकांना म्हणता येईल एवढे काम येत्या दहा वर्षांत आपल्याकडून झाले पाहिजे.

या दहा वर्षांमध्ये प्रबोधिनीचे काम कसे असावे, या विषयीचा आराखडा मांडण्याची प्रक्रिया गेले वर्षभर सुरू होती. ह्या मांडणीला प्रबोधिनीत 'भवितव्य लेख' असे म्हटले जाते. शिक्षण हा प्रबोधिनीच्या कामाचा गाभा असला, तरी येथे फक्त क्रमिक शिक्षण अभिप्रेत नाही. स्वामी विवेकानंदांच्या विचारांवर आधारित मनुष्य घडणीचे शिक्षण येथे अभिप्रेत आहे. ज्ञान प्रबोधिनीची मनुष्यघडणीची प्रक्रिया आजवर शालेय वयोगटासाठी जास्त विकसित झाली आहे. **मनुष्यघडण म्हणजे कौशल्ये आणि ज्ञानाच्या विकासाबरोबर चांगल्या सवयी, विधायक वृत्ती आणि पराक्रमाच्या प्रेरणेचाही विकास करणे.** ही मनुष्य घडणीची प्रक्रिया शालेय वयोगटाच्या पुढे विस्तारित करणे, हे प्रबोधिनीचं आगामी दहा वर्षातलं उद्दिष्ट असणार आहे. ज्ञान प्रबोधिनीचा सुवर्ण महोत्सव ते भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजेच इ. स. २०१२ ते २०२२ या दशकासाठी प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी तयार केलेला भवितव्य लेख म्हणून हा **'सुवर्णामृत भवितव्य लेख'** आहे. आधी शब्दांत मांडलेला हा 'सुवर्णामृत भवितव्य लेख' प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यासाठी नव्या, जुन्या आणि ताज्या दमाच्या अनेकानेक प्रबोधकांचे हात लागावेत अशी अपेक्षा आहे. प्रबोधिनीच्या विविध केंद्रांनी आपापले भवितव्य लेख केले आहेतच. त्याशिवाय एकूण ज्ञान प्रबोधिनीचा भविष्यातील विकास पाहताना पुढील दहा वर्षांत...

१. **गुजरात ते काश्मिर आणि हिमाचल प्रदेश ते अरुणाचल प्रदेश या भारताच्या सर्व सीमावर्ती राज्यांमध्ये प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांचे येणे जाणे वाढायला हवे.**
२. **महाराष्ट्राशेजारच्या सर्व राज्यांमध्ये प्रबोधिनीची उपक्रम केंद्रे सुरू व्हायला हवीत.**
३. **सर्व धर्म, जाती-जमाती, पंथोपपंथ व आर्थिक गटांतील प्रज्ञावंतांचा शोध घेऊन त्यांच्या मनावर राष्ट्रभक्तीचे संस्कार रुजविणारी ज्ञानप्रबोधिनीची मनुष्य घडणीची प्रक्रिया महाराष्ट्राच्या जिल्ह्याजिल्ह्यात सुरू व्हायला हवी.**

प्रबोधिनीमध्ये शालेय वयोगटातील मनुष्य घडणीची जी काही पद्धत आजपर्यंत विकसित झाली आहे, ती विविध प्रकारच्या भौगोलिक प्रदेशात आणि सामाजिक, आर्थिक व भाषिक गटातही उपयोगी पडण्यासाठी अनेक ठिकाणी ती वापरून पाहता येईल अशी व्हायला हवी.

४. **शालेय वयोगटाच्या पुढे (म्हणजेच युवक व प्रौढ गटासाठी) मनुष्य घडणीची प्रक्रिया विस्तारीत करण्यासाठी** शून्यातून प्रकल्प उभे कसे करायचे, चालू प्रकल्प आपल्या प्रतिभेने कसे वाढवायचे, याचे

सुवर्ण महोत्सवी वाटचाल ..२००८..
ज्ञान प्रबोधिनी खंड ४ भाग - १ प्रकाशित,
जिजामाता प्रबोधन केंद्र - राज्यपाल भेट



जगाची भरारी पुढे झेप घेण्या, मनी संघवृत्ती खिलाडूपणा ।
सदा विक्रमांची क्षुधा वाढणारी, मिळो सर्व सन्मान वा वंचना ।।

अनुभव देऊन त्यातून आत्मविश्वासही अंगी बाणवावा लागेल.

५. **प्रबोधिनीत विकसित केलेली मनुष्यघडणीची प्रक्रिया भारतीय अध्यात्मावर आधारित आहे. भारताबाहेरही या मनुष्यघडणीच्या प्रक्रियेबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. या मनुष्यघडणीच्या प्रणालीचे महत्त्व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर मांडण्यासाठी व देशोदेशीच्या लोकांना त्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांचे परदेश दौरे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवापर्यंत सुरू व्हायला हवेत.**

प्रबोधिनीच्या या संकल्पित वाढीची धुरा खांद्यावर घेणारे प्रशिक्षित मनुष्यबळ प्रत्येक क्षेत्रात लागणार आहे. सर्वच वयोगटातील व्यक्तींना, माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींना, तसेच समाजातील इतरही उत्साही हितचिंतकांना प्रबोधिनीच्या प्रत्यक्ष कामात विविध प्रकारे सहभागी होण्याचे आवाहन या निमित्ताने मी करतो.

**– वाच. गिरीशराव बापट**
संचालक, ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030

## ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम

१. **संपर्क शिबिरे –** महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात व महाराष्ट्रालगतच्या राज्यांमध्ये संपर्क शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. आपापल्या गावातील शिबिरांच्या तपशिलाबाबत (दिनांक, स्वरूप, जागा इ.) आपण सुवर्ण महोत्सव कार्यालयात संपर्क करावा आणि अधिकाधिक सभासदांनी या शिबिरांमध्ये सहभागी व्हावे. प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांना भेटून त्यांचा परिचय करून घ्यावा. 'छात्र प्रबोधन'तर्फे कोल्हापूर येथे ऑगस्ट अखेरीस, चाळीसगाव येथे ३,४ सप्टेंबरला तर अकोला येथे डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात वाचक मेळाव्याच्या स्वरूपात ही संपर्क शिबिरे होतील.

२. **मेळावे –** प्रबोधिनीच्या विविध विभाग व केंद्रांतर्फे पूर्वी संपर्कात येऊन गेलेल्या माजी विद्यार्थी/ प्रबोधक, पालक, अध्यापक, कार्यकर्ते यांच्यासाठी मेळाव्यांचे आयोजन त्या त्या केंद्रांवर केले जाणार आहे.
'छात्र प्रबोधन'तर्फे चार मेळावे होणार आहेत – पूर्वीच्या शिबिरे, सहलींना येऊन गेलेल्या पदव्युत्तर गटासाठी – १२ ऑगस्ट, पदवीपूर्व गटासाठी– १९ ऑगस्ट व छात्र प्रबोधनच्या पुण्यातील सभासदांचा व त्यांच्या पालकांचा – २ सप्टेंबर

३. **राष्ट्रीय स्तरावरील परिषदा**
**१. शिक्षण चिंतन परिषद–** ७ ते ९ डिसेंबर २०१२
विषय – भारतीय शिक्षण प्रणाली व मनुष्यघडणीचे शिक्षण, त्याची व्यावहारिक उपयोगिता
**२. बुद्धिमत्ता –** स्वरूप, शोध, मापन, विकास – ७ ते ९ फेब्रुवारी २०१३ (प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे आयोजित)

४. **कार्य प्रात्यक्षिके –** २७ जानेवारी २०१३
प्रबोधिनीत चालू असलेल्या मनुष्यघडणीच्या प्रक्रियेची प्रात्यक्षिके, सामूहिक उपासना व प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम

५. **सुवर्णमहोत्सवी सभा व सांगता समारंभ –**
२४ फेब्रुवारी २०१३
या सर्व उपक्रमांमध्ये यथाशक्य सभासदांनी, त्यांच्या भावंडांनी, पालकांनी, शिक्षकांनी आवर्जून सहभागी व्हावे.

अधिक तपशीलासाठी ज्ञान प्रबोधिनी सुवर्णमहोत्सव कार्यालय– ०२०–२४२०७१७८, (समन्वयक – मेधाविनी वाटवे – ९४२३३१६२१३४)

सुवर्ण महोत्सवी वाटचाल.. **२०११**..
'विनायक भवन' वास्तूचे उद्घाटन,
भगिनी निवेदिता स्मृतिशताब्दी अभियान

गेल्या २० वर्षांतील छात्र प्रबोधनची वाटचाल पाहता शैक्षणिक क्षेत्रातील एखाद्या उपकमाचे शास्त्र व तंत्र याचा एक उत्तम नमुना सिद्ध झाल्याचे लक्षात येते. उद्दिष्टानुसार छात्रांचे प्रबोधन करण्यासाठी हाताळलेले विषय, त्यांची उपक्रमांशी सांगड, पद्धतशीर व नियोजनपूर्वक विस्तार, वाचक सदस्य व लेखक सदस्य यांचे एक प्रकारे संघटन, समृद्ध भाषा आणि ताकदीचा संपादक संच इ. घटक हे या उपक्रमाच्या यशास कारणीभूत आहेत असे सहज जाणवते.

यापुढे छात्र प्रबोधनचे माध्यम आणखी काही वेगळ्या प्रकारेही हाताळता येईल असे वाटते.

उदा. मासिकातील विषय यांची कृतीशी आणि उपक्रमांशी जोड देण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीच्या विविध विभागातील शिबिरांचा विचार करता येईल. मासिकात दिलेले खेळ, विज्ञान प्रयोग, प्रकट वाचनासाठी कथा व शिबिरातील गरजा यांचा एकत्र विचार करता येईल का? – **वाच. उषा खिरे**, प्रज्ञा मानस संशोधिकेच्या संस्थापिका

*

ज्ञान प्रबोधिनीचे संघटन वाढण्याकरता छात्र प्रबोधनचा माध्यम म्हणून मोठ्या प्रमाणात उपयोग झाला आहे. विद्यार्थ्यांना घडवण्याचे साधन म्हणून 'छात्र प्रबोधन'चा वापर होतो आहे. – **ज्ञानेश्वर सावंत,** संपर्क अधिकारी, निगडी केंद्र

*

# माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

## छात्र प्रबोधन २० वर्षांची वाटचाल

निव्वळ मासिक ही छात्र प्रबोधनची भूमिका कधीच नव्हती. तर या मासिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ केवळ महाराष्ट्रातच नव्हे देशभर पोहोचावी या दिशेने 'छात्र प्रबोधन'ची वाटचाल चालू आहे... यामागे प्रचंड चिकाटी, अथक परिश्रम, उत्तम नियोजन, उत्साहपूर्ण वातावरण, सक्षम गटाची बांधणी, अनौपचारिक संपर्कातून लोकसंग्रह अशा अनेक गुणांचा पाया होता आणि आहे असे म्हणावेसे वाटते.

उत्तम गुणवत्ता असूनही शासकीय व मोठ्या संस्थांच्या पातळीवर शैक्षणिक साहित्य म्हणून छात्र प्रबोधनला मान्यता मिळावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हायला हवेत. – **वाच. विवेक कुलकर्णी,** स्पर्धा परीक्षा केंद्र, मार्गदर्शक

*

वीस वर्षं विसावा न घेता चालू असलेली 'छात्र प्रबोधन'ची दमदार वाटचाल विशेष आनंददायी अशीच आहे. वाचनाचे महत्त्व कमी झालेल्या चालू काळातही वाचनाची गोडी टिकून राहण्यासाठी छात्र प्रबोधनचे योगदान लक्षणीय आहे... चित्रकला, कविता, लेख, अंकांचे संपादन इ. द्वारे विद्यार्थ्यांच्या नवनिर्मितीच्या प्रतिभेला केलेले आवाहन वैशिष्ट्यपूर्ण आहे. नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांचा करून दिलेला परिचय विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणारा आहे...

संत, महंत, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण कार्यकर्ते, भारतीय विचाराने कार्य चालविणारे थोर लोक यांचा परिचय अपेक्षेच्या तुलनेने अंकामध्ये अल्प वाटतो...'छात्र प्रबोधन'ने भारतीय विचारधारेतील परंपरा, इतिहास, विज्ञाननिष्ठा व भारतीय दृष्टिकोन अभिमानपूर्वक मांडण्याचा पत्कर घ्यावा; केवळ प्रेयस नव्हे, श्रेयसकडे अधिक लक्ष पुरवावे असे वाटते. – **वा. ना. अभ्यंकर,** निगडी केंद्र प्रमुख

*

सुवर्णमहोत्सवी वाटचाल ... २०१२ ...
ज्ञान प्रबोधिनीचे सुवर्णमहोत्सवी वर्ष,
नेतृत्व संवर्धन केंद्र प्रारंभ



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर २० श्रावण, शके १९३४, ११ ऑगस्ट २०१२ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे–२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

## ...घडतील येथे द्रष्टे, चिंतक, नवयुगनिर्माते...



**सौर श्रावण, शके १९३४/ ऑगस्ट २०१२, पंजीकृत नियतकालिक** (Registered Newspaper)
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.) MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**



## सोनियाचा दिवस दारी

सोनियाचा दिवस दारी, शतक अर्धे सरुनि जाई
जागृतांचे गीत हे, संजीवनाचा मंत्र गाई ।।धृ।।

जाहले ते बिंदुवत् अन् सिंधुवत् आहे समोरी
ठाकता आव्हान, स्फुरते शौर्य पंखांना भरारी
वेधिका दृष्टी उद्याच्या नवयुगाचे स्वप्न पाही ।।१।।

मापुया अवकाश आणिक शोधु या अणुगर्भ ऊर्जा
मानवातच माधवाची बांधु या सानन्द पूजा
अमृताचे कुंभ ओतू लोकगंगेच्या प्रवाही ।।२।।

जोवरी सुकल्या मुखी त्या जीवनाची धार नाही
जोवरी शिणल्या जिवाला स्नेहमय आधार नाही
व्यर्थ तोवर स्वर्ग साती, व्यर्थ सगळी रोषणाई ।।३।।

रूप चित्ती मातृभूचे, कर्मपूजा मांडलेली
चेतनेची कोटिरुपे, एकसूत्री जोडलेली
सर्वही आपण प्रबोधक, मग उणे भाग्यास काही? ।।४।।

– वाच. स्वर्णलता भिशीकर

**सौर दिनदर्शिका शके १९३४**

| | ऑगस्ट २०१२ | श्रावण भाद्रपद |
|---|---|---|
| बु. | 1 | १० |
| गु. | 2 | ११ |
| शु. | 3 | १२ |
| श. | 4 | १३ |
| र. | 5 | १४ |
| सो. | 6 | १५ |
| मं. | 7 | १६ |
| बु. | 8 | १७ |
| गु. | 9 | १८ |
| शु. | 10 | १९ |
| श. | 11 | २० |
| र. | 12 | २१ |
| सो. | 13 | २२ |
| मं. | 14 | २३ |
| बु. | 15 | २४ |
| गु. | 16 | २५ |
| शु. | 17 | २६ |
| श. | 18 | २७ |
| र. | 19 | २८ |
| सो. | 20 | २९ |
| मं. | 21 | ३० |
| बु. | 22 | ३१ |
| गु. | 23 | भा.१ |
| शु. | 24 | २ |
| श. | 25 | ३ |
| र. | 26 | ४ |
| सो. | 27 | ५ |
| मं. | 28 | ६ |
| बु. | 29 | ७ |
| गु. | 30 | ८ |
| शु. | 31 | ९ |

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 12-11 / **August 12** असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
**या अंकाची किंमत : ₹ २५/–**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–**
**प्रकाशन दिनांक :**
सौर २० श्रावण, शके १९३४
११ ऑगस्ट २०१२
**www.chhatraprabodhan.org**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –